नागपूर महानगरपालिकेची गुरूवार दिनांक 22/08/2019 रोजी सकाळी 11—00 वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले नगरभवनात भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त.

उपस्थित सभासद

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 37 | क | नंदा शरद जिचकार | महापौर | |
| 2. | 20 | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | उपमहापौर | |
| 3. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य | C19 |
| 4. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या | D5 |
| 5. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या | D11 |
| 6. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य | C5 |
| 7. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य | D22 |
| 8. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य | B13 |
| 9. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या | C17 |
| 10. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या | C21 |
| 11. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य | B19 |
| 12. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या | C22 |
| 13. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य | C13 |
| 14. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य | B10 |
| 15. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या | C24 |
| 16. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य | C14 |
| 17. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या | D30 |
| 18. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या | D31 |
| 19. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य | D29 |
| 20. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या | D32 |
| 21. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य | C2 |
| 22. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या | D33 |
| 23. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य | C6 |
| 24. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या | D8 |
| 25. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या | D10 |
| 26. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य | C7 |
| 27. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या | D7 |
| 28. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य | D35 |
| 29. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य | D36 |
| 30. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या | D13 |
| 31. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या | A6 |
| 32. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या | C30 |
| 33. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य | B9 |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 34. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या | D15 |
| 35. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य | D20 |
| 36. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य | C15 |
| 37. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या | C27 |
| 38. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या | C28 |
| 39. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या | A5 |
| 40. | 14 | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या | C29 |
| 41. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य | D17 |
| 42. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या | A1 |
| 43. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या | C26 |
| 44. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या | A18 |
| 45. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य | B11 |
| 46. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य | C20 |
| 47. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या | A20 |
| 48. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य | B4 |
| 49. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य | B20 |
| 50. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या | A19 |
| 51. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या | D2 |
| 52. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य | B21 |
| 53. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य | B2 |
| 54. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य | D26 |
| 55. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य | B14 |
| 56. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या | A9 |
| 57. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या | A24 |
| 58. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य | B3 |
| 59. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या | A25 |
| 60. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या | A26 |
| 61. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य | D24 |
| 62. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या | D1 |
| 63. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य | B15 |
| 64. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या | A27 |
| 65. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या | A28 |
| 66. | 23 | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या | A11 |
| 67. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या | A29 |
| 68. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य | B24 |
| 69. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या | A13 |
| 70. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या | A3 |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 71. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य | B16 |
| 72. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या | A30 |
| 73. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य | D19 |
| 74. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या | A31 |
| 75. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य | B25 |
| 76. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य | B26 |
| 77. | 26 | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या | A32 |
| 78. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या | A12 |
| 79. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य | B27 |
| 80. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य | C8 |
| 81. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या | A2 |
| 82. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या | A33 |
| 83. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य | B17 |
| 84. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य | D4 |
| 85. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या | D3 |
| 86. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य | B28 |
| 87. | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या | A35 |
| 88. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या | A36 |
| 89. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य | B29 |
| 90. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या | A14 |
| 91. | 30 | अ | नागेश गोविदराव सहारे | सदस्य | B30 |
| 92. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या | A15 |
| 93. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य | C1 |
| 94. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य | B6 |
| 95. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या | A39 |
| 96. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य | B7 |
| 97. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या | C36 |
| 98. | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या | C37 |
| 99. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य | B18 |
| 100. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या | C38 |
| 101. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या | C39 |
| 102. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या | C40 |
| 103. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य | D25 |
| 104. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य | B32 |
| 105. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य | B33 |
| 106. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या | C31 |
| 107. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या | C32 |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 108. | 35 | अ | संदीप रमेश गवई | सदस्य | B34 |
| 109. | 36 | क | लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य | B35 |
| 110. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य | B37 |
| 111. | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या | C35 |
| 112. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य | B38 |
| 113. | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या | D6 |
| 114. | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य | C4 |
| 115. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य | C9 |
| 116. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य | C11 |
| 117. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य | C12 |

अनुपस्थित सभासद

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य | C18 |
| 2. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या | A7 |
| 3. | 1 | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या | C25 |
| 4. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य | D23 |
| 5. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या | A8 |
| 6. | 5 | अ | रिक्त | सदस्य | |
| 7. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य | D28 |
| 8. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या | D27 |
| 9. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या | D34 |
| 10. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या | D12 |
| 11. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य | D21 |
| 12. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या | D14 |
| 13. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य | B1 |
| 14. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या | A4 |
| 15. | 12 | ड | रिक्त | सदस्य | B8 |
| 16. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य | B40 |
| 17. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य | B39 |
| 18. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या | A21 |
| 19. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या | A22 |
| 20. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या | A23 |
| 21. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या | A10 |
| 22. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य | D18 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 23. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य | B22 |
| 24. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य | B23 |
| 25. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य | B5 |
| 26. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य | C3 |
| 27. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या | A34 |
| 28. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या | A37 |
| 29. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या | A38 |
| 30. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य | B31 |
| 31. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या | A16 |
| 32. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या | C33 |
| 33. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य | B12 |
| 34. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या | C34 |
| 35. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या | A17 |
| 36. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य | B36 |
| 37. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या | D16 |
| 38. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य | C10 |
| 39. | ना.स. | | किशोर दामोदर जिचकार | सदस्य | D9 |

उपस्थित अधिकारी

श्री. अभिजीत बांगर — निगम आयुक्त
श्री. हरीश दुबे — निगम सचिव

मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

महापौरः—मा. सदस्यगण. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात करण्यात येते.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, मी स्थगन प्रस्ताव दिलेला आहे. कचऱ्याच्या शुल्काबाबत त्यावर पहिले चर्चा करावी नंतर बाकीचे विषय घ्यावे असे आमचे मत आहे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, या विषयावर चर्चा झालीच पाहिजे असा आमचा देखील मानस आहे. परंतु सभागृहामध्येच विषयपत्रिकेवर विषय क्र 360 घेतलेला आहे. त्याच्यानंतर नोटीस देखील आहे. त्यामुळे विषयामध्ये आपण निश्चित चर्चा करुया.

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी,स्थगन प्रस्तावावर निर्णय देणे अभिप्रेत आहे.

महापौर :— हा प्रश्न विषयामध्ये देखील आहे आणि नोटीस मध्ये सुध्दा आहे त्यावेळी आपण यावर चर्चा करु.

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, आपण हा स्थगन प्रस्ताव हा नाकारता आहे हे सभागृहाला अवगत करुन दया.

महापौर :— हा स्थगन प्रस्ताव नाकारीत आहे.

प्रश्न क्र 149:— नागपूर महानगरपालिका सिमा क्षेत्रात आर.ओ. ने 20 लिटर पाण्याच्या कॅनचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या किती? संदर्भात प्रश्न

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, आपण मागच्या वेळी आर.ओ.च्या संदर्भामध्ये सविस्तर अहवाल सभागृहासमोर ठेवु असे निर्देश होते त्याकरीता हा विषय पुढच्या सभागृहात ठेवण्यात आला आहे. विभागाकडे काय माहिती आहे ती देण्यात यावी.

डॉ.कांबळे (आरोग्य अधिकारी,एस) :— मा.महापौर महोदय आणि मा.सभागृह. नागपूर महानगरपालिका क्षेत्रात कुठलाही व्यवसाय करण्याकरीता व्यावसायिकांना ना—हरकत प्रमाणपत्र सबंधित विभागाकडुन ना—हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. सदर प्रमाणपत्रामध्ये परवाना गृहीत धरणे अभिप्रेत नाही. नागपूर महानगरपालिकेच्या सिमाक्षेत्रात आर.ओ. 20 लिटर पाण्याच्या व्यवसाय करणाऱ्या व्यावसायीकांचे तपासणी व परवानगी देण्याचे अधिकार अन्न व औषध प्रशासनाला आहे. त्याप्रमाणे सदर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायीकांची यादी अधिकृत अन्न व औषध प्रशासनाला असणे क्रमप्राप्त आहे. सदर व्यवसायीकांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्यामुळे सदर कारवाईकरिता पत्राद्वारे अन्न व औषधी प्रशासनाला कळविण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी झोन स्तरावर झालेल्या करारनाम्यातील नमुद अटी आणि शर्तीच्या अधीन राहुन नागरिकांकडुन 20 लिटर पाण्याकरीता 5 रुपये, पाणी नागरिकांच्या घरी पोहचले गेले असता 10 रुपये, तसेच लग्न खाजगी कार्यक्रमाकरीता 15 रुपये दराने घेण्यात येते. सबंधित व्यावसायिक संबंधाने सदर कार्यप्रणालीवर झोनस्तरावर कार्यवाही करण्यात येते.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी आताच एक 20 तारखेच्या नवभारत मध्ये नकली मिनरल वॉटर उत्पादक वर बीएसआईची कारवाई अशाप्रकारचे हे वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे. जे आर.ओ. च्या पाण्यानी अनेक लोक गंभीररित्या बिमार पडत आहे. त्याच्यावर आपण मागच्या सभागृहामध्ये गंभीर चर्चा केली होती आणि सर्व सदस्यांनी त्यावर चर्चा केली पण त्याच्या उपाययोजना केवळ आपण फुड ॲन्ड ड्रग्सला कारवाई करण्याचे आदेश दिले, परंतु तोपर्यंत ज्या लोकांची प्राणहाणी झाली असेल, त्या पाण्यामुळे लोकांना रोग होवून जो त्रास झाला, पिलीया झाला, कित्येक लोक मृत्युमुखी पडले तर अशा परिस्थितीमध्ये यांच्यावर कारवाई काय करण्यात आलेली आहे. आपल्याला काही अधिकार आहे की नाही. आपण किती ठिकाणी जावुन आर.ओ.ची चौकशी केली? कोणकोणत्या ठिकाणी आपण गेले तेथील सॅम्पल आपण घेतले काय? यांची सर्व माहिती आपण पुढच्या सभागृहामध्ये ठेवण्याचे निर्देश दिले होते परंतु तसे मला काही मला दिसत नाही.

डॉ.कांबळे (आरोग्य अधिकारी, एस) :— मा.महापौर महोदय, मा.विरोधी पक्षनेते श्री.तानाजी वनवे, यांनी उचललेल्या प्रश्नासंदर्भात आपण अन्न व औषध प्रशासन विभाग यांना या महिन्याच्या 9 तारखेला नागपूर शहरातील सुरु असलेल्या पाण्याच्या कॅन व्यवसायीकांना कारवाई करण्याबाबत पत्र दिले आहे. आपण त्यांना एन. ओ.सी. देत नाही त्यामुळे कारवाई करण्याचे अधिकार सुध्दा अन्न व औषध प्रशासनाला आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेला कारवाई करण्याचे कुठलेही अधिकार नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी या प्रश्नाच्या संदर्भामध्ये मागच्या सभागृहामध्ये चर्चा झाली होती आणि त्यामध्ये एक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. असा काही अहवाल प्रशासनाने तयार केला आहे काय? जर केला असेल तर तो आपण वितरीत करणार आहे काय?

डॉ.कांबळे (आरोग्य अधिकारी,एस):— मा.महापौर महोदय, तयार केला आहे आणि अहवाल वितरीत करणार आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— अहवाल किती पानाचा आहे. अहवाल लहान असेल तर त्याचे वाचन करण्यात यावे आणि मोठा असेल तर सर्व सदस्यांना झेरॉक्स करुन तो अहवाल पाठवावा.

डॉ.कांबळे (आरोग्य अधिकारी, एस):— मा.महापौर महोदय, अहवाल हा मोठा आहे त्यामुळे सर्वांच्या कॉपी मी त्वरीत देतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढच्या सभागृहामध्ये यावर चर्चा सुध्दा करता येईल.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, प्रफुल्लजी गुडधे यांनी म्हटल्याप्रमाणे या अहवालाच्या प्रती सर्व सदस्यांना पाठविण्यात याव्यात आणि त्यानंतर पुढच्या सभागृहामध्ये यावर चर्चा व्हावी.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, पाण्याशी संबंधितच मी बोलतो, रेन वॉटर हार्वेस्टिंग तयार करण्यासंदर्भात खूप गाजावाजा झाला होता. असे किती झाले, त्या संदर्भात मी पत्र दिले होते माझ्या पत्राचे काय झाले त्या संदर्भात माहिती दयावी. माझ्या प्रभागामध्ये खूप पिलीया पिडीत आहेत.

महापौरः—मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे आर.ओ. या विषयाच्या अहवालाची प्रत सर्व मा.सदस्यांना वितरीत करण्यात यावी. पुढच्या सभागृहात या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येईल.

प्रश्न क्र 152:— मौजा सोमलवाडा ख. क्र. 33, 35 ही जमीन मनपाच्या मालकीची आहे का? संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः— वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र 153:— वर्ष 2018—19 या आर्थिक वर्षात मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी शहरातील नगरसेवक व प्रभागनिहाय किती रकमेचे विकास कामनिहाय प्रावधान उपलब्ध करुन दिले संदर्भात प्रश्न

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, या ठिकाणी मी माहिती मागितली होती की प्रभाग निहाय किती रकमेचे आपण प्रावधान उपलब्ध करुन दिले आहे. मात्र त्याचे उत्तर देतांना त्याचे प्रभाग निहाय काही दिले नाही. त्यामध्ये प्रभाग क्र 1, मग 27, मग मध्येच 17, 13 असे प्रभाग आहेत म्हणजे क्रमाने काही दिले नाही. प्रभाग क्रमांक 1 ला आपण किती निधी दिला, प्रभाग क्र 2 ला आपण किती निधी दिला असे प्रत्येक प्रभाग निहाय मी उत्तर मागितले होते मात्र त्यामध्ये कंन्फुजन करणारे हे उत्तर प्राप्त झाले आहे. त्यामध्ये सुस्पष्ट उत्तर असे पाहिजे की प्रभाग निहाय, प्रफुल्ल गुडधे यांना किती प्रावधान दिले, संदीप जोशीला किती दिले, तानाजी वनवे यांना किती दिले, आमच्या नगरसेवकांचे आक्षेप असतात. दरवेळेस आम्हाला जास्त मिळतात त्यामुळे उत्तर देत असतांना नगरसेवक निहाय सुध्दा प्रावधान मागितले होते. त्यामुळे हे सुध्दा उत्तर पेंडींग ठेवुन पुढच्या सभागृहामध्ये याचे उत्तर दयावे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, ज्या पध्दतीने मा.सदस्यांनी उत्तर मागितले आहे त्या पध्दतीने काय झालेले आहे प्रोव्हीजन हे सांगायला मुळीच हरकत नाही त्यामुळे स्पष्ट उत्तर हे त्यांना पुढच्या सभागृहात त्यांना देण्यात यावे.

महापौर :— मा.सदस्यांनी जशी माहिती मागितली आहे तशी माहिती त्यांना देण्यात यावी.

प्रश्न क्र 154:— उद्यान विभागाकडे किती उद्याने असून या उद्यनांपैकी किती उद्याने विकसित करण्यात आली आहे?संदर्भात प्रश्न

श्रीमती उज्वला बनकर :— सन्माननिय महापौर, सन्माननिय सभागृह, माझे उत्तर समाधानकारक आहे.

प्रश्न क्र 155:— नागपूर शहरातील नागरीकांना बेवारस कुत्र्यापासुन होत असलेल्या त्रासा संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्तः—वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र 156:— नागपूर महानगरपालिके अंतर्गत नेहरुनगर झोन क्र. 5 मध्ये प्रमुख मार्गावर दिवसेंदिवस अस्थायी दुकानदारांचे अतिक्रमण संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः—वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र 157:— नागपूर महानगरपालिका मालमत्ता कर थकीत असलेल्या नागरिकांचे प्लॉट लिलाव संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः—वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र 158:— नागपूर शहरात नागपूर महानगरपालिकेच्या झोन निहाय मा. पालकमंत्री यांचे किती जनता दरबार घेण्यांत आले संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्तः—वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र 159:— नागपूर महानगरपालिकेत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकार कक्षेत संपूर्ण स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्तः—वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र 160:— बायोमॅट्रीक हजेरी मशिन संदर्भात प्रश्न

श्री.दिलीप दिवे :— मा.महापौरजी, मी जो प्रश्न विचारला होता बायोमॅट्रीक मशीनच्या संदर्भात, आणि प्रशासनाने मला जे उत्तर दिले, जो प्रश्न विचारला त्या बद्दल उत्तरच मला प्रशासनाने दिलेले नाही. यावरुन असे लक्षात येते की नगरसेवक जे प्रश्न विचारतात त्या बाबतीत प्रशासन गंभीर नाही आणि कुठल्याही प्रकारचे थातुर मातूर उत्तर देतात आणि वेळ मारुन घेतात. मला हे म्हणायचे आहे की या संबंधिचा विषय आहे हा 19/03/2018 रोजी जी आपली शिक्षण विशेष समितीची मिटींग झाली होती त्या मिटींगमध्ये मी हा विषय घेतला होता आणि त्यानंतर आयुक्त साहेबांना वेळोवेळी मी 3 पत्र दिलेले आहेत. यामध्ये प्रत्येक वेळेस निविदा निघाल्या आणि यामध्ये मला सांगण्यात आले की निविदेमध्ये जेवढे कंत्राटदार यायला पाहिजे होते ते आले नाही आणि त्यामुळे हा विषय झाला नाही. आणि त्यानंतर चौथी निविदा ज्यावेळी काढण्यात आली त्यावेळी त्यामध्ये 4 कंत्राटदार आले. आणि त्याच्यामध्ये 1 कंत्राटदाराला ती निविदा देण्यात आली. पण ज्यावेळी वर्कऑर्डरसाठी ही निविदा संबंधित जे ऑफीसर आहे त्यांच्याकडे जेव्हा गेली, त्यामध्ये अशी खुटी मारली की ते वर्कऑर्डर होणार

नाही याची त्यांनी काळजी घेतली. ज्यावेळी मी या संदर्भात विभागाला विचारणा करण्याचा प्रयत्न केला तर मला असे सांगण्यात आले की आम्हाला ही फाईल करायचीच नाही आहे अशा पध्दतीने त्या फाईलमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी फाईलमध्ये खुटी मारुन ठेवली होती. त्यानंतर मी परत आयुक्त साहेबांना पत्र दिले आणि सदनामध्ये प्रश्न टाकला आणि प्रश्न टाकल्यानंतर या फाईलचे जे टेंन्डर झाले होते त्यानंतर 3 महिन्यानंतर या टेन्डर ला वर्कऑर्डर देणे अपेक्षित होते, त्यामध्ये हा वर्कऑर्डर दिला गेलेला नव्हता मी ज्यावेळी हाउस मध्ये प्रश्न टाकला त्यानंतर याचा वर्कऑर्डर दिला गेला आणि त्यानंतर शाळेमध्ये या मशीन लावल्या गेल्या, त्या मशीन लावल्या की नाही लावल्या हा माझा प्रश्न नव्हता, माझा प्रश्न होता यासाठी होता की मा.मुख्यमंत्री साहेबांनी प्रत्येक काम किती दिवसामध्ये पुर्ण व्हावे आणि ते जर झाले नाही तर संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करावी या संबंधिचे दिशानिर्देश दिले आहे. 3 महिन्यामध्ये याचे वर्कऑर्डर झाले नाही त्या संदर्भात जो कोणी संबंधित अधिकारी आहे यांच्यावर काय कारवाई केली ते मी मागितले होते माझ्या उत्तरमध्ये हे कुठेही दिलेले नाही. म्हणुन मला असे वाटते की जे नविन नगरसेवक आहे यांनी विचारलेल्या प्रश्नावर प्रशासन गंभीर नाही आणि आमची गंमत करीत आहे या पध्दतीचे हे चाललेले आहे.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, पहिला प्रश्न होता. आर.ओ. च्या संदर्भात सन्माननिय विरोधी पक्ष यांचा प्रश्न होता याचा अहवाल सभागृह समोर ठेवायला आपण सांगितला होता. हा प्रश्न होता 20 फेब्रुवारीचा, आज 22 ऑगस्ट आहे. आज आपण सहाव्या महिन्यामध्ये आपण बसत आहे. आज तो अहवाल सभागृहामध्ये वाचुन दाखविला तो जर आज मिळाला असता तर त्यावर चर्चा झाली असती. त्यानंतर सन्माननिय प्रफुल्लजी गुडधे यांचा प्रश्न तो देखील दुसऱ्या महिन्यातला सहा महिने झाले त्यावर देखील थातुर मातूर उत्तर दिले. हा शेवटचा हा जो प्रश्न आहे श्री.दिलीपजी दिवे यांनी विचारलेला, त्यावर देखील योग्य उत्तर नाही. त्यामुळे असे जर उत्तर दयायचे असतील तर त्याच्यापेक्षा आम्ही प्रश्नोत्तर बंद करुन टाकतो, विचारतच नाही. अशापध्दतीने जर उत्तर देत असतील, की जो प्रश्न विचारला आहे. व्यवस्थित तर उत्तर दिले पाहिजे. त्यांनी काय प्रश्न विचारला त्याप्रमाणे उत्तर दिलेले आहे काय?

महापौरः– संबंधित अधिका–याने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.मोहिते) :– मा.महापौरजी, मुख्य म्हणजे या मुळ प्रश्नामध्ये बायोमॅट्रीक मशीनचे लेट इन्स्टॉलेशन का झाले. लेट इन्स्टॉलेशनला कोण जबाबदार आहे यावर कारवाई करण्याकरीता मा.दिवे साहेबांनी प्रश्न टाकलेला आहे. या संदर्भात मला सभागृहाला सांगायचे आहे की या ज्या दोन निविदा दोनदा प्रसिध्द कराव्या लागल्या.

श्री.दिलीप दिवे :– मा.महापौरजी, दोन वेळा निविदा निघालेल्या नाही तर चार वेळा निविदा निघालेल्या आहे. मी प्रश्न विचारलेला आहे की कोणता अधिकारी जबाबदार आहे, त्यावर कारवाई काय झाली. आणि या फाईलवर ज्या अधिकाऱ्यांनी खुटी मारली आहे त्यावर काय कारवाई केली हे मला पाहिजे आहे. मला बायोमॅट्रीकच्या निविदा काढली काय? व त्या मशीन लागल्या काय? याच्याशी काही घेणेदेणे नाही. माझा प्रश्न आहे की ज्या ऑफीसरने या फाईलमध्ये खुटी मारली आहे त्या अधिकाऱ्यावर काय कारवाई केली याचे उत्तर मला पाहिजे आहे. आणि शेवटीची जी निविदा आहे ती फायनल झाल्यानंतर तीन महिन्याच्या आतमध्ये त्याला वर्कऑर्डर दयावा लागतो. तीन महिन्यानंतर वर्कऑर्डर का दिला नाही त्या संदर्भात सबंधित जो अधिकारी आहे त्याच्यावर आज मा.महापौरजी काय कारवाई झाली आहे याचे उत्तर मला आज पाहिजे आहे.

उपायुक्त (श्री.मोहिते):– मा.महापौरजी, या प्रकरणामध्ये फाईलला कोणत्या स्तरावर अवरोध निर्माण झाला होता याबद्दलची चौकशी मा.अति.आयुक्त यांच्याकडे करुन पुढील कारवाई करण्यात येईल असे मी या सभागृहापुढे सांगु इच्छितो.

श्री.दिलीप दिवेः– मा.महापौरजी, ज्या अधिकाऱ्यांनी यामध्ये खुटी मारली आहे त्या अधिकाऱ्यांनी यामध्ये उत्तर दयावे. त्यांचे म्हणणे होते की मला ही फाईलच समोर न्यायची नाही आहे. महानगरपालिका त्यांच्या स्वतःच्या नियमाने चालते काय?

अपर आयुक्त(श्री.राम जोशी) :– आदरणीय महापौरजी तसेच आदरणीय सदन. मा. दिवे साहेब, अधिका–याचे नाव आणि पद कळले तर बरे होईल.

श्री.दिलीप दिवे :– मा.महापौरजी, तुमच्या मागे बसलेले सर्व अधिकाऱ्यांना माहीत आहे की कोणी यामध्ये आक्षेप नोंदविला आहे असे या उत्तरामध्ये लिहिलेले आहे याचा अर्थ तुम्हाला माहीत आहे की तो ऑफीसर कोण

आहे. मला सांगायची गरज नाही.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य जे म्हणतात त्या संदर्भात माझ्याकडे सी.एफ.सी कडुन ही फाईल आलेली होती बायोमॅट्रीक मशीन लावण्यासंदर्भात. साधारणतः 10ते 15 शाळेमये ती बायोमॅट्रीक मशीन लावण्याबद्यलची फाईल होती तर त्यावर मी ऐवढेच म्हटले की ही बायोमॅट्रीक मशीन लावल्यावर सॅलरीशी लिंकींग व्हायला पाहीजे नाहीतर बायोमॅट्रीक मशीन लावून काही उपयोग होत नाही. म्हणुन तेवढी मी विचारणा केली होती.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, हा बायोमॅट्रीकचा विषय आहे आणि त्यालाच संबंधित त्या त्या शाळेमधल्या सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्याचा पण विषय आहे. आता सि.सी.टी.व्ही कॅमेरा आणि बायोमॅट्रीक मशीन लावली पाहिजे की नाही लावली पाहिजे. याचा प्रशासनाच्या अधिकाऱ्याशी काय संबंध आहे. जर तुम्हाला कर्मचारी वेळेवर उपस्थित पाहिजे आहे. शिक्षक पुर्णवेळ शाळेत पाहिजे. पगाराशी लिकींग व्हावे की नाही व्हावे हा प्रशासनाचा विषय आहे. मा.अध्यक्षांचा प्रश्न आहे काय? त्यांनी तुम्हाला म्हटले की या लावून दया. स्वतःहुन शिक्षण समितीचा अध्यक्ष म्हणतो की लावून दया आणि प्रशासन त्यामध्ये हे गरज आहे काय? ती गरज आहे काय? याच्याउपर त्या शाळेमध्ये सेक्युरीटी गार्डचा विषय आहे. माझे असे म्हणणे आहे की याच विषयामधुन तुम्ही तुमचा खर्च कमी करु शकता काय? अशा अनेक शाळा आहे जिथे सेक्युरीटी गार्डची गरज आहे. अध्यक्षांची मागणी आहे. पण त्या शाळेमध्ये सेक्युरिटी गार्ड नाही. प्रशासनाने लिहुन दिले की येथे याची गरज नाही. तेथे त्याची गरज नाही. प्रशासन होते कोण लिहुन देणारे, मग त्यांना शिक्षण विभागाचा चार्ज दया. माझे म्हणणे असे आहे की, ज्या फाईली ओ ॲन्ड एम विभागाला जातात त्यावर खुटयाच येतात, आमचा काही हेतु आहे काय? स्वतः दिवे साहेबांची काही कंपनी आहे काय बायोमॅट्रीकची, त्यांचा हेतु स्पष्ट आहे की शिक्षक वेळेवर असले पाहिजे, 11 वाजता शाळा असेल तर पावने अकराला शिक्षक आले पाहिजे. हा शुध्द हेतु मा.अध्यक्षांचा आहे. सॅलरीला ॲटच करु नका असे अध्यक्षांनी म्हटले काय? हे करु नका म्हणुन, की शिक्षकांच्या सॅलरीला बायोमॅट्रीक करु नका, मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या मुख्यालयात बायोमॅट्रीक लागले आहे. किती वेळा लिंक केले तुम्ही सॅलरीला, असे अनेक कर्मचारी आहे जे वेळेवर येत नाही आणि वेळेच्या आधी जातात. काय पगार कापले तुम्ही, एका बाजुला तुम्ही शिक्षकांची सॅलरी ॲटच करतो म्हणता आणि दुसऱ्या बाजुने कर्मचाऱ्यांचा काय विषय आहे. आमच्या सर्वांच्या कार्यालयात पी.ए. आहे. कोणता पी.ए. बायोमॅट्रीकवर थंब इप्रेशन मारतो. मग एका बाजुला शिस्त नाही आणि दुसऱ्या बाजुला कां शिस्त आहे. माझा हा मुद्या आहे आणि त्या अध्यक्षांनी जर जाणिवपुर्वक शैक्षणिक व्यवस्था सुधारण्यासाठी जर त्यांनी विनंती केली, सेलरी ॲटच करा. तो त्यांचा विषय आहे काय? तो तुमचा विषय आहे, तो शिक्षणाधिकाऱ्यांचा विषय आहे. मा.अध्यक्ष ज्या हेतुकरीता भांडत आहे त्या हेतुलाच तुम्ही तडा देवुन राहिले. हे कॅमेराच्या संदर्भात आहे की शाळेत सी.सी.टी.व्ही कॅमेरा असावा की नसावा म्हणजे त्या मुलांच्या सेक्युरीटी करिता सी.सी.टी.व्ही कॅमेरा आवश्यक आहे त्या फाईलमध्ये सुध्दा अनेक प्रकारच्या खुटया येत आहे.

महापौर :— ओ एन्ड एम विभागाच्या संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त होत असतात या विभागाची अपर आयुक्त यांनी चौकशी करावी व त्यावर आयुक्तांनी कार्यवाही करावी

श्री.तानाजी वनवे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, ओ.ॲन्ड एम विभागातर्फे नगरसेवकांनी दिलेले प्रस्ताव जे आहे त्याला टाळण्याचे काम ते करतात स्पष्ट असे आदेश कुठल्याही प्रस्तावासंदर्भात देत नाही. म्हणुन आपण ओ.ॲन्ड एम. विभागाची चौकशी करावी अशी मी आपणाला विनंती करतो.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, मी मार्गच्या सभागृहामध्ये देखील एक मुद्या मांडला होता, या विभागामध्ये एकतर बाहेरचा अधिकारी आणावा, सरकारचा किंवा सचिवाला याचा चार्ज दयावा, या सहा. आयुक्तांनी या विभागाचा सत्यानाश केला आहे. म्हणजे आमचा काही धामेचा साहेबांना काही म्हणणे नाही. फार कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आहेत पण काय अडचण आहे मला कळत नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी :— मा.महापौरजी, सत्तापक्ष के नगरसेवकों का समाधान नही हो रहा। सत्तापक्ष का प्रशासन के उपर कोई वचक नही है। इससे यह साबित होता है की प्रशासन मे सत्तापक्ष का कंट्रोल नही है।

(बेल)

श्री.प्रविण दटके :— मा.ग्वालबंशी साहेब कोणाचा किती वचक आहे. कोणाचे कसे काम आहे हे आम्हाला माहिती आहे. आमच्या महापौरांवर आम्हाला विश्वास आहे.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, सन्माननिय दिलीपजी दिवे यांनी जे विषय या ठिकाणी ठेवले ते गंभीर विषय आहे. माझी आपणाला विनंती आहे की या विषयावर अति.आयुक्तांकडुन चौकशी करुन हा अहवाल 15 दिवसाच्या आत सदनाच्या पटलावर ठेवण्यात यावा.

महापौर :– मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी सुचविल्याप्रमाणे मा.सभापती शिक्षण समिती श्री.दिवे यांनी ठेवलेल्या विषयाच्या संदर्भात अति.आयुक्त यांनी चौकशी करून 15 दिवसांत अहवाल सभागृहात ठेवावा.

मो.जमाल :– मा.महापौरजी आप सभागृह मे आदेश देते हो लेकीन आपके आदेश का पालन कितने प्रतिशत होता है। इसके पहले जो रुलिंग दी गयी उसके उपर क्या कारवाई हुयी, आप रुलिंग देते हो लेकीन प्रशासन आपके रुलिंग का क्या संज्ञा लेते है इसकी जानकारी सदन को दो ।

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी मा.सदस्यांच्या वतीने मी सांगतो की आपण आश्वासन समितीचा अहवाल या सभागृहाच्या पटलावर ठेवणार होते. आणि एकदा नव्हे तर चार–चारदा आपण या सभागृहाला आश्वस्त केले की सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनाची परिपुर्तता प्रशासनाच्या माध्यमातुन किती झाली या संदर्भात अहवाल सादर करतो. मा.महापौरजी अजुनपर्यत झालेले नाही.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, आश्वासन समितीचा अध्यक्ष मीच आहे. अर्ध काम झालेले आहे. थोडेसे राहिलेले आहे. मी पुढच्या सभागृहाच्या आत ठेवेल.

प्रश्न क्र 161:– मौजा पारडी येथील सरस्वतीबाई तलमले यांच्या शेतीतील आरक्षण विकास संदर्भात प्रश्न

श्री.पुरुषोत्तम हजारे :– मा.महापौरजी, पार्डी येथील जागेवर नागपूर महानगरपालिकेचे आरक्षण आहे.

श्री.नरेंद्र (बाल्या) बोरकर :– मा.महापौरजी, ही जी जागा आहे ती नागपूर महानगरपालिकेने आरक्षित केलेली जागा आहे. ही जागा 4 पार्टयानी विकत घेतली आणि आपले अधिकारी ते सोडुन देत आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, याच्यामध्ये आरक्षण कोणाचे आहे या संदर्भात कार्यालयाने माहिती दयावी.

श्री.प्रदीप पोहाणे :– मा.महापौरजी, याच्यावर आरक्षण कोणाचे आहे ते सांगण्यात यावे.

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :– मा.महापौरजी, मौजा पार्डी येथील सर्व्हे क्र 83/1,2 या जागेवर कोणकोणते आरक्षण आहे. परंतु या जागेवर किमान 5 आरक्षण आहे. परंतु त्यासाठी एन.आय.टी. नियोजन प्राधीकरण आहे. परंतु प्लेग्राऊंडसाठी नागपूर महानगरपालिका त्यासाठी समूचित प्राधीकरण होते.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, हे सांगतांना त्याचे 37 एन.आय.टी. ने केले असेल, तर आपल्या एन.ओ.सी. ची गरज आहे काय आणि ते आपण दिली आहे काय?

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :– मा.महापौरजी, यासाठी नियोजन प्राधीकरण एन.आय.टी. आहे. आता हा संपुर्ण भाग नागपूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या अंतर्गत गेला असून त्यामध्ये डॉक स्कीम मंजूर झाली आणि त्यासाठी नियोजन प्राधीकरण म्हणून एन.आय.टी आहे आणि त्यांनी 37 ची कार्यवाही त्यांच्या स्तरावर केलेली आहे. त्या करीता नागपूर महानगरपालिकेची एन.ओ.सी. देण्यात आलेली नाही.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, समजा त्या आरक्षणाची गरज आहे की नाही. त्या संदर्भात आपले काय मत आहे तसेच येथे जे पाच आरक्षण आहे ते कोणते आहे ते वाचून दाखववे.

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :– मा.महापौरजी, आरक्षण क्र ई–6 आहे. प्लेग्राउंडसाठी 7.1 हेक्टर त्यासाठी नागपूर महानगरपालिका ही समुचित प्राधीकरण होते. ई –7 आहे प्ले ग्राउंड .63 त्याकरीता नागपूर सुधार प्रन्यास समुचित प्राधीकरण होते. ई –8 सेकंडरी स्कुल त्यासाठी .58 त्यासाठी नागपूर सुधार प्रन्यास समुचित प्राधीकरण होते. एम.ई –18 1.68 टाऊनहॉल याच्यासाठी नागपूर सुधार प्रन्यास समुचित प्राधीकरण आहे. प्रायमरी स्कुल .50 यासाठी नागपूर सुधार प्रन्यास समुचित प्राधीकरण आहे. 18 मिटर रुंद रस्ता विकासाचा रस्ता आणि 30 मिटर चा रस्ता हे नागपूर सुधार प्रन्यास समुचित प्राधीकरण होते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, 2 दिवसाआधी वर्तमानपत्रामध्ये बातम्या आल्या की नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाले आणि नागपूर महानगरपालिकेमध्ये संमेल्लीत झाले. त्यानंतर या क्षेत्रासाठी नियोजन प्राधीकरण ही नागपूर महानगरपालिका आहे की नागपुर सुधार प्रन्यास आहे या संदर्भातील माहिती कार्यालयाने दयावी.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेचे प्रशासक म्हणुन त्या आरक्षणाची तेथील नागरिकांना गरज आहे की नाही. ऐवढे सांगावे.

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :– मा.महापौरजी, सदर भाग नागपूर स्मार्ट सिटी अंतर्गत गेल्यामुळे तेथे नगररचना योजना.........

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, याचा अर्थ तेथे आपले प्रशासन बाहेर पडले. स्मार्ट सिटी हा जो प्रकल्प आहे. हा महानगरपालिके अंतर्गत आहे की स्वायत्त आहे काय? त्यांना नियोजनाचा अधिकार आहे काय?

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :– मा.महापौरजी, होय

श्री.प्रविण दटके :– हा प्रकल्प महानगरपालिकेच्या अंतर्गत येतो की तो स्वायत्त आहे.

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :– मा.महापौरजी, नागपूर सुधार प्रन्यासच याच्यावर नियोजन प्राधीकरण होते आणि त्यांच्यामार्फेतच 37 ची कारवाई केली आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, माझी फक्त ऐवढीच विनंती आहे की स्मार्ट सिटी हा प्रकल्प हा एक स्वायत्त प्रकल्प आहे काय? एडीटीपी महोदय, मी मा. महापौरांच्या मार्फत हा प्रश्न आयुक्तांना विचारू इच्छितो.

महापौर'– आयुक्तांनी माहिती दयावी.

निगम आयुक्त :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या अनुषंगाने स्मार्ट सिटी जो आपला प्रकल्प आहे. त्याची बोर्ड ऑफ डायरेक्टरची जी बॉडी आहे त्याच्यावर ऑफीशीअल आणि नॉन ऑफीशीअल असे दोनही सदस्य आहे. आणि नॉन ऑफीशीअल जे सदस्य आहे ते महानगरपालिकेचे पदाधिकारी आहे. परंतु ही कंपनी ॲक्ट अंतर्गत रजिस्टर्ड बॉडी स्वतंत्रपणे काम करते.

श्री.प्रविण दटके:– मा.महापौरजी, एन.ई.एस.एल. ही एक महानगरपालिकेची कंपनी आहे. ती ओन बाय एन.एम.सी. आहे. स्मार्ट सिटी ओन बाय एन.एम.सी. नाही काय?

निगम आयुक्त :– मा.महापौरजी, ओन बाय एन.एम.सी. म्हणण्यापेक्षा स्मार्ट सिटी कार्पोरेशन हे विविध शहरांसाठीच स्थापन झालेले आहे. ते केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या वतीने स्थापन झाले आहे.

श्री.प्रविण दटके :– मला या संदर्भात माहिती आहे परंतु माझा मुळ प्रश्न आहे स्मार्ट सिटी ओन बाय एन.एम.सी. आहे काय? कारण ज्या कंपनीवर मा.महापौर, मा.विरोधी पक्षनेते, मा.सत्तापक्ष नेते, गटनेते आयुक्त, कलेक्टर, एन.आय.टी. चे सभापती, पोलीस आयुक्त, यांचा मेन्टॉर शासनाचा एक मोठा अधिकारी ही कंपनी ओन बाय कोण आहे. याचा मालक कोण आहे. कुठली एस.पी.व्ही. आहे. की एस.पी.व्ही नाही.

निगम आयुक्त :– एस.पी.व्ही. च्या संदर्भात माहिती घेवुन मी सादर करतो.

श्री.प्रफुल्ल  गुडधे :– मा.महापौरजी, मी एक माहिती देवु इच्छितो की ही ओन बाय एन.एम.सी. नाही आहे. यासाठी नाही आहे की डायरेक्टर जरी असले तरी ते ओन बाय एन.एम.सी. होवु शकत नाही. एन.आय.टी. मध्ये मा.आयुक्त डायरेक्टर असतात, एन.आय.टी. मध्ये स्थायी समितीचे अध्यक्ष हे विश्वस्त असतात म्हणुन ते ओन बाय एन.एम.सी. राहु शकत नाही.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, एन.आय.टी. चा जो कायद्या आहे तो विधानसभेने व विधीमंडळाने तयार केलेला कायद्या आहे. पुर्वी विद्यापिठावर एक प्रतिनिधी पाठवायचो, कृषीमंडळावर एक पाठवायचो, त्याच धर्तीवर आपण एन.आय.टीमध्ये पाठवितो, एन.आय.टीमध्ये आपण अंशदान करतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– स्मार्ट सिटीचा जो एस.पी.व्ही आहे तो ओन बाय एन.एम.सी. नाही.

श्री.धर्मपाल मेश्राम :– पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी, स्मार्ट सिटी केंद्र शासनाच्या अखत्यारित काम करते काय ऐवढे सांगण्यात यावे.

निगम आयुक्त :– मा.महापौर महोदया, मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या अनुषंगाने ही वस्तुस्थिती आहे की ती कंपनीज ॲक्टमध्ये रजिस्टर्ड आहे. एक रजिस्टर्ड बॉडी आहे. मात्र ओन बाय कोण? शेअर होल्डींग पॅटर्नची ओनरशिप कशी आहे या संदर्भात माहिती घेवून सांगतो.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, स्मार्ट सिटी जर नियोजन प्राधिकरण असेल तर एन.आय.टी. महानगरपालिकेत डिझॉल झाली असेल पण स्मार्ट सिटीला आरक्षण ठरविण्याचा अधिकार आहे काय? कारण ते आरक्षण 2000मध्ये या महानगरपालिकेने जो डेव्हलपमेंट प्लॅन तयार केला होता त्याच्यामध्ये ते होते आणि ते ठरविण्याचा अधिकार एका एस.पी.व्ही. ला कसे जावू शकतो. जरी जावू शकतो तर या महानगरपालिकेला एनओसी कां लागत नाही. साधा उदाहरण सांगतो, एका बगीच्याचे काम करावयाचे असेल आणि ते एनआयटीच्या अखत्यारितील जागा असेल तर चार वेळा महानगरपालिका एनआयटीची एनओसी मागते. एखादे सभागृह बांधावयाचे असेल किंवा एखादे सभागृह बांधावयाचे असेल तर आणि ती जर एनआयटीची जागा असेल

तर एनएमसी चार वेळा एनओसी मागते. हा शेवटी नागपूर शहराच्या भविष्याचा प्रश्न आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधेः—मा.महापौरजी, हा प्रश्न पारडीचा नाही तर नियोजन प्राधिकरण कोण आहे. जर स्मार्ट सिटी जर नियोजन प्राधिकरण असेल तर इन्डीपेन्टंड नियोजन प्राधिकरण झालेले आहे. दुसरी महत्वाची गोष्ट याच्या आधी त्या ठिकाणी एनआयटीने कलम 37 ची कार्यवाही जर केली आहे तर आता त्याचे निश्चितपणाने नियोजन प्राधिकरण कोण आहे.

निगम आयुक्तः— मा.महापौरजी, जो मा.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला त्याच्यामध्ये नियोजन प्राधिकरण कोण आहे.एस.पी.व्ही. अगोदर एनआयटी नियोजन प्राधिकरण आहे. आता एनआयटी मर्च एनएमसी असे शासनाने डिक्लेअर केले आहे. मा.मंत्रिमंडळाने याला मान्यता दिली आहे. याचा जी.आर.आल्यानंतर ऑफीसियल कार्यवाही पुर्ण होईल. याचे प्राधिकरण एनआयटी ऐवजी एनएमसी होईल. आज रोजी एनआयटी प्राधिकरण आहे.

श्री.नरेंद्र(बाल्या) बोरकरः— मा.महापौरजी, हा मुद्दा तुम्ही भलतीकडे नेत आहे. त्या जागेचे काय करावयाचे आहे ते सांगावे. आरक्षण आहे ते काढत आहे काय?

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, आयुक्त महोदयांनी माहिती दिली ती अत्यंत बरोबर आहे. शासनाचा आदेश जोपर्यंत प्राप्त होत नाही तोपर्यत एनआयटी त्या जागेची नियोजन प्राधिकरण आहे. एनआयटीने या जमिनीचा वापर फेरबदल कारवाई कलम 37 अंतर्गत याच्या आधी केलेली आहे. नागपूर सुधार प्रन्यासने केली म्हणजे कोणी केली तर त्या प्रशासनाच्या बोर्ड ऑफ ट्रस्टीने केली. त्या बोर्ड ऑफ ट्रस्टीमध्ये कोण कोण होते तर या सभागृहाचे प्रतिनिधी होते. स्थायी समिती अध्यक्ष होते, या महानगरपालिकेच्या नगरसेवकांचा एक प्रतिनिधी त्या ठिकाणी होता. सोबतच मा.आयुक्त त्या बोर्डामध्ये ट्रस्टी आहे. असे तीन—तीन ट्रस्टी असल्यावरती नासुप्र त्या जमिनीचा वापराचा फेरबदल यांच्या माहितीशिवाय कसा काय करू शकतो. बिना परवानगी या संपुर्ण जमिनीचा फेरवापर बदलला असेल तर त्या संदर्भात महानगरपालिकेने का आक्षेप घेतला आहे काय? ही बाजाराखालील आरक्षणाची जमीन आहे. तेथे ट्राफिक कंझन्शन होत असल्यामुळे आमचे नगरसेवक हजारे या गोष्टीचा पाठपुरावा करीत आहे. फेरवापर बदलण्याचा प्रश्न येतो तेव्हा महानगरपालिकेने आक्षेप घेतला नाही. आपले तीन—तीन ट्रस्टी असूनही त्याच्या देखत हे झाले आहे. महानगरपालिका अनभिज्ञ आहे आणि हे पाप एन. आय.टी.चे आहे असे सरळ सरळ सांगत येणार नाही मा.महापौरजी, एनआयटी जरी नियोजन प्राधिकरण असले तरी त्याच्यावर महानगरपालिकेचे प्रतिनिधी आहेत. त्यामुळे त्या महानगरपालिकेच्या प्रतिनिधीने जबाबदारीने ही फेरबदलाची चौकशी करून मान्यता द्यायला पाहिजे. अशी मान्यता त्यांनी दिली नाही. ज्या कालखंडामध्ये कलम 37 ची मान्यता प्रदान झाली त्यावेळी कोण कोण ट्रस्टी होते.

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :—मा.महापौरजी, हे सेक्शन 60 अन्वये दिनांक 7.04.2011 अन्वये.....

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, ठराव कधी झाला.

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :—ठरावाबद्दल मला एक्झॅक्ट सांगता येणार नाही परंतु जो ड्राप तयार झाला तो दि. 7.04.2011 ला तयार झालेला आहे. त्यानंतर मंजूरी झालेली आहे त्यानंतर 37 ची प्रक्रिया झालेली आहे.

श्री.मनोज सांगोळेः—मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या माध्यमातून 60 लक्ष रू.चे काम झाले ते वाटतच नाही. कारण नियोजन प्राधिकरण आहे ती महानगरपालिका आहे.

(बेल)

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, या ठिकाणी सभागृहाचा एक ठराव मंजूर करून एनआयटीला पाठविला पाहिजे.

श्री.संदीप जोशीः— मा.महापौरजी,सभागृहाचा मानस लक्षात घेता मा.सदस्य प्रफुल्ल गुडधे असतील. मा. सदस्य श्री.प्रवीण दटके असतील आणि ज्यांचा प्रश्न आहे ते मा.सदस्य श्री. हजारे असतील. सभागृहाचा एकंदरीत मानस लक्षात घेता एनआयटी एनएमसीमध्ये मर्च होणार आहे आताच मा.आयुक्त साहेबांनी सांगितले आणि जी. आर.येणार आहे. सभागृहाचा मानस लक्षात घेता 1 एप्रिल 2018 पासूनचे जेवढया 37(1) च्या कार्यवाहया केलेल्या आहेत त्या स्थगित करण्यात याव्यात आणि ते संपुर्ण नागपूर महानगरपालिकेच्या सदनात आणूनच त्यावर निर्णय घेण्यात यावा आहे हे महाराष्ट्र शासनाला तात्काळ आजच्या सभागृहाचा हवाला देवून कळविण्यात यावे तसे आदेश आपण प्रशासनाला दयावे.

श्री.प्रवीण दटके:— मा.महापौरजी, जे नियोजन म्हणून स्मार्ट सिटी झाले आहे. त्या आरक्षणाची गरज महानगरपालिकेला आहे किंवा नाही. याची दखल त्या बोर्डामध्ये घ्यावी. त्यानंतर एनओसी दयावी एवढीच विनंती आहे. स्मार्ट सिटी शिक्षक कॉलनी नावाची कॉलनी आहे. त्यामध्ये 100 टक्के घरे झालेले आहेत. एक 1500 स्केअर फुटाचा प्लॉट रिकामा आहे त्या घरावर स्वस्त घराचे आरक्षण टाकले आहे असे आरक्षण यांच्याकडे आहे. याची गंभीर दखल आयुक्तांनी घ्यावी आणि गरज नसलेले आरक्षण सोडावे परंतु गरजेचे असेल तर बिल्कुल सोडू नये अशी विनंती आहे.

श्री.प्रदीप पोहाणे:— मा.महापौरजी, स्मार्ट सिटीमध्ये मा.महापौरजी, स्थायी समिती अध्यक्ष म्हणून मी आहे. मा. सत्तापक्ष नेते, मा.विरोधी पक्ष नेते आणि मा.सदस्या मंगला गवरे आपण बोर्ड डायरेक्टर आहे. आपण बघितले तेथे पुष्कळसे घरे आहे जे आरक्षण वगळावयाचे होते ते आरक्षण वगळण्यात आलेले नाही. दोन दिवसानंतर स्मार्ट सिटीची बैठक आहे. आपण आताच म्हटले आहे स्मार्ट सिटीचा विषय म्हणून बोर्ड डायरेक्टर म्हणून बघतो. तर हा विषय आपण ठेवू. जेथे ओपन लॅन्ड आहे तेथील आरक्षण वगळले आणि जेथे लोक राहतात तेथील आरक्षण तसेच ठेवलेले आहे असे आता माजी महापौर यांनी सांगितले. हा विषय स्मार्ट सिटीच्या बैठकीमध्ये घ्यावा.

श्री.तानाजी वनवे:— मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेते यांनी केलेल्या प्रश्नावर महापौरजी आपण रूलिंग दिलेले नाही.

( बेल)

श्री.पुरूषोत्तम हजारे:— मा.महापौरजी, पारडी बाजाराच्या प्रश्न मी सातत्याने मांडत आहे. पारडीचा आठवडी बाजार हायवेवर लागतो. आता त्या ठिकाणी उडाणपुल आणि मेट्रोचे काम सुरू आहे. त्या रस्त्यावर पारडी परिसरात इतके अपघात होत आहेत की प्रत्येक आठवडयात दोन—तीन लोकांचे अपघात होत आहेत. त्या ठिकाणी 200—250 लोक मृत्यूमुखी पावले आहेत याला कोण जबाबदार आहे. मी वारंवारं प्रशासनाला माहिती दिली. ती जागा पारडीमध्ये महानगरपालिकेतर्फे आरक्षित आहे त्यावर नवीन डीपी तयार करावा. पारडी आठवडी बाजाराकरिता जागा देण्यात यावी आणि दुसरे असे की पारडी येथील सुभाष नगर, नेताजी नगर या भागातील पोहाणे साहेब स्थायी समितीचे अध्यक्ष आहेत त्या परिसरातून घाटावर लोक येतात. त्या ठिकाणी प्रेत जाळण्यासाठी घाटावर कमी जागा आहे. महानगरपालिकेने स्मशानघाटासाठी 18 एकर जागा आरक्षित केलेली आहे. माझी आपणांस विनंती आहे आपण त्याकडे प्रामुख्याने लक्ष देवून ते करावे.

महापौर:— मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे एनआयटीने जेवढया 37(1) ची कार्यवाहीच्या संदर्भात एनआयटीने केलेले सर्व आरक्षण स्थगित ठेवण्यात यावे.

प्रश्न क्र.162:— अमृत योजने अंतर्गत शास्त्री ले—आऊट येथे 62 लाख खर्च करुन बगीचा तयार करण्या संदर्भात प्रश्न

श्री.दिलीप दिवे:—मा.महापौरजी, माझ्या प्रभागामध्ये शास्त्री नगर येथे अमृत योजने अंतर्गत निधी खर्च करून बगिचा तयार केला. त्याचे भुमीपूजन मा.पालकमंत्री यांच्या हस्ते झाले आणि बगीचा तयार झाल्यानंतर त्याचे लोकार्पण मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते झाले. आता या बगिच्याची देखभाल करणे ही महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. मी वारंवांर या अनुषंगाने गार्डन विभागाला विचारणा केली. आयुक्त महोदयांना सुध्दा पत्र दिले. त्यानंतर मला जे उत्तर मिळाले त्याच्यामध्ये गार्डनच्या मेंटेंन्स करिता एक निविदा काढली आहे. मला या गार्डनकरिता सुरक्षा रक्षक पाहिजे आहे.

महापौर:— मा.सदस्य श्री.दिलीप दिवे यांच्या प्रश्नाच्या संदर्भात प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी. 3 दिवसामध्ये त्या बगीच्यामध्ये सेक्युरिटी गार्ड ची व्यवस्था करावी. त्याचबरोबर तात्या टोपे नगर बगीच्यात सुध्दा व्यवस्था करावी.

प्रश्न क्र.163:— नागपूर शहरातील अंबाझरी तलावाच्या धरणाची भिंत सुरक्षित नसल्या संदर्भात प्रश्न

श्री.प्रफुल्ल गुडधे:— मा.महापौरजी, अंबाझरी तलावाच्या सुरक्षिततेच्या संदर्भामध्ये प्रश्नाचे उत्तर प्राप्त झाले आहे त्या संदर्भात एक उपप्रश्न आहे. जी माहिती या ठिकाणी उपलब्ध करून दिली त्यामध्ये ज्या बैठका झाल्या, मेट्रो रेल्वे आणि एरिगेशन डिपार्टमेंटच्या, त्या बैठकामध्ये धरणाच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेत धरणाचे आयुष्य संपलेले आहे. त्यामुळे डिकनेक्शींग ऑफ डॅम या संदर्भात महानगरपालिकेला निर्णय घ्यावयाचा आहे. तसेच धरणावर जी झाडे आहेत ती झाडे तोडण्याच्या संदर्भात सुध्दा अनेक बैठकीत निर्णय झालेले आहे. सोबतच 10

कोटी रूपये त्याच्या इनशेटयीव्ह स्टॅम्प म्हणून महानगरपालिकेने खर्च करावा या संदर्भात पत्रव्यवहार एरीगेशन डिपार्टमेंटने केलेला आहे. महानगरपालिका त्या धरणाच्या सुरक्षिततेकरिता कोणकोणत्या कार्यवाहया करणार आहे. जे उत्तर दिले आहे. प्राकलन तयार करण्याचे काम सुरू आहे. ते झाल्यानंतर लगेचच सुरू करू असे मोघम उत्तर दिले आहे. मागे एक धरण फुटले आणि मोठया प्रमाणात जिवीत हानी झाली म्हणून तो प्रसंग या शहरावर येवू नये या संदर्भात महानगरपालिकेला सिरीयसली निर्णय घेणे आवश्यक आहे.

महापौरः— संबंधित अधिका—याने माहिती दयावी.

कार्यकारीअभियंता,जलप्रदाय(श्रीमती मुखर्जी):—आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह. जो पहिला प्रश्न था डिकनेक्शीन ऑफ डॅम धरण सुरक्षा संघटना और पाठबंधारे विभाग इनके रिपोर्ट के अनुसार डिकनेक्शीन ऑफ डॅम करणे की गरज नही है । उसमे सिर्फ मजबुतीकरण करने की जरूरत है । हमने जब ऑन्सर दिया था तब उनका डिझाईन चालू था, अब एरीगेशन विभाग ने 3.18 का एक प्रस्ताव हमको दिया है । उसमे टोटल लेन्थ धरण 9.40 है उसमे से 3.42 धरण के मरम्मत का पैसा मेट्रो देने वाले है । मैने मेट्रो को लेटर लिखा है की 5 कोटी दिया जाये परंतु मेट्रोने फुल एस्टीमेट मांगा है । हमने यह लेटर एरीगेशन विभाग को दिखाया है, और बोला है की 13.65 का आप हमको बायफरकेट करके देंगे, काम हमको उनसे ही करवाके लेना है ।

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मेट्रोने पैसा लेने से मना किया है क्या?

कार्यकारी अभियंता,जलप्रदाय(श्रीमती मुखर्जी):—आदरणीय महापौरजी, मेट्राने 1 कोटी पहिले दे दिया है । वह हमने एरीगेशन को दे दिया है । अब मैने एक 5 कोटी का मोघम मांगा है तो उन्होने उसका डिटेल्स मांगा है । तो मैने एरीगेंशन को उसका बायफरकेट करके मांगा है ।

श्री.प्रफुल्ल गुडधेः— त्यानंतर हे पैसे आपण एरीगेशन विभागाला जमा करणार आहे. कधीपर्यंत करणार आहे. महानगरपालिकेला लवकरच प्राप्त होणार आहे लगेच कार्यवाही करणार आहे असे सांगितले जाते परंतु फाईल पुटअप होईपर्यंत काहीही होत नाही. त्यामुळे काही कालमर्यादा निश्चित केली आहे काय? की करणार आहे. कारण मेट्रो कडून जेव्हा वसुल करावयाचे आहे तेव्हा वसुल करूच. मा. हायकोर्टाने निर्देश दिलेले आहे. महापालिकेने ताबडतोब पैसा जमा करून स्टेटनिंगच्या कामाची सुरूवात केली पाहिजे. कसे होईल, किती दिवसांत होईल जर सहा महिन्यात बायफरकेशन झालेच नाही आणि खेकडयाने तो तलाव फोडून टाकला तर पुन्हा आफत यायची. मा.महापौरजी, महानगरपालिकेला पैसा भरावयास सांगावा. मेट्रोच्या हिस्स्यात आणि महानगरपालिकेच्या हिस्स्यात किती येईल हे जसे जसे निश्चित होईल तसे तसे पैसे वसुल करता येईल. परंतु तोपर्यंत ते काम थांबू नये असे प्रकारचे आदेश आपण दयावे.

श्री.प्रवीण दटकेः— मा.महापौरजी, सन 2015—16 मध्ये 304 झाडाची मोजणी झाली होती आणि त्याचे कापण्याचे टेंडर आणले होते. कोठल्याही धरणावर मोठे झाड असेल तर ते मोठे झाड कापण्याची सरकारने परवानगी दिली होती. कारण त्या झाडामुळे ते धरण कमजोर होत चालले होते. 304 झाड कापण्याचे, त्या टेंडर होते त्या संदर्भात काय झाले ते पण सांगून दिले तर बरे होईल.

अधिक्षक(उद्यान विभाग)श्री.चोरपगारः—मा.महापौरजी, या धरणावरची झाडे कापण्याकरिता तीन वेळा निविदा बोलाविल्या होत्या. परंतु कोणीही रिस्पॉन्स दिला नाही.

श्री.प्रवीण दटकेः— मा.महापौरजी, ही झाडे मोठी झाली आणि दुर्दैवाने एखादया वेळेस बांध फुटला तर आपण काय ठेकेदाराची वाट पाहणार आहे काय? दिवसेंदिवस तो बांध कुचकामी होत चालला आहे. सन 2016 मध्ये ऑडीट झाले होते चिटणवीस साहेब वॉटर डिपार्टमेंटला होते. त्यांनी त्याच्यानंतर वारंवारं पत्रव्यवहार केला ही झाडे कापून दया परंतु आजपर्यंत झाडे कापले नाही. ठेकेदार येत नसेल तर महानगरपालिकेने आपली व्यवस्था केली पाहिजे.

अधिक्षक(उद्यानविभाग)श्री.चोरपगारः—मा.महापौरजी, गार्डन विभागाकडून झाडे कापण्यासाठी 15 दिवसांच्या आंत कार्यवाही करण्यात येईल.

महापौरः— 15 दिवसांच्या आंत विभागाकडून झाडे कापण्याची कार्यवाही करावी. मेट्रो रेल्वे आणि महानगरपालिका यांच्यात द्यावयाच्या हिस्स्याच्या संदर्भात बायफरकेशन कसे करता येईल आयुक्तांनी या विषयावर लक्ष घालावे.

प्रश्न क्र.164:– वर्ष 2012 पासुन ते वर्ष 2019 पर्य पाणीलाईन बाबत किती शट डाऊन झालेले आहेत? संदर्भात

श्री.तानाजी वनवे:– मा.महापौरजी, सन 2012 ते 2019 पर्यंत 301शटडाऊन केलेले आहे आणि याच्यामध्ये पाणी किती वाहून गेले याची काही माहिती दिलेली नाही. शटडाऊन झालेल्या ठिकाणी लिकेजेस मधून किती पाणी वाहून गेले याची कार्यालयाने माहिती दयावी.

महापौर:– संबंधित अधिका–याने माहिती दयावी.

कार्यकारीअभियंता,जलप्रदाय(श्रीमती मुखर्जी):–आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह. सर, आपने प्रश्न पुछा था की पेंच और कन्हान मे कितने बार शटडाऊन हुए । जब शटडाऊन हुआ तब पानी तो शहर मे गया नही ।

श्री.तानाजी वनवे:– मा.महापौरजी, कितीदा शटडाऊन झाले आणि याच्यामध्ये लिकेजेसमुळे पाणी किती वाहून गेले याची काही माहिती विचारत आहे. जे आपण लिकेजेस दुरूस्त केले ते लिकेजेस होते म्हणून शटडाऊन दिले आहे.

कार्यकारीअभियंता,जलप्रदाय(श्रीमती मुखर्जी):–आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह. ॲक्च्युअल मे मुझे क्लिअर नही हुआ इसलिए मैने सभी मुद्दे लिख दिये ।

श्री.तानाजी वनवे:– मा.महापौरजी, सन 2012–2019 पर्यंत 301 शटडाऊन केलेले आहे म्हणजे लिकेजेस दुरूस्त केलेले आहे. जे लिकेजेस दुरूस्त केले त्या लिकेजेस मधून पाणी किती वाहून गेले याची माहिती आणि किती पाणी वाहत होते म्हणून शटडाऊन करण्याची आपल्याला आवश्यकता होती. लिकेजेस दुरूस्त करणे आवश्यक होते काय?

कार्यकारीअभियंता,जलप्रदाय(श्रीमती मुखर्जी):–आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह. सर लिकेजेस दुरूस्त करना आवश्यक थे परंतु 301 का जो लिस्ट दिया था वो कंम्प्लेटली लिकेजेस का नही है । जो कन्हान मे ट्रिपींग हुआ है वह भी वो लिस्ट मे आया है ।

श्री.तानाजी वनवे:– मा.महापौरजी, त्याच्यामध्ये क्लिअर कट दिलेले आहे. कन्हान लाईनची, मुख्य लाईनची गळती, पंपिंग स्टेशन, इन्टरकनेक्शन, वॉल दुरूस्ती आणि मुख्य लाईनची दुरूस्ती यामध्ये जवळपास सर्वच प्रकारची दुरूस्त्या आहेत. यामधून पाणी वाहत असल्यामुळे आपण दुरूस्त्या केल्या की नाही. मग लिकेजेस मधून किती पाणी वाहत होते याचा आपल्याकडे डाटा असला पाहिजे.

श्रीमती आभा पांडे:– पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझ्याकडे कन्हान डब्युटीपी शटडाऊन चे दोन पेजेस आहेत जे मी आपल्या विभागाकडून घेतले होते. त्याच्यामध्ये सांगितले आहे ट्रिपींग झाले म्हणून बंद झाले आहे. याची जी नोंद आहे ती कन्हान डब्लूटीपीला असते काय? काय नोंद असते ट्रिपींग आहे म्हणून टाकल्या जाते काय?

कार्यकारीअभियंता,जलप्रदाय(श्रीमती मुखर्जी):–आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह. कन्हान डब्लूटीपी मध्ये जो रजिस्टर रहता उसमे लिखा रहता है कि कितने बजे से लेकर कितने बजे तक ट्रिपींग हुई, कितने बजे तक हम पानी दे नही पाये ।

श्रीमती आभा पांडे:–मा.महापौरजी, माझ्याकडे 08.01.2018 ते 16 फेब्रुवारी 2018 पर्यंत तुमच्या विभागाकडची रिडींग आहे की केव्हा केव्हा कन्हान डब्लु.टी.पी.ला ट्रिपींग झाली आहे. मी जेव्हा डब्लु.टी.पी.ला जावून रजिस्टर चेक केले त्यामध्ये तफावत आहे. याला जबाबदार कोण असणार आहे. आम्ही वारंवारं तेथे जावू शकत नाही. आम्हांला सांगण्यात येते की ट्रिपींग झाली आहे म्हणून पाणीपुरवठा झाला नाही असे सांगितले जाते. ही तफावत दिसत आहे तर याला कोण जबाबदार राहणार आहे. कारण त्या रजिस्टर मध्ये आणि या रिडींगमध्ये तफावत होती. ही तुम्ही शहानिशा करू शकता, याला जबाबदार कोण राहणार आहे.

कार्यकारीअभियंता,जलप्रदाय(श्रीमती मुखर्जी):–आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह. वो तफावत मै चेक कर लेती हूँ और जो भी कार्यवाही है मै करती हूँ ।

श्रीमती आभा पांडे:–मा.महापौरजी, इसके बाद ऐसी गलती न हो इसकी खबरदारी लेनी चाहिए । यह हम सबकी नैतिक जबाबदारी है । हम जनता को जबाब नही दे सकते । अगर कंपनी और प्रशासन के लोग और डब्लु.टी.पी. के लोग हमारे साथ गेम खेल रहे होगें तो हम बहोत बडा गेम खिलायेंगें ।

श्री.तानाजी वनवे:– मा.महापौरजी, याचा सविस्तर अहवाल पुढच्या सभागृहामध्ये आपण दयावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.ऋषिकेश(बंटी) शेळके:— मा.महापौरजी, लोखंडी पुल आहे आपण तेथून घरी जात येत असाल. कित्येक वर्ष झाले त्या पुलाखालून हजारो एमएलडी पाणी वाहून राहिले. आपण बघतच असाल. ते पिण्याचे पाणी आहे फोर्टवरून येते. 10 वर्षापासून हे पाणी वाहत आहे.

श्री.तानाजी वनवे:— मा.महापौरजी, मी 1985 पासून हे लिकेजेस पाहत आहे.

महापौर:— आतापर्यंत लोखंडी रेल्वेपुल या लिकेजेसवर काय काय कार्यवाही केली. 10 वर्षापासून कां करू शकले नाही याचे कारण काय? त्याची माहिती सांगावी.

कार्यकारीअभियंता,जलप्रदाय(श्रीमती मुखर्जी):—आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह. लक्ष्मणझुला के नीचे लिकेजेस है वहां पर तीन मेन पाईपलाईन जा रही है । इसको मै कट करू तो जो एक दिन आड पानी जा रहा है वह और बढ जायेगा ।

श्री.ऋषिकेश(बंटी) शेळके:— मा.महापौरजी, एक दिन आड पानी देने के बावजुद भी मेरे प्रभाग मे गंदा पानी आ रहा है । सन्माननीय प्रवीण दटके भी हमारे साथ वहां के नगरसेवक है । एक दिन आड पानी देने पर नंदाजी नगर, शिवाजी नगर, सिरसपेठ यहां पर गंदा पानी आ रहा है । गोंडपुरा मे गंदा पानी आ रहा है । एक दिन आड पानी देने पर भी गंदा पानी आ रहा है ।

(बेल)

श्री.पुरूषोत्तम हजारे:— मा.महापौरजी, आज आपण जे सभागृहात पानी पित आहे त्याची दुर्गधी येत आहे.

महापौर:— कॉटन मार्केट लोखंडी पुलाच्या खाली वाहणा—या पाण्याच्या संदर्भात कार्यकारी अभियंता जलप्रदाय यांनी स्वःत लक्ष घालून कार्यवाही करावी. कार्यकारी अभियंता जलप्रदाय यांनी लिकेजेसच्या संदर्भात डाटा तयार करावा व मा.विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे यांनी जो वर्ष 2012 पासुन ते वर्ष 2019 पर्यत पाणीलाईन बाबत किती शट डाऊन झालेले आहे याची माहिती मागितलेली आहे त्याचा अहवाल त्यांना सादर करावा.

प्रश्न क्र.165:— नागपूर शहर में जितने भी मोबाईल टॉवर संदर्भात प्रश्न

महापौर:— प्रश्नोत्तराच्या तासातील हा शेवटचा प्रश्न आहे.

श्री.राजकुमार साहू:— मा.महापौरजी, मुझे जो प्रश्न का उत्तर मिला है वह समाधानकारक नही है । इसमे कहां गया है की सन 2010 से नये टावर लगाने के लिए जो 3 साल की मुदत दी गई थी वो खतम हो गई है । फिर भी टावर यथायोग्य बना है । इसमे हमारी क्या जिम्मेदारी बनती है । वो टावर 3 साल की मुदत खतम होने के बावजुद टावर जो के त्यो खडा है । लोगो के स्वास्थ्य पर जो प्रभाव पड रहा है तो हमारे प्रशासक की क्या जिम्मेदारी है ।

श्रीमती वैशाली नारनवरे:— मा. महापौरजी, सभागृहात आज संपुर्ण प्रश्न घेण्यात यावे कारण कालही सभागृह संपुर्ण झालेले नाही. परंतु एक महिना सभागृह होणार नाही म्हणून सर्वाचे समाधान होईल त्याप्रमाणे प्रश्न घ्यायला पाहिजे. आमचे सदस्य आहेत नत्थुजी वालदे त्यांचा प्रश्न घ्यायला पाहिजे.

श्री.राजकुमार साहू:— मा.महापौरजी, मुझे जो प्रश्न का उत्तर मिला है उसमे कहां गया है की सन 2010 मे नॉन परमनंट टावर लगाने के लिए जो 3 साल की मुदत दी गई थी वो खतम हो गई है । तो हमारी क्या जिम्मेदारी क्या बनती है उसके लिए हमने क्या कार्यवाही की तथा उनको रेग्युलाईज करने के लिए क्या कदम उठाये इसकी मुझे जानकारी दी जाये ।

महापौर:— संबंधित अधिका—याने माहिती दयावी.

श्री.जितेंद्र कुकडे:—मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मी मागे प्रश्न लावला होता. जेवढे अवैध टावर आहे ज्याच्यामुळे लोकांना त्रास होतो. त्यासाठी कुणाची परवानगी घेतली नाही घेतली. महानगरपालिकेची परवानगी घेतली आहे किंवा नाही. आतापर्यंत त्यावर काय कार्यवाही झाली असा प्रश्न लावला होता. त्याचे अद्याप उत्तर आलेले नाही. जे अवैध टावर आहेत ते कुठल्याही कंपनीचे असोत ते तशाच्यातशेच आहेत. त्यावर महानगरपालिकेकडून काय कार्यवाही केली याचे उत्तर मिळालेले नाही. त्याचा संबंधित मागच्यावर्षी मी प्रश्न टाकला होता त्याचे अजूनपर्यंत उत्तर मिळालेले नाही.

मो.जमाल:— मा.महापौरजी, इस प्रश्न पर आपने रूलिंग भी दिया था । मा.प्रवीणजी दटके इन्होने मोबाईल टावर के बारे मे संक्षिप्त मे सभागृह को अच्छे से बताया था की टावर का किसप्रकार गैरजिम्मेदारी से इस्तेमाल किया जा रहा है । आपने सभागृह मे रूलिंग देने के बावजूद इस प्रशासन ने अभी तक कोई कार्यवाही की

नही । नतीजा यह है की फिर से सत्तापक्ष के नगरसेवक के द्वारा फिर से इस सभागृह मे प्रश्न उपस्थित किया गया । इस प्रश्न पर आप क्या रूलिंग करेगें मा.महापौरजी, मै आपसे फिर से कह रहा हूँ की आपने दी हुई रूलिंग का महत्व यहां पर प्रशासन नही दिखा रहा है । मा. महापौरजी, आप रूलिंग देते हो उसपर क्या कार्यवाही होती है । उसके लिए एक समिती गठीत की है परंतु उस समिती का भी कोई भी अहवाल आया नही है । इसलिए आप ऐसी कडक कार्यवाही करे की आपके दिये हुए रूलिंग का महत्व बढे । मा.नगरसेवक द्वारा उपस्थित किये गये प्रश्नो पर उचित कार्यवाही हो ।

श्री.प्रदीप पोहाणेः– मा.महापौरजी, प्रशासनाने माझ्या एक प्रश्नाचे उत्तर दयावे. मा.नगरसेवकांनी जो प्रश्न केला तो एन.आय.टी. च्या संदर्भात आहे परंतु ज्यांच्या घरावर टावर लागतो त्यांच्याकडून कमर्शियल टॅक्स घेण्यात येतो काय? याची माहिती देण्यात यावी.

श्री.विजय झलकेः– पाईंट ऑफ इन्फॉमेशन, टावरच्या संदर्भातील एक प्रश्न आहे. मा.महापौरजी. अनेक नागरिकांमध्ये असा संभ्रम आहे की टावर मुळे आरोग्याला धोका निर्माण होतो. त्याबद्दलही सविस्तर माहिति देण्यात यावी.

श्री.जितेंद्र कुकडेः–मा.महापौरजी, अजून एक प्रश्न आहे. आपल्या नागपूर शहर नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये एकुण अवैध टावर किती आहेत त्याची आपल्याकडे नोंद आहे काय? जर नोंद असेल तर त्याची यादी दयावी आणि असेल तर त्याच्यावर आतापर्यंत आपण काय कार्यवाही केली.

सहा.संचालक नगररचना(श्री.गोंडाणे):मा.महापौरजी,नागपूरमहानगरपालिका हद्दीमध्ये 800 विद्यमान टावर कंपनीने उभारलेले आहे. ही कर आकारणी ज्या ज्या टावरवर केली आहे त्या अनुषंगाने ही आकडेवारी आहे.

श्री.कमलेश चौधरीः–मा.महापौरजी, अनधिकृत किती आहेत त्याचाही आकडा देवून दयावा.

सहा.संचालक नगररचना(श्री.गोंडाणे):–मा.महापौरजी, अनधिकृतच आहेत. परंतु 2010 रूफ टॉप टावर उभारण्याकरिता तीन वर्षाकरिता परवानगी देण्याकरिता ठरविण्यात आले होते. त्यानंतर 425 मोबाईल टावरला परवानगी दिली होती त्याची मुदत संपली होती. त्यानंतर आपल्या महानगरपालिकेतर्फे कार्यवाही सुरू केली होती परंतु मा.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन 2043, 2014, 2047, 2045 यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक 25. 09.2014 व दिनांक 12.02.2014 यावर कोणत्याही प्रकारची ॲक्शन घेवू नये. कोणतेही टावर सील करून नये व त्यांचा विजेचा पुरवठा बंद करू नये असा आदेश पारीत केला होता.

श्री.जितेंद्र कुकडेः–मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फॉमेशन, हा हायकोर्टाचा आदेश आहे तो काही कंपन्या कोर्टात गेल्या होत्या त्यांच्यासाठी आहे. बाकीच्या टावरकरिता आदेश नव्हता.

श्री.कमलेश चौधरीः–मा.महापौरजी, असे किती तरी टावर आहेत त्याची महानगरपालिकेमध्ये नोंदच नाही आहे. त्यांनी सुध्दा टावर उभारून ठेवलेले आहे. ते टावर बंद पडलेले आहेत. त्यांना आपल्या महानगरपालिकेतर्फे एकही पत्र देण्यात आले नाही.

श्री.जितेंद्र कुकडेः–मा.महापौरजी, ज्या वेळेस कंपन्या कोर्टात गेल्या त्यावेळेस ते झाले आहे आता नवीन उभारून राहिले त्यांच्या बाबतीत काय नियम करीत आहे.

श्रीमती आभा पांडेः– मा.महापौरजी, पाईंट ऑफ ऑर्डर. ही सुध्दा माहिती देण्यात यावी की जेव्हा टावर लावण्याची परवानगी त्यांना देतो त्यावेळेस कोणकोणते निकष पाळायला पाहिजे. जर त्या परिसरातील नागरिकांनी अप्लीकेशन सहा.आयुक्त किंवा कार्यालयाकडे दिली असेल की या टावरमुळे आम्हांला त्रास होत आहे हे टावर आम्हांला मान्य नाही. या परिस्थितीत टावर उभारू शकतो काय? याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.पुरूषोत्तम हजारेः– मा.महापौरजी, माझ्या परिसरातील प्रभाग 25 मधील महिलां पोलीस स्टेशनमध्ये जावून तक्रार गेल्या होत्या तरी त्या ठिकाणी टावर लावण्यात आले आहे.

श्री.मनोज सांगोळेः– मा. महापौरजी, नागपूर शहरात चौकाचौकामध्ये टावर लागलेले आहेत. रस्त्यावर चौकाचौकामध्ये पेटया लागलेल्या आहेत. युटर्न करतांना गाडयांचे खुप अपघात झाले आहेत. हे टावर कुणाच्या परवानगीने लावलेले आहेत. नॅशनल हायवेची परवानगी आहे की याला महानगरपालिकेची परवानगी आहे काय?याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

श्रीमती दिव्या धुरडेः– मा.महापौरजी, माझ्या परिसरात चार–पाच ठिकाणी विना परवानगी टावर उभारण्यात आले तेव्हा परिसरातील लोकांनी निवेदन दिले तेव्हा ते काम थांबविण्यात आले. परंतु बिल्डींगवरती

स्ट्रक्चर उभे झालेले ते अतिक्रमण कुणी काढावे त्याचे उत्तर मला हवे आहे.

सहा.संचालक नगररचना(श्री.गोंडाणे):–मा.महापौरजी, अनधिकृत टावरकरिता एक वर्षाची अस्थायी परवानगी देण्यासंदर्भात दिनांक 29.01.2019 ला ठराव क्रमांक 329 पारीत करण्यात आला होता. त्याच्यामध्ये तीन प्रकार निश्चित केले होते. ज्या ठिकाणी ऑक्युपेंसी सर्टीफिकेट बिल्डींग परवानगी असेल किंवा ज्या ठिकाणी बिल्डींग परमीशन असेल किंवा ज्या ठिकाणी बिल्डींग परमीशन नसेल त्या ठिकाणी कारण केंद्र शासनाचे आणि राज्य शासनाच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने इतर कोणतीही कार्यवाही करता येत नाही. हा टेली कम्युनिकेशनचा विषय आहे आणि सर्वसामान्यांचा विषय असल्यामुळे याबाबत एक वर्षाची अस्थायी परवानगी देण्यासंदर्भात महासभेने दिनांक 29.01.2019 रोजी ठराव पारीत करून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरू केली आहे. त्याची एक चेकलिस्ट तयार केली आहे आणि चेकलिस्ट प्रमाणे कार्यवाही सुरू आहे. त्या मध्ये त्या इमारतीचे स्ट्रक्चर, इबीलीटी सर्टीफिकेट, त्या सोयायटीत राहणा–या सर्व लोकांचा एनओसी सर्टीफिकेट आणि तो कोणत्या क्षेत्रावर बांधलेला आहे. नगररचना फक्त रूफ टॉपवर एफएसवर उभारलेल्या टॉवरच्या संदर्भात बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने कार्यवाही करीत असते. आता आपण त्या टॉवरला परवानगी दिली आहे. ज्या वेगवेगळया कंपन्या आहेत त्या कंपन्यांना आपण बांधकाम परवानगी देतांना जे अपेक्षित आवश्यक कागदपत्रे आहेत त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याची पुर्ण छाननी केल्यानंतरच परवानगीची शिफारस करीत असतो.

श्री. राजकुमार साहू :–मा.महापौरजी, हमारे क्षेत्र मे आऊटर भाग मे यह मोबाईल टॉवर कुकुरमुत्ते की तरह एक जगह तीन–तीन, चार–चार मोबाईल टॉवर फैले हुये है । उसके प्रति शासन की क्या जिम्मेदारी बनती है और क्यु नही कर रहे है ।

श्री.जितेंद्र कुकडे:– मा.महापौरजी, माझा प्रश्न असा आहे की आतापर्यंत त्या अवैध टॉवर वर काय कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी.

महापौर:– गावंडे साहेब यांचा प्रश्न लक्षात आला आहे काय? जे अवैध टावर आहेत त्यांच्यावर काय कार्यवाही केली आहे ते सांगण्यात यावे. अनेक आक्षेप आहेत.

सहा. संचालक नगररचना(श्री.गोंडाणे):–मा.महापौरजी, नगररचना विभागाकडून परवानगी देण्यात येते परंतु त्या अनुषंगाने कार्यवाही ही झोन कार्यालयाकडूनच करण्यात येते.

श्रीमती आभा पांडे:– पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, जर झोन कार्यालयात आजूबाजूच्या लोकांनी तक्रारी केली असेल ते अवैध टावर काढून टाकण्यात यावे तर प्रशासनाने काय कार्यवाही केली पाहिजे आणि जर तक्रार केली आहे तर प्रशासनाने ते टावर डिएक्टीव्ह केलेले आहे परंतु स्ट्रक्चर काढलेले नाही. दिव्या ताईचा प्रश्न खुप चांगला आहे. ते टॉवर डिएक्टीव्ह केल्यानंतर स्ट्रक्चर काढण्याची जबाबदारी कोणत्या विभागाची आहे या प्रश्नाचे उत्तर दयावे.

श्री.प्रवीण भिसीकर:– मा.महापौरजी, जेव्हा ते टॉवर लागते तेव्हा त्या टॉवरची फ्रिक्वेंसीचे नार्म्स् आहेत ते तपासण्यात येते काय? त्या टॉवरची फ्रिक्वेंसीच्या संदर्भात नार्म्स आहेत. एक मीटर बाय एक मीटर 600 वॅट फ्रिक्वेंन्सी राहते त्याच्या वर देवू शकत नाही. कारण रेडीएशन फ्रिक्वेंसी मानवी शरीराला घातक राहते. मा. महापौरजी, प्रत्येक टॉवरची रेडीएशन फ्रिक्वेंसी ऑडीट करू शकतो काय? आणखी एक नार्म्स् आहे ज्या बिल्डींगवर टॉवर लागते त्याला पेन्ट लागते तो वेगळया टाईपचा पेंन्ट राहतो. आज काळाची गरज आहे टॉवर लागले पाहिजे परंतु नियमानुसार लागले पाहिजे कारण जी रेडिएशन फ्रिक्वेंसी असते ती मानवी शरीराला हानीकारक असते.

श्री.कमलेश चौधरी:– मा. महापौरजी, आमचा टावर लावण्यावर विरोध नाही. जे अवैध टावर लावण्यात आले आहे ते काढण्यात यावे.

(बेल)

महापौर:– सगळयांचा विषय लक्षात आला आहे. जबाबदारी आपण निश्चित करू. प्रत्येक झोनच्या सहा. आयुक्तांवर जबाबदारी निश्चित करू. आपण त्यांना 15 दिवसाचा वेळ देवू. सहा.संचालकाने प्रत्येक झोनचे सहा. आयुक्त माहिती घेतील.

श्री.विजय झलके:–मा.महापौरजी, या टावर मुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो काय? माझी एक सुचना आहे. या टावरच्या परवानगीचे जे निकष आहेत त्या संदर्भातील सर्व माहिती संपुर्ण नगरसेवकांना सहा. संचालकाच्या मार्फत एक पत्रक काढून देण्यात यावी.

श्री.जितेंद्र कुकडेः—मा.महापौरजी, हा विषय मागच्या वर्षी लागला होता. ती कार्यवाही झाली नाही झाली याला एक वर्ष लागला आहे. मा.महापौरजी आपण रूलींग दयावे. आपण आदेश काढावे किती दिवस लागतील.

महापौरः— सहा. संचालक नगररचना यांनी या विषयावर लक्ष घालावे त्यांनी प्रत्येक झोनच्या सहा. आयुक्तांकडून वैध व अवैध मोबाईल टॉवरच्या संदर्भात माहिती घ्यावी. किती अवैध टॉवर लावण्यात आले आहे आणि त्याच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे याकरितासंबंधित सहा.आयुक्तांना 15 दिवसाची वेळ देण्यात यावी. प्रत्येक झोनचे सहा.आयुक्त वैध व अवैध टॉवरच्या संदर्भात सहा.संचालक नगररचना यांना माहिती देतील त्यानंतर टॉवर्सच्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(बेल)

महापौरः— आपण विषयपत्रिकेला सुरूवात करू या.

मो.जमालः— मा.महापौरजी, प्रश्नोत्तर का कार्यकाल पुरा किजीये मा.महापौरजी.

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, चार प्रश्न शिल्लक राहिले आहेत. ही सर्वसाधारण सभा फेब्रुवारी महिन्यानंतर झालेली नाही.

महापौरः— ऑलरेडी अर्धा तास जास्त दिला आहे. प्रत्येक प्रश्नाला पाच—पाच मिनिटे देण्यात येते.

प्रश्न क्र.166ः— मनपा नागपूर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत वार्ड अधिकारी/सहा. आयुक्त यांना कोणत्या कलम/अधिकार अंतर्गत वर्क ऑर्डर (कार्यादेश) वर स्वाक्षरी करण्याचे अधिकार संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः— वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र.167ः— नागपूर महानगरपालिकेत असलेल्या अस्थायी वाहनचालकांना आलेल्या हायकोर्टच्या आदेशा संदर्भात प्रश्न

श्री.कमलेश चौधरीः—मा.महापौरजी, यह प्रश्न हायकोर्ट से संबंधित था । विभाग मे ड्रायव्हरो के नियुक्ती को लेकर हायकोर्ट मे प्रीटीशन चालू थी । जो आर्डर की कॉपी विभाग के माध्यम से मिली उसके बारे मै कुछ कहना चाहूँगा । जो आर्डर हमको हायकोर्ट से आया है उसपर आगे क्या नियोजन करने वाले है इसका खुलासा सदन के माध्यम से किया जाये ।

महापौरः— अधिका—याने माहिती दयावी.

श्री.शेख(अपर आयुक्त)ः— सन्माननीय महापौर महोदया, सन्माननीय सभागृह. जो प्रश्न मा.सदस्यांनी विचारलेला आहे. त्या अनुषंगाने सध्या स्थिती अशी आहे की हायकोर्टाने जे आर्डर दिले आहेत ते महानगरपालिकेच्या विरोधातील असून आता आपण मा.सुप्रीम कोर्टामध्ये त्या विरोधात अपील दाखल केलेले आहे.

श्री.कमलेश चौधरीः—मा.महापौरजी, आतापर्यंत आपण अशा किती केसमध्ये सुप्रीम कोर्टामध्ये गेले आहे.

श्री.शेख(अपर आयुक्त)ः— मा.महापौरजी, त्याची संख्या सध्या माझ्याकडे नाही आहे.

श्री.कमलेश चौधरीः—मा.महापौरजी, ती संख्या काढावी आणि सदनाला दयावी. कारण असे आहे. याच्या अगोदर ही सदनामध्ये बाहेरचे ड्रायव्हर जे नेमणुक करण्यासाठी प्रस्ताव घेतला होता आणि त्यावर बाल्या भाऊने प्रश्न उपस्थित केला होता. तेव्हा आपण रूलींग दिली होती मा.महापौरजी की जोपर्यंत हा आपल्याकडे जे अस्थायी ड्रायव्हर आहेत. अस्थायी कर्मचारी आहेत जोपर्यंत यांचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत त्यांना घेण्यात येत नाही. मा.महापौरजी, आपल्याला माहीत आहे की नाही माहीत नाही. परंतु इन्टरव्यू न घेता ते 16 ड्रायव्हर फायरमध्ये घेण्यात आले आहेत मा.महापौरजी.त्यामुळे हा प्रश्न आपल्या नागपूर महानगरपालिकेमध्ये.

श्री. नरेंद्र(बाल्या) बोरकरः— पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, आपण रूलींग दिले होते की जोपर्यत अस्थायी ड्रायव्हर, अस्थायी कर्मचारी आपण घेत नाही तोपर्यंत नेमणुक करायची नाही. आपल्या रूलींगला मान्यता नाही आहे काय? कंत्राटवर घेतलेल्या कर्मचा—यांना दोन—चार महिन्यात परमानंट केले.

श्री.कमलेश चौधरीः—मा.महापौरजी, सदनामध्ये काय परिस्थिती आहे की एका साध्या प्रश्नाचे उत्तर अधिका—याला देत येत नाही.

श्री.शेख(अपर आयुक्त)ः— सन्माननीय महापौर महोदया, सन्माननीय सभागृह. मा. हायकोर्टामध्ये जे आर्डर झाले आहेत ते कर्मचा—यांच्या फेवर मध्ये झालेले आहेत. त्याच्यामध्ये बॅक वेजेस दयावे अशा प्रकारचे आदेश सुध्दा पारित झाले आहेत त्यामुळे बॅक वेजेस आणि बॅक डोअरचा सुध्दा मुद्दा होता. त्या आधारावर आपण सुप्रीम कोर्टामध्ये अपील दाखल केलेली आहे.

श्री.कमलेश चौधरीः–मा.महापौरजी, याच्या अगोदर त्याचे निवेदन वगैरे आले होते काय? बॅक वेजेसचा जो मुद्दा आपण म्हणत आहेत ते बरोबर आहे. हायकोर्टाने बॅक वेजेस देण्याचे त्या आर्डरमध्ये सांगितले आहे. आपण बॅक वेजेस म्हणत आहात परंतु आर्डर मध्ये बॅक वेजेस व्याजासहीत देण्याविषयी म्हटले आहे. त्या आर्डरच्या आधी ते आपल्याकडे येवून गेले काय? त्यांनी निवेदन वगैरे दिलेले आहेत काय? त्याची माहिती दयावी.

श्री.दयाशंकर तिवारीः– पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी, यह जो विषय मा.न्यायालय मे गया तो न्यायालय मे जाते समय नागपूर महानगरपालिका को हमारा अभिवक्ता संघ है जो हमने नियुक्त किया है क्या वह मा.न्यायालय मे इस विषय समझाने मे असफल रहा । क्योंकि कोर्ट का जो आदेश है उसको मैने पढा है । कोर्ट के आदेश मे जो कंत्राटी कर्मचारी है इसको इनमे परमानंट किया जाये । मै आपके माध्यम से पुछना चाहता हूँ की क्या यह कंत्राटी कर्मचारी है क्या?

श्री.प्रवीण दटकेः– मा.महापौरजी, भैय्याच्या प्रश्नाला माझा उपप्रश्न आहे. आपण ही केस तिस–या कोर्टात हरलो आहे. म्हणजे पहिल्यांदा आपण इंडस्ट्रीयल कोर्टात हरलो. मग आपण जिल्हा कोर्टात हरलो मग हायकोर्टात हरलो. यात आपल्या कायद्याच्या सल्लागाराने बायफरकेशन केले काय? भैय्यांचा जसा प्रश्न आहे. एकीकडे कंत्राटी कर्मचारी आहेत आणि एकीकडे डेली वेजेस चे कर्मचारी आहेत. जेव्हा आपण इंडस्ट्रीयल कोर्टात हरलो तेव्हाच आपण हे बायफरकेशन करायला पाहिजे होते. समजा ऐवजदार आहेत तर त्यांना ऐवजदाराचे काम द्यायला पाहिजे होते आणि जे कंत्राटी आहेत त्यांना कंत्राटी काम द्यायला पाहिजे होते. परंतु आपल्या प्रशासन एखादी केस लागली तर प्रशासनच कर्मचा–यांची पिळवणूक करते. त्यांच वेळेस कंत्राटी कर्मचारी जे डेली वेजेसवर होते त्यांना त्यावेळेला ड्रायव्हरचे काम दिले असते. त्यांनी आयुष्यभर गाडया चालविल्या त्यांना आपण दिले नाही आणि मग दोन्ही कल्ब झाले आणि कोर्टात गेले म्हणून ही प्रशासन योग्य वेळी खबरदारी घेईल तर कायद्याच्या चौकटीत राहून कपले साहेब येथे असतील तर त्यांना पण येथे बोलवावे. त्यांनी नोट लिहिली आहे ती मी वाचली आहे. परंतु आपले लोक त्याकडे लक्षच देत नाही.

श्री.कमलेश चौधरीः–मा.महापौरजी, हा जो प्रश्न झालेला आहे. त्या प्रश्नावर जे कर्मचारी परमानंट झाले आहे त्यांना आपण एका परिवाराच्या रूपामध्ये सामावून टाकले आहे तर...

श्री.दयाशंकर तिवारीः–मा.महापौरजी, मेरे प्रश्न का उत्तर मिल जाये तो आगे चर्चा की जाये ।

श्री.शेख(अपर आयुक्त)ः– सन्माननीय महापौर महोदया, सन्माननीय सभागृह. याचिका क्रमांक 197 सन 2004 मध्ये 39 कर्मचारी गेले होते आणि त्यानंतर याचिका क्रमांक 217/2011 मध्ये 37 कर्मचारी गेले होते. या 39 किंवा 37 कर्मचा–यांमध्ये ऐवजदार कर्मचारी आहेत. रोजंदारी आणि सफाई कर्मचारी आहेत.

श्री.दयाशंकर तिवारीः–मा.महापौरजी, न्यायालय मे जिस समय हमारा वकील गया तो क्या न्यायालय के सामने उसने कंत्राटी कर्मचारी और सब्स्टीटयुड लेबर इन दोनो के अंतर को डिफेंड किया । क्या हमने लिस्ट को बायफरकेट किया । क्या न्यायालय मे हमारी भुमिका रखते समय ऐवजदार याने क्या? कंत्राटी याने क्या? सब्स्टीटयुड याने क्या? इन दोनो की डेफीनेशन अलग अलग करी । सारे को हमने क्लब करके सारे कर्मचारी को कंत्राटी कहां तो हम यह वकील क्यु रखते है । और जिस वकील ने इस तरहा से किया तो क्या उसे ब्लॅक लिस्टेड करेंगे । और अब हम सुप्रीम कोर्ट मे जा रहे है तो कंत्राटी कर्मचारी और सब्स्टीटयुड लेबर दोनो को अलग अलग डिफेंड करेंगे । क्या उस यादी का बायफरकेशन करेंगें । डिपार्टमेंट से जो व्यक्ति नोट तयार करके भेजता है तो उस अधिकारी ने हमारे वकील को समझाया नही क्या? क्या कारण है की न्यायालय मे हम हमारी भुमिका रख नही सके । इसपर सखोल चर्चा होनी चाहिए । और इसमे क्या यह जानकारी आपके माध्यम से मा. अधिकारी ने देनी चाहिए ।

महापौरः– माहिती देण्यात यावी.

श्री.शेख(अपर आयुक्त)ः– सन्माननीय महापौर महोदया, सन्माननीय सभागृह. आपण कोर्टाच्या समोर ऐवजदार कर्मचा–यांची संख्या, रोजंदारी कर्मचा–यांची संख्या आणि सफाई मजदुरांची संख्या अशा प्रकारची एक लिस्ट आपण केलेली होती.

श्री.कमलेश चौधरीः– मा.महापौरजी, चुकीची माहिती होत आहे. एक सांगा आपण त्यांना ऐवजदार म्हणत आहे तर त्यांना ड्रायव्हर म्हणून लिखीत आर्डर दिलेले आहेत. 2003 ऑलरेडी डिपार्टमेंटमध्ये त्यांचा ट्रायल झालेला आहे.

श्री.दयाशंकर तिवारीः—पाईंट ऑफ इर्न्फोमेशन मा.महापौरजी, ऐवजदार म्हणजे काय? ऐवजदार म्हणजे झाडू लावणारा होते काय? ऐवजदार चा असा अर्थ आहे सब्स्टीटयुड लेबर. सब्स्टीटयुड लेबर कुठेही काम करू शकते. कुणाचेही जागेवर काम करू शकते. सब्स्टीटयुड लेबर म्हणजे झाडू लावणारा होत नाही.

श्री.कमलेश चौधरीः— पाईंट ऑफ इर्न्फोमेशन मा.महापौरजी, सब्स्टीटयुड लेबर ला विभागाकडून शोकॉज नोटीस सुध्दा दिलेली आहे.

श्री.दयाशंकर तिवारीः—मा.महापौरजी,माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

श्री.कमलेश चौधरीः—मा.महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर सुध्दा जोपर्यत देण्यात येत नाही तोपर्यंत कारण हा एखाद्या गरीबाचा प्रश्न नाही तर पुष्कळ लोकांचा प्रश्न आहे. नागपूर महानगरपालिकेत जे ऐवजदार काम करीत आहेत. त्यांनी आपले पुर्ण आयुष्य या महानगरपालिकेत काम करतांना घालविले त्यांचा आपल्यावर विश्वास आहे. त्या पध्दतीने आपण कार्यवाही करा मा.महापौरजी. आपण त्यांच्यावर अन्याय करू नका मा.महापौरजी,

महापौरः— बॅक वेजेस मागे घ्यायला तयार असतील तर यात सेटलमेंट करता येईल.

श्री.कमलेश चौधरीः—मा.महापौरजी, हे चुकीचे आहे. त्याच्यावर आपण अन्याय करीत आहे. लोकांनी आपले पुर्ण जीवन महापालिकेत काम करून दिले आहे.

श्री.प्रफुल गुडधेः— मा. महापौरजी, अस्थायी ड्रायव्हरच्या मान्यतेचा हा विषय आहे. नागपूर महानगरपालिकेत अस्थायी स्वरूपाचे जे ड्रायव्हर कामावर होते. त्याची सातत्याने मागणी होती की आम्हांला परमानंट करावे. परंतु नागपूर महानगरपालिका ज्यावेळेस ही मागणी मान्य करीत नव्हती म्हणून ते सर्वप्रथम इंडस्ट्रीयल कोर्टात गेले. इन्डस्ट्रीयल कोर्टाने कायद्याची स्थिती जाणून घेतली. आज आपल्या देशामध्ये लेबर लॉज आहेत. प्रत्येक कर्मचा—यांच्या हिताचे संरक्षण त्या कायद्यामुळे झाले. त्या अनुषंगाने खालच्या न्यायालयात निर्णय लागला की त्यांना बॅक वेजेस पण द्यायचे आहेत आणि इंन्ट्रेसही द्यायचे आहे. आणि खालच्या न्यायालयात ज्यावेळी निर्णय लागला त्यावेळेस नागपूर महानगरपालिकेची भुमिका त्यापेक्षा वेगळी होती की न्यायालयाने आमचा एक मुददा मान्य केला नाही. नागपूर महानगरपालिकेचे न्यायालयाच्या निर्णयाच्या वेगळे म्हणणे होते. जे काही म्हणणे असेल ते कायद्याच्याच अनुषंगाने असेल. हा कायद्या आहे. या कायद्यामध्ये ही गोष्ट अंतर्भुत आहे मात्र मा.न्यायालयाने ही गोष्ट आमची मान्य केली नाही. या दरम्यान या संपुर्ण कर्मचा—याने नागपूर महानगरपालिका प्रशासना समोर भुमिका ठेवली की बॅक वेजेस चा जरी निर्णय झाला असेल तरी आम्हांला बॅक वेजेस देवू नका, इन्ट्रेसचा प्रश्नच उद्‌भवत नाही फक्त आम्हांला परमनंट करा. महानगर प्रशासनाने तरीही तो हट्‌ट सोडला नाही. नागपूर महानगर प्रशासन मा.उच्च न्यायालयात गेले. मा.उच्च न्यायालयात सर्व कायदेशिर बाबींची तपासणी झाली. या ठिकाणी मा.दयाभैयाने सांगितले की आपले वकील आपली भुमिका मांडण्यास कमी पडलो काय?

श्री.विरेंद्र कुकरेजाः— पाईंट ऑफ इर्न्फोमेशन मा.महापौरजी, आपसे एक बात पुछना चाहता हूॅं की जो विषय कोर्ट मे प्रलंबित है उस के उपर हाऊस मे चर्चा हो सकती क्या? कृपया इसकी जानकारी दी जाये ।

श्री.शेख(अपर आयुक्त):— सन्माननीय महापौर महोदया, हा विषय मा.सुप्रीम कोर्टामध्ये दाखल आहे.

श्री.प्रफुल गुडधेः— मा. महापौरजी, प्रश्न असा आहे मा.उच्च न्यायालयाने संपुर्ण बाबींची तपासणी केली.

महापौरः— अधिका—याला सांगू दया की या विषयावर चर्चा करता येते काय?

श्री.प्रफुल गुडधेः— मा. महापौरजी, तुम्ही सांगून दया, चर्चा करता येत नाही आम्ही खाली बसतो. काहीच हरकत नाही.

श्री.शेख(अपर आयुक्त):— सन्माननीय महापौर महोदया, ही न्यायप्रविष्ट बाब असल्यामुळे सभागृहामध्ये यावर चर्चा करणे योग्य नाही याची आपण नोंद घ्यावी.

श्री.तानाजी वनवेः— मा. महापौरजी, एका गोष्टीची माहिती दया की हा न्यायप्रविष्ठ प्रश्न होता तर अजेंठयावर आला कसा? काही तरी चुकीची माहिती या सभागृहामध्ये दिली जात आहे.

प्रश्न क्र.168ः— अपर आयुक्त यांचे आदेश क्र. 1295/विकाअ(चौ) दि. 29.01.2018 अन्वये श्री. दिपक नत्थुजी नगरे संदर्भात प्रश्न.

ॲड.संजयकुमार बालपांडेः— मा.महापौरजी, या प्रकरणांत दोन वेगवेगळे लिगल ओपिनियम घेण्यात आले आहेत. अ) ॲड.भटट्‌ड यांनी स्टॅन्डींग कमेटीचे आदेश कायदयाअंतर्गत आहे असे अभिप्राय दिले. ब) असे असतांना सुध्दा कोणतेही कारण नसतांना पुन्हा ॲड.एस.के.मिश्रा यांचे अभिप्राय घेण्यात आले. त्यांनी स्थायी

समिती अध्यक्षांचे आदेशाबद्दल कोणतेही भाष्य केले नसतांना सुध्दा प्रकरण स्थायी समिती अध्यक्षांचे आदेश विखंडीत करणेकरिता शासनाकडे पाठविण्यात आले. रूपचंद मोटघरे व महेश वैद्य यांचे प्रकरणांत सुध्दा मा. स्थायी समिती अध्यक्षांनी आदेश दिले होते. त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली. शासनाकडे स्थायी समितीचे आदेश विखंडन करणेकरिता पाठविले असतांना त्याबद्दल स्थायी समिती किंवा सभागृहाची परवानगी घेतली नाही. सभागृहाच्या पटलावर सुध्दा विषय आणलेला नाही.

महापौरः—या प्रकरणांत प्रशासनाने स्थायी समिती व सभागृहाच्या आदेशाची अवहेलना केली आहे तरी संबंधित अधिका—यांनी यानंतर स्थायी समिती यांनी पारित केलेल्या आदेशाबद्दल त्वरित अंमलबजावणी करावी किंवा त्या आदेशाच्या विरोधात प्रशासनाला दाद मागायचे झाल्यास आधी सभागृहाकडे दाद मागावी अशी ताकीद देण्यात येते.

(बेल)

(राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या मा.सदस्यांनी सभात्याग केला)

महापौरः—विषयपत्रिकेला सुरूवात करण्यात येते.

ठराव कमांक 419 :— नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 20.06.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. विशेष सभा दिनांक 23.07.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 23.07.2019 सकाळी 11.15 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 23.07.2019 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त

ठराव क.420: — नागपूर महानगरपालिके द्वारे शहरात जनतेच्या हिताकरिता सार्वजनिक जनसंवाद कार्यक्रम घेण्यात येतात. हे कार्यक्रम आयोजित करतांना कोणत्या शिष्टाचार (प्रोटोकाल) च्या नियमानुसार घेण्यात येतो. तसेच बॅनर, पत्रिकामध्ये काय नमूद करतात व नागपूर महानगरपालिकेचे मानचित्र (लोगो) लावण्यात येतो कां या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून त्याची बहुमताने नोंद घेतली.

ठराव क.421 : — शहरावर जलसंकट असल्याबाबतची सत्य परिस्थिती तसेच मनपाच्या सभेत जलसंकटाबाबतचे झालेल्या चर्चेचे निराकरण न झाल्याबाबतचे सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून त्याची बहुमताने नोंद घेतली.

ठराव क.422 : — हंजर बायोटेक एनर्जीज प्रा. लिमी. कंपनीने मनपाची फसवणूक करुन आज तारखेपर्यंत 18,89,85,007/— (अठरा करोड एकोणनव्वद लाख पंच्यांशी हजार सात रु.. फक्त) रु. ची खोटी देयके उचलली व पूर्व परवानगी शिवाय संपूर्ण मशीनरी परस्पर विक्री केली, एवढेच नव्हे तर संपूर्ण कवाडची देखील विक्री केली.

निव्वळ हया महानगरपालिकेलाच हया कंपनीच्या संचालकांनी फसविले नाही, तर देशभरातल्या अनेक महानगरपालिकेच्या रकमेवर दरोडा घातला. हया कंपनीच्या संचालकाचे लागेबांधे विदेशी भूमीपर्यंत पोचलेले असून,, हया कंपनी संचालकांची व त्यांच्या आर्थिक व्यवहारांचाही पोलीस चौकशी करणे संबंधी सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय विधी व सामान्य प्रशासन विशेष समितीकडे वर्ग करण्यात येते. मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क. 423: — नागपूर शहरामध्ये टी.व्ही., केबल कंपन्यामार्फत, इंटरनेट पुरविणाऱ्या कंपन्यामार्फत तसेच इतर ओव्हरहेड टाकलेले केबल या सर्व कंपन्याना मनपा कायदाच्या अधिन राहून नियमानुसार परवानगी दिली आहे का? परवानगी देण्याची आपल्याकडे नियमावलीची काही व्यवस्था आहे का? आणि आपण याची परवानगी दिली नसल्यास यावर काय कार्यवाही अपेक्षित होती अथवा यानंतर अपेक्षित आहे. या विषयावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय स्थापत्य व प्रकल्प विशेष

समितीकडे वर्ग करण्यात येते. मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.
ठराव क्र.424ः – नागपूर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत तसेच सातव्या वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भाने या विषयावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय विधी व सामान्य प्रशासन विशेष समितीकडे वर्ग करण्यात येते. मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.425 : – आस्थापना विभाग अंतर्गत येणाऱ्या संपूर्ण विभागातील कर्मचाऱ्यांना वेळोवेळी देण्यात येणाऱ्या पदोन्नतीसाठी लागणारा जास्तीचा वेळ व डी.पी.सी. च्या बैठकीचे अनियमित वेळापत्रक व अन्याय या मुद्यांवर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय विधी व सामान्य प्रशासन विशेष समितीकडे वर्ग करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 426ः– पावसाळा 2018 मध्ये वेणा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात अत्यल्प पाऊस झाल्यामुळे वेणा जलाशयात फारच कमी पाणीसाठा उपलब्ध आहे. याच जलाशयातुन डिगडोह निलडोह या ग्रामपंचायतींना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे पाणी पुरवठा होतो. येत्या उन्हाळयात (एप्रिल 2019 ते जुन 2019 या कालावधीमध्ये) त्यांना सदर जलाशयातुन पाणी उपलब्ध होणार नसल्यामुळे डिगडोह निलडोह ग्रामपंचायतींनी म.न.पा.कडे 2 दलली प्रति दिन (2MLD) पाण्याची मागणी केलेली आहे. तसेच मा. पालकमंत्री, नागपूर जिल्हा यांनी दि. 07.01.2019 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे घेतलेल्या बैठकीत सदर पाणी पुरवठयाचा विषय नागपूर महानगरपालिकेच्या महासभेत ठेवण्याचे निर्देशित केले होते. तसेच मा. आमदार श्री. समीरजी मेघे हिंगणा विधानसभा यांनी मा. सत्तापक्ष नेता यांना या ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करणेकरीता पत्र दिलेले आहे. या अनुषंगाने मा. सत्तापक्ष नेता यांनी मा. आयुक्त यांना सदर प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्याची विनंती केलेली आहे.
उपरोक्त बाब लक्षात घेता, ग्रामपंचायत डिगडोह निलडोह यांना उन्हाळा 2019 मध्ये (एप्रिल 2019 ते जुन 2019 या कालावधीमध्ये) 2 दलली प्रति दिन प्रमाणे पाणीपुरवठा नागपूर महानगरपालिकेच्या वितरण स्त्रोतातून करण्याचा व याकरीता MOU करण्याचे अधिकार मा. आयुक्त, म.न.पा. यांना प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय प्रशासनाला परत करण्यात येते. मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.
ठराव क्र. 427ः– हद्दवाढ झालेल्या पायाभूत सोयी सुविधा निर्मिती करीता नागपूर महानगरपालिकाव्दारा सादर करण्यात आलेला नरसाळा या भागातील व्हि. आर. रोडचे खडीकरण, भुमिगत नाली, पादचारी मार्ग व डांबरीकरणाच्या विकास कामास्तव रू. 19,93,84,546/– रकमेचे प्रस्तावास, महानगरपालिकेची 20 टक्के हिस्स्याची रक्कम 39876909/– भरण्यास सहमती असल्याचा ठराव मंजूर करणे या अटीचा अधीन राहून शासन हिश्याचा रु. 159507637/– (80टक्के) मंजूर करण्यास मान्यता प्राप्त आहे. करीता नरसाळा या भागातील व्हि. आर. रोडचे खडीकरण, भुमिगत नाली, पादचारी मार्ग व डांबरीकरणाच्या विकास कामाकरीता म.न.पा. च्या हिश्यापोटी (20टक्के) रु. 39876909/– रकमेचा सहभाग पद क्र. A42001374602 अंतर्गत उपलब्ध करुन देण्याच्या शिफारसीसह प्रस्ताव महापालिका सभागृहासमक्ष ठेवण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेणे. कामाची कार्यान्वय यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग (महा.शासन) राहील. उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास बहुमताने मान्यता प्रदान केली.
ठराव क्र.428 ः– प्रभाग क्र. 18 मधील शिवाजी नगर, हनुमान मंदिर जवळील सरकारी संडास तोडण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून विषयाला प्राप्त उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

उपसुचना

प्रभाग क्र 9 च्या क्षेत्रातील मोहननगर येथील नाल्यावर नागपूर महानगरपालिकेचे फार जुने सुलभ शौचालय अस्तित्वात आहे. सध्या शौचालयाचा वापर होत नसल्यामूळे ते जिर्ण व शिकस्त झाले असून शक्ती नाल्यावर असल्याने केव्हाही पडण्याची शक्यता आहे.

करीता उपरोक्त शौचालय ताबडतोब पाडण्यात यावे यासाठी दि. 21.08.2019 च्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील विषय क्र 347 ला उपसूचना लावून मंजूर करण्यात यावा.

सुचक – श्री.किशोर जिचकार
नामनिर्देशित सदस्य
अनुमोदक – श्री.तानाजी वनवे
विरोधी पक्षनेता, मनपा

ठराव क्र. 429:– प्रभाग क्र. 22, सराफा बाजार इतवारी येथील न.भू. क्र. 322, मौजा–नागपूर शीट क्र. 169 या जागेवरील मनपाच्या मालकीचे सार्वजनिक मुत्रिघराचे बांधकाम शिकस्त व जीर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने सदर्हु मुत्रिघर पाडण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून विषयाला प्राप्त उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

उपसुचना

प्रभाग क्र. 22, सराफा बाजार इतवारी येथील न.भू. क्र. 322, मौजा–नागपूर शीट क्र. 169 या जागेवरील मनपाच्या मालकीचे सार्वजनिक मुत्रिघराचे बांधकाम शिकस्त व जीर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने सदर्हु मुत्रिघर पाडण्यात यावे.

करीता उपरोक्त मुत्रीघर ताबडतोब पाडण्यात यावे यासाठी दि. 21.08.2019 च्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील विषय क्र 348 ला उपसूचना लावून मंजूर करण्यात यावा.

सुचक – श्री.किशोर जिचकार
नामनिर्देशित सदस्य
अनुमोदक – श्री.तानाजी वनवे
विरोधी पक्षनेता, मनपा

ठराव क्र.430 :– महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम –2015 अंतर्गत एकूण 15 सेवा नागपूर महानगरालिकेव्दारे अधिसुचित करण्यात आलेल्या आहेत. व नागपूर महानगरपालिकेतर्फे दिनांक 17.07.2015 पासून या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम –2015 अंतर्गत देण्यात येत आहेत. म.न.पा.तर्फे देण्यात येत असलेल्या 15 सेवेंकरिता नियत कालमर्यादा व शुल्क/फी निश्चित करण्यात आलेली आहे.

वरील 15 सेवांव्यतिरीक्त Ease of doing Business च्या अनुषंगाने महत्वाच्या असलेल्या मालमत्ता कर, पाणीपट्‌टी कर, ना हरकत प्रमाणपत्र व व्यवसाय परवाना या 4 घटकांकरीता सर्व सेवा आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसुचित करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण–2015/प्र.क्र. 398/नवि–20 दिनांक 04.09.2017 जारी करण्यात आला आहे. याअंतर्गत कर व कर आकारणी विभागाचे 12, जलप्रदाय विभागाचे 14, झोनस्तरावर 01 असे एकूण 27 सेवा तसेच व्यापार/व्यवसाय/साठा करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र, नविन परवाना मिळणे व यासंबधी 11 सेवा असे एकुण 38 सेवा अधिसुचित करण्याबाबत शासन निर्णयात नमुद करण्यात आल्या आहेत.

दिनांक 04.09.2017 च्या शासन निर्णयात नमुद असलेल्या 38 सेवांपैकी यापुर्वी अधिसुचित करण्यात आलेल्या चार सेवा वगळुन उर्वरीत एकूण 34 सेवा अधिसुचित करण्याकरिता उक्त 34 लोकसेवांची सुची व शासन अधिसुचनेनुसार या सेवांकरीता निश्चित केलेली कालमर्यादा तसेच नागपूर म.न.पा. व्दारे प्रस्तावित करण्यात आलेली फी यांस नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक 20.10.2018 च्या सर्व साधारण सभेतील ठराव क्र. 298 अन्वये मा. सत्तापक्ष नेते यांनी जन्म–मृत्यु प्रमाणपत्र व विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या शुल्कामध्ये केलेल्या सुधारणेसह तसेच विहीत कालमर्यादेमध्ये कार्यालयाकडून हे प्रमाणपत्र उपलब्ध न करून दिल्यास संबधित कर्मचा–यांकडून रू. 100/– दंड आकारण्यात यावा व त्यावर प्रतिदिन रू. 50/– दंड आकारण्यात यावा.

याशिवाय संबधित कर्मचा–यांच्या गोपनिय अहवालात त्याची नोंद घेण्यात यावी. या मा.सत्तापक्ष नेतेयांनी केलेल्या सुचनेसह हा विषय म.न.पा. सभागृहाच्या दिनांक 20.10.2018 च्या सभेत मान्य करण्यात आला आहे.

येथे नमुद करण्यात येते की, शास्ती संदर्भात सेवा हक्काच्या कायद्यातील प्रकरण 10 शास्ती मधील 1 (क) नुसार जर पदनिर्देशित अधिका–याने पुरेशा व वाजवी कारणांशिवाय लोकसेवा देण्यात कसुर केली आहे. असे, प्रथम अधिका–यांचे मत झाले असेल तर तो त्या पदनिर्देशित अधिका–यांवर रू. 500/– पेक्षा कमी नसेल, परंतु रू. 5000/– पर्यंत असु शकेल ऐवढी किंवा राज्य शासन राजपत्रातील अधिसुचनेव्दारे वेळोवेळी सुधारण करील अशा रकमेऐवढी शास्ती लादण्याची तरतुद आहे. तसेच कलम 11 नुसार शास्ती वसुलीची कार्यपध्दती देखिल नमुद केली आहे.

सेवा हक्क कायद्यानुसार पुरेशा व वाजवी कारणांशिवाय लोकसेवा देण्यात कसुर करणा–यास शास्तीची तरतुद करण्यात आल्याने त्यानुसारच महानगरपालिकेत देखिल त्यानुसार कारवाई करणे क्रमप्राप्त आहे.

या व्यतिरीक्त बाजार विभागातर्फे देण्यात येणा–या लोकसेवांच्या सुचीमधील क्रमांक 1 व्यापार/व्यवसाय/साठा करणेसाठी ना–हरकत प्रमाणपत्र निर्गमित करणे. याकरिता विभागाव्दारे कुठलेही शुल्क प्रस्तावित करण्यात आले नाही. तथापि या लोकसेवेकरीता रू. 500/– शुल्क आकारण्याबाबत मा. सत्तापक्ष नेते यांनी सुचित केलेले आहे.

सेवाहक्काच्या कायद्यातील शास्तीबाबत प्रकरण 10 व 11 मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेत देखिल कार्यवाही करणेबाबत तसेच मा. सत्तापक्ष नेते यांनी बाजार विभागातर्फे देण्यात येणा–या लोकसेवांच्या सुचीमधील क्रमांक 1 व्यापार/व्यवसाय/साठा करणेसाठी ना–हरकत प्रमाणपत्र निर्गमित करणे या लोकसेवेकरिता रू. 500/– शुल्क आकारण्याबाबत, जन्म–मृत्यु प्रमाणपत्र व विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या शुल्कामध्ये केलेल्या सुधारणेसह केलेल्या सुचनेचा समावेश करून शासन अधिसुचनेत नमुद असलेल्या 38 सेवांपैकी यापुर्वी अधिसुचित करण्यात आलेल्या 4 सेवा वगळून उर्वरीत 34 सेवांकरीता पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व व्दितीय अपिलीय अधिकारी यांची पदनामे विषद करून तसेच पुर्वीच्या 15 सेवांपैकी नगररचना विभागाशी संबधित सेवांकरिता विभागाव्दारे सुधारीत केलेल्या पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व व्दितीय अपिलीय अधिकारी यांच्या पदनामांचा समावेश करून खालील सुधारीत विवरण पत्रास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम–2015 अंतर्गत अधिसुचित करण्यात आलेल्या 15 सेवा

| विभागाचे नाव | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | नियत कालमर्यादा | निश्चित केलेली फी | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोग्य विभाग | 1) जन्म प्रमाणपत्र देणे | विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक असल्यास | 1 दिवस (तात्काळ) | रू. 100 तात्काळ | संबधित झोनचे झोनल अधिकारी तथा उपनिबंधक (जन्म–मृत्यु) | संख्यिकी अधिकारी (जन्म–मृत्यु) | आरोग्य अधिकारी (एम) तथा निबंधक (जन्म–मृत्यु) |
| | | | 3 दिवस (साधारण) | रू. 20 साधारण | संबधित झोनचे झोनल अधिकारी तथा उपनिबंधक (जन्म–मृत्यु) | संख्यिकी अधिकारी (जन्म–मृत्यु) | आरोग्य अधिकारी (एम) तथा निबंधक (जन्म–मृत्यु) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2) मृत्यु प्रमाणपत्र देणे | विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक असल्यास | 1 दिवस (तात्काळ) | रू. 100 तात्काळ | संबधित झोनचे झोनल अधिकारी तथा उपनिबंधक (जन्म–मृत्यु) | संख्यिकी अधिकारी (जन्म–मृत्यु) | आरोग्य अधिकारी (एम) तथा निबंधक (जन्म–मृत्यु) |
| | | | 3 दिवस (साधारण) | रू. 20 साधारण | संबधित झोनचे झोनल अधिकारी तथा उपनिबंधक (जन्म–मृत्यु) | संख्यिकी अधिकारी (जन्म–मृत्यु) | आरोग्य अधिकारी (एम) तथा निबंधक (जन्म–मृत्यु) |
| | 3) विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. वास्तव्याचा पुरावा<br>3. वयाचा पुरावा<br>4. विवाहास उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>5. 90 दिवसानंर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | 3 दिवस | 365 दिवसाचे आंत अर्ज केल्यास रू. 1000/– | विवाह नोंदणी अधिनियम –1988 अन्वये प्राधिकृत अधिकारी संबधित झोनचे सहा. आयुक्त | संख्यिकी अधिकारी (जन्म–मृत्यु) | उपायुक्त (आरोग्य) |
| | | | | 365 दिवसानंर अर्ज केल्यास रू. 1500/– | विवाह नोंदणी अधिनियम –1988 अन्वये प्राधिकृत अधिकारी संबधित झोनचे सहा. आयुक्त | संख्यिकी अधिकारी (जन्म–मृत्यु) | उपायुक्त (आरोग्य) |
| कर व कर आकारणी विभाग | 1) मालमत्ता कर उतारा देणे. | विहीत नमुन्यातील अर्ज | 3 दिवस | प्रत्येक 100 नोंदीकरिता रू. 20/– | संबधित कर निरीक्षक/ स्थापत्य अभि. सहा. | संबधित झोनचे सहा. कर निर्धारक | स्ंबधित झोनचे सहा. आयुक्त |
| | 2) थकबाकी नसल्याचा दाखला देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | 3 दिवस | निरंक | संबधित कर निरीक्षक/ स्था. अभि. सहा. | संबधित झोनचे सहा. कर निर्धारक | स्ंबधित झोनचे सहा. आयुक्त |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3) अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे दाखला | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला<br>3. दस्तऐवजाची प्रत (खरेदी प्रत/बक्षिस पत्र/वाटणी पत्र | 15 दिवस | रू. 1000/– शुल्क<br><br>विलंब शुल्क रू. 50 | संबधित कर निरीक्षक/<br><br>स्था. अभि. सहा. | संबधित झोनचे सहा. कर निर्धारक | संबधित झोनचे सहा. आयुक्त |
| | ब) वारसाहक्काने मालमत्ता नोंद प्रमाणपत्र देणे | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला<br>3. वारसा हक्क प्रमाणपत्र | 15 दिवस | रू. 500/– शुल्क, विलंब शुल्क रू. 50 | संबधित कर निरीक्षक/स्था. अभि. सहा. | संबधित झोनचे सहा. कर निर्धारक | स्बधित झोनचे सहा. आयुक्त |
| नगररचना विभाग | 1) झोन दाखला देणे (भाग नकाशाची प्रत देण्यात येते.) | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. 7/12 उतारा/सिटी सर्वे उतारा<br>3. मोजनी नकाशा/ सिटी सर्वे नकाशा | 7 दिवस | रू. 300 /– | संबधित कनिष्ठ अभियंता | नगररचनाकार /<br><br>उप अभियंता | सहाय्यक संचालक नगररचना |
| | 2) भाग नकाशा देणे | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. 7/12 उतारा /सिटी सर्वे उतारा<br>3. मोजनी नकाशा/ सिटी सर्वे नकाशा | 3 दिवस | निःशुल्क | संबधित कनिष्ठ अभियंता | नगररचनाकार /उप अभियंता | सहाय्यक संचालक नगररचना |
| | 3) बांधकाम परवाना देणे<br><br>( निर्णय घेणे) | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. वास्तुविशारदाचा दाखला<br>3. मालकी हक्काची कागदपत्रे<br>4. बांधकाम | 60 दिवस | परिपत्रकानुसार | सहायक संचालक नगररचना<br><br>भुखंडाचे क्षेत्र 2000 चौ. मी. पर्यंत | अतिरीक्त उपायुक्त/<br><br>नगररचना<br><br>2000 चौ. मी<br><br>भुखंडाचे क्षेत्र | अपर आयुक्त/ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आराखडा<br>5. मोजणी नकाशा<br>6. मंजूर रेखांकरनाची प्रत. | | | | | |
| | | | | | भुखंडाचे क्षेत्र 2000 चौ. मी पेक्षा अधिक करिता मा. आयुक्त यांच्या मान्यतेनंतर | म. अप्पर आयुक्त–1 (नगररचना)<br>2000 चौ. मी. पेक्षा अधिक भुखंड क्षेत्रफळाकरीता | मा आयुक्त |
| | 4) जोते प्रमाणपत्र | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. बांधकाम प्रांरंभ प्रमाणपत्र | 15 दिवस | रू. 2/– चौ. मी. ( कमीतकमी रू. 1000/– ) | उपअभियंता नगररचना विभाग | सहा. संचालक नगररचना | अति. उपायुक्त–1 नगररचना |
| | 5) भोगवटा प्रमाणपत्र देणे | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. बांधकाम प्रांरंभ प्रमाणपत्र<br>3. जात प्रमाणपत्र<br>4. घर मालक/ वास्तुविशारद याचे पुर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | 30 दिवस | रू. 2/– चौ. मी. ( कमीतकमी रू. 1000/– ) | उपअभियंता नगररचना विभाग | सहा. संचालक नगररचना | अति. उपायुक्त–1 नगररचना |
| जलप्रदाय विभाग | 1) नविन नळ जोडणी देणे<br>अ) 25 मि. मी. व्यासापर्यंत सर्व प्रकारच्या | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. जागा मालकी कागदपत्रे<br>3. थकबाकी नसल्याचा दाखला | 15 दिवस | नळाचा आकार व वापरानुसार उपविधीत ठरविलेले दरानुसार (सदर भागात | डेलिगेट झोन | कार्यकारी अभियंता | अधिक्षक अभियंता |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | घरगुती | | | जलवाहिनी उपलब्ध असल्यास ) | | | |
| | ब) 25 मि.मी. व्यासापेक्षा जास्त सर्व प्रकारच्या घरगुती व सर्व व्यावसायीक | | 15 दिवस | नळाचा आकार व वापरानुसार उपविधीत ठरविलेले दरानुसार (सदर भागात जलवाहिनी उपलब्ध असल्यास) | डलिगेट झोन | कार्यकारी अभियंता | अतिरीक्त उपायुक्त / उपायुक्त जलप्रदाय |
| | 2) जलनिःसारण जोडणी देणे | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. जागा मालकी कागदपत्रे<br>3. थकबाकी नाल्याचा दाखला | 15 दिवस | रू. 1000/– प्रति जोडणी ( रोड कटिंग चार्जेस वगळून ) सदर भागात वाहिनी उपलब्ध असल्यास | उपअभियंता | अधिक्षक अभियंता | अतिरीक्त उपायुक्त / उपायुक्त |
| अग्निशमन विभाग | 1) अग्निशमन ना–हरकत दाखला देणे | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला<br>3. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>4. आग प्रतिबंधक उपाययोजनां बाबतची रूपरेषा<br>5. अग्निशमन | 7 दिवस | म.न.पा. स्तरावर निश्चित केलेले दर | सहाय्यक स्थानाधिकारी / स्थानाधिकारी | स्थानाधिकारी / विभागीय अग्निशमन अधिकारी | प्रमुख अग्निशमन अधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सेवा शुल्क व उंच इमारत निधी भरल्याची पावती. | | | | | |
| | 2) अग्निशमन अंतिम ना–हरकत दाखला देणे | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला<br>3. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>4. अग्निशमन यंत्रणा उभारणी केल्याचे प्रमाणपत्र<br>5. लायसन्स एजन्सी यांचे नमुना–अ<br>6. विकासक /सोसायटी यांचे अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र | 15 दिवस | म.न.पा. स्तरावर निश्चित केलेले दर | सहाय्यक स्थानाधिकारी / स्थानाधिकारी | स्थानाधिकारी / विभागीय अग्निशमन अधिकारी | प्रमुख अग्निशमन अधिकारी |

शासन निर्णय क्र. संकीर्ण–2015/प्र.क्र. 398/नवि–20, दिनांक 04.09.2017 अन्वये अधिसुचित करण्यात येणा–या 34 सेवा.

| विभागाचे नाव | लोकसेवांची सूची | नियत कालमर्यादा | आवश्यक कागदपत्र | निश्चित केलेली फी | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर व कर आकारणी विभाग | 1) अ) नव्याने कर आकारणी<br><br>ब) नव्याने कर आकारणी (नामांतरणासह) | 15 दिवस<br><br>15 दिवस | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. भोगवटा प्रमाणपत्र | निशुःल्क<br><br>रू. 1000/– विलंब शुल्क रू. 50/– | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2) पुन्हा कर आकारणी | 15 दिवस | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |
| | 3) कराची मागणी पत्र तयार करणे | 3 दिवस | विहीत नमुन्यातील अर्ज | रू. 5/— | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |
| | 4) कर माफी मिळणे | 7 दिवस | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला | रू. 10/— प्रति मालमत्ता | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |
| | 5) रहिवासी नसलेल्या मालमत्ता करात सुट मिळणे. | 15 दिवस | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला | रू. 15 प्रति मालमत्ता | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |
| | 6) स्वयंमुल्यांकन | 15 दिवस | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |
| | 7) आक्षेप नोंदविणे | 15 दिवस | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला | मालमत्ता कराचे 1: | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |
| | 8) उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन | 15 दिवस | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला<br>3. मलकी हक्काची कागदपत्रे (खरेदीखत, वाटणीपत्र, बक्षीसपत्र इ) | रू. 500/— प्रति प्रकरण | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9) मालमत्ता पाडणे व पुनःबांधणी कर आकार | 15 दिवस | 1. विहीत नमुन्याती ल अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला | निःशुल्क | कर निरीक्षक | कर अधिक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी |
| जलप्रदाय विभाग | 1) मालकी हक्कात बदल करणे | 7 दिवस | 1. विहीत नमुन्याती ल अर्ज<br>2. मालकी हक्क कागदपत्रे<br>3. थकबाकी नसल्याचा दाखला | रू. 100/– | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 2) नळजोडणी आकारामध्ये बदल करणे | 15 दिवस | 1. विहीत नमुन्याती ल अर्ज<br>2. मालकी हक्क कागदपत्रे<br>3. थकबाकी नसल्याचा दाखला | नळाचा आकार व वापरानुसार उपविधीत ठरविलेले दरानुसार (सदर भागात जलवाहिनी उपलब्ध असल्यास | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 3) तात्पुरते /कायमस्वरूपी नळजोडणी खंडीत करणे | 7 दिवस | 1. विहीत नमुन्याती ल अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला | घरगुती वापर रू. 739/–प्रतिजोडणी व्यावसायीक वापर रू 2217/–.प्रति जोडणी | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 4) पुनःजोडणी करणे | 15 दिवस | 1. विहीत नमुन्याती ल अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला | घरगुती वापर रू. 638/– प्रतिजोडणी व्यावसायीक वापर रू 1915/–.प्रति जोडणी | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 5) वापरामध्ये बदल करणे | 15 दिवस | 1. विहीत नमुन्याती ल अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला | अर्ज निःशुल्क वापरामध्ये बदल करण्यास्तव जोडपत्र 'अ' प्रमाणे सुरक्षा ठेव रकमेची आकारणी करण्यात येईल. | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 6) पाणी देयक | 3 दिवस | विहीत | निःशुल्क | कनिष्ठ | उपअभियंता | कार्यकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | तयार करणे | | नमुन्यातील अर्ज | | अभियंता | | अभियंता |
| | 7) प्लंबर परवाना | 15 दिवस | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. थकबाकी नसल्याचा दाखला | सुरक्षा अनामत रक्कम रू. 5000/— टिप :— पब्लिक प्रायवेट पार्टनरशिप अंतर्गत ऑपरेटर नियुक्त केल्याने जलप्रदाय विभाग, म.न.पा. तर्फे सध्या नव्याने प्लंबर परवाना देणे बंद आहे. | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 8) प्लंबर परवाना नुतनीकरण | 15 दिवस | 1. विहीत नमुन्यातील अर्ज<br>2. शैक्षणिक अहर्तेबाबत चे प्रमाणपत्र<br>3. थकबाकी नसल्याचा दाखला | नुतनीकरण शुल्क रू. 600/—<br>टिप :— पब्लिक प्रायवेट पार्टनरशिप अंतर्गत ऑपरेटर नियुक्त केल्याने जलप्रदाय विभाग, म.न.पा. तर्फे सध्या नव्याने प्लंबर परवाना देणे बंद आहे. | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 9) थकबाकी नसल्याचा<br>दावा | 3 दिवस | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 10) नादुरूस्त मिटर<br>तक्रार करणे. | 7 दिवस | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 11) अनाधिकृत नळ | 7 दिवस | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जोडणी तक्रार | | | | | | |
| | 12) पाण्याची दबाव क्षमता तक्रार | 3 दिवस | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| | 13) पाण्याची गुणवत्ता तक्रार | 3 दिवस | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| स्थावर विभाग | 1) मंडपासाठी ना–हरकत प्रमाणपत्र | 7 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. रस्ता पुनर्स्थापन करार | म.न.पा. स्तरावर निश्चित केलेले दर | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपआयुक्त | अतिरीक्त आयुक्त |
| बाजार विभाग | 1) व्यापार / व्यवसाय / साठा करणेसाठी ना–हरकत प्रमाणपत्र | 7 दिवस | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | रू. 500/– | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |
| | 2) नविन परवाना मिळणे | 15 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. कोणताही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रू. 100/– प्रति माह परवाना ( किमान 3 वर्षांकरिता) | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |
| | 3) परवान्याचे नुतनीकरण | 15 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. कोणताही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रू. 100/– प्रति माह ( किमान 3 वर्षांकरिता) | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |
| | 4) परवाना हस्तांांतरण | 15 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. कोणताही थकबाकी | परवाना हस्तांतरण फी रू. 1000/–<br>रू. 100 प्रति माह | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नसल्याचे प्रमाणपत्र | पुढील ( किमान 3 वर्षांकरिता) | | | |
| | 5) परवाना दुय्यम प्रत | 15 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. कोणताही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रू. 100 / — | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |
| | 6) व्यवसायाचे नाव बदलणे | 15 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. कोणताही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रू. 500 / — | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |
| | 7) व्यवसाय बदलणे | 15 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. कोणताही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | परवाना फी रू 500 / —<br>रू. 100 प्रति माह पुढील ( किमान 3 वर्षांकरिता) | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |
| | 8) परवाना धारक /भागीदाराचे नाव बदलणे | 15 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. कोणताही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | परवाना फी रू. 1000 / —<br>रू. 100<br>प्रति माह पुढील ( किमान 3 वर्षांकरिता) | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |
| | 9) भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ / कमी) | 15 दिवस | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | परवाना हस्तांतरण फी रू. 1000 / —<br>रू. 100 प्रति माह पुढील ( किमान 3 वर्षांकरिता) | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |
| | 10) परवाना रद्द | 15 दिवस | योग्य प्रकारे | | बाजार | प्रभागक्षेत्र | उपायुक्त |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | करणे | | भरलेले अर्ज | रू. 500/– | निरीक्षक | अधिकारी | |
| | 11) कालबाहय परवान्यासाठी नुतनीकरण सुचना | 15 दिवस | 1. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>2. कोणताही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | विलंब शुल्क प्रति माह रू. 1000/–<br>रू 100/ – . प्रति माह<br>( किमान 3 वर्षांकरिता) | बाजार निरीक्षक | प्रभागक्षेत्र अधिकारी | उपायुक्त |

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून विभागाने सुचविलेल्या लेखी दुरुस्तीसह उपरोक्त विषय मंजूर करण्यांत येतो मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

दिनांक मध्ये ३४९ च्या सर्व साधारण सभेच्या विषयपत्रिकेतील विषय क्रमांक २१.०८.२०१९
दुरुस्ती

बुधवार दिनांक या नागपूर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेत सामान्य प्रशासन -रोजी होणा २१.०८.२०१९ सेवांकरिता ३४ व प्रस्तावित करण्यात आलेल्या १५ अंतर्गत पुर्वीच्या २०१५ विभागातर्फे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम पदनिर्देषित अ ,शुल्क कालावधी ,आवश्यक कागदपत्रेधिकारीय अपिलीय अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी व व्दिती , .सादर करण्यात आला आहे ३४९ नमुद करुन विषय पत्रिकेतील विषय क्रमांक

- या विषयामधील विवाह नोंदणी प्रमाणपत्र या सेवेकरिता पदनिर्देशित अधिकारी हे वैद्यकिय अधिकारी असुन अनावधानाने संबधित झोनचे सहा.आयुक्त नमुद करण्यात आले आहेसेवेकरिता नमुद विषय पत्रिकेतील या . आयुक्त ऐवजी संबधित झोनचे वैद्यकिय .करण्यात आलेल्या पदनिर्देशित अधिकारी यांचे पदनामात सहा .अधिकारी अशी दुरुस्ती प्रस्तावित आहे
- नागपूर महानगरपालिकेमध्ये प्रभागक्षेत्र अधिकारी हे पद नसल्याने विषय पत्रिकेतील विवरण सुचीमध्ये पदनिर्देशित अधिकारीप्रथम अपिलीय अधिकारी येथे ज्या ठिकाणी प्रभागक्षेत्र अधिकारी हे पदनाम नमुद करण्यात आले त्या/ .ठिकाणी संबधित झोनचे सहा आयुक्त अशी दुरुस्ती प्रस्तावित आहे
- तसेच अग्निशमन विभागामार्फत देण्यात येणाया दोन सेवेकरिता पदनिर्-देशित अधिकारी प्रथम अपिलीय/ .च्या पदनामात खालीलप्रमाणे दुरुस्ती प्रस्तावित आहेअधिकारी यां

| अ.क्र. | लोकसेवेची सुचि | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अग्निशमन ना हरकत दाखला देणे | मुख्य अग्निशमन अधिकारी | उपायुक्त अग्निशमन विभाग | अपर आयुक्त अग्निशमन विभाग |
| २ | अग्निशमन अंतिम नाहरकत - दाखला देणे | मुख्य अग्निशमन अधिकारी | उपायुक्त अग्निशमन विभाग | अपर आयुक्त अग्निशमन विभाग |

दिनांक ला वरीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या ३४९ च्या सर्वसाधारण सभेत विषय क्रमांक २१.०८.२०१९ दुरुस्तीसह विषयास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे .

महेश धामेचा
सहा आयुक्त .(साप्रवि)
महानगरपालिका नागपूर

ठराव क्र. 431:– स्थापना विभागाचे आदेश क्र. 304/ओ ॲन्ड एम, दिनांक 30.03.2019 अन्वये श्री. महेश मोरोणे, सहा. आयुक्त धरमपेठ झोन क्र. 2 यांना नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड (NSSCDCL) येथिल उप मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आला होता व दिनांक 30.03.2019 रोजी ते NSSCDCL येथे रूजु झाले होते. त्यांनतर स्थापना विभागाचे आदेश क्र. 304/ओ ॲन्ड एम, दिनांक 04.06.2019 अन्वये श्री. महेश मोरोणे, सहा आयुक्त/वार्ड अधिकारी धरमपेठ झोन क्र. 2 यांना नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड (NSSCDCL) येथिल पुर्णवेळ उपमुख्य कार्यकारी अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.

स्थापना विभागाचे आदेश क्र. 304/ओ ॲन्ड एम, दिनांक 04.06.2019 सुस्पष्ट नसुन काही बाबींचा खुलासा करून तसेच अटी व शर्ती विहीत करून सुस्पष्ट आदेश निर्गमित करण्यास्तव प्रकरण नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड यांचेकडून सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झाले आहे.

त्यानुषंगाने खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

सहा. आयुक्त हे पद वर्ग 1 चे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) नुसार श्री. महेश मोरोणे यांना प्रतिनियुक्तीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड येथे पाठवावयाचे झाल्यास त्यांस महासभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड च्या हयुमन रिर्सोस पॉलीसी ऑर्गनायझेशन स्ट्रक्चर व आस्थापना सुची बाबत दिनांक 12 ऑगस्ट 2017 रोजी संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आल्यानुसार नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड या विभागात उप मुख्य कार्यकारी अधिकारी या पदनामाचे एक पदास मान्यता प्रदान करण्यात आली. या पदाकरिता शैक्षणिक अर्हता, अनुभव व एकत्रित वेतन खालीलप्रमाणे विहीत करण्यात आलेला आहे.

Education Qualification रू. MBA/Post Graduate पद Urban Management /Urban governance/infrastructure development. PhD shall be preferable.

Experience रू. 10 Years of asministrative experience in relevant field. Minimum 5 years of experience in similar position reporting to CEO shall be preferable. Preference shall be given to candidates having experience in smart cities.

Consolidant Pay : 1,25,000/- per month ( consolida)

Age : 45-65

श्री. महेश मोरोणे यांची शैक्षणिक पात्रता B.E. Civil ( First Class), MBA (First Class), M, Tech from VRCE, Nagpur (Distinction grade) advanced PG Diploma in Urban Management (A Grade) from YASHADA, Pune ( Mumbai University) असून दिनांक 23.12.2004 पासून ते म.न.पा. मध्ये सहा. आयुक्त या पदावर कार्यरत आहेत. म्हणजेच आजपावेतो त्यांचा सहा. आयुक्त या पदाचा अंदाजे 15 वर्षाचा अनुभव आहे. त्यांची जन्म दिनांक 17.11.1966 असुन आज तारखेस त्यांचे वय 53 वर्षे आहे. म्हणजेच ते वयाची अट देखिल पुर्ण करीत आहे.

श्री. महेश मोरोणे, सहा. आयुक्त, यांना म.न.पा. खालील शर्ती व अटीवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड या विभागात प्रतिनियुक्तीवर पाठविण्याचे प्रस्तावित आहे

श्री. महेश मोरोणे यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी, परकीय

सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे या काळातील प्रदाने) नियम 1981 मधील तरतुदीनुसार विहीत करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :–

1. प्रतिनियुक्ती कालावधी :– प्रतिनियुक्तीचा कालावधी प्रतिनियुक्तीच्या आदेशापासुन 03 वर्षाकरिता असेल प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविण्याचा अथवा महानगरपालिकेला आवश्यक वाटल्यास या कालावधीपुर्वी उक्त अधिकारी यांची सेवा प्रत्यार्पित करण्याचा अधिकार महानगरपालिका सभेला असेल. प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर कर्मचा–यांस मूळ विभागाच्या आस्थापनेवर पाठविण्यात येईल. व प्रतिनियुक्तीचे कालावधीतील नियमित वार्षिक वेतनवृध्दी देवून वेतन निश्चिती करण्यात येईल.
2. वेतन व भत्ते :– उक्त अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम नुसार वेतन व भत्ते देय असतील किंवा नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड च्या मानव संसाधन धोरणानुसार ( Human Recourse Policy) नुसार उक्त अधिकारी ज्या पदावर काम करीत आहे त्या पदावर देय असलेले वेतन व भत्ते स्विकारण्याचा विकल्प उक्त अधिकारी व कर्मचारी स्विकारू शकतील प्रतिनियुक्तीच्या कालावधीत उक्त अधिकारी यांचे वेतन नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड च्या निधीतून अदा करण्यात येईल.
3. प्रवास भत्ता :– उक्त अधिकारी यांना त्यांनी कार्यालयीन कामाकरिता केलेल्या प्रवासाची व इतर खर्चाची प्रतिपुर्ती नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड च्या मानवसंसाधन धोरणानुसार ( Human Recourse Policy) नुसार करण्यात येईल.
4. वैद्यकीय सवलती :– उक्त अधिकारी /कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकीय उपचार) नियम 1961 नुसार अनुज्ञेय असणा–या वैद्यकीय सुविधांपेक्षा कमी प्रतीच्या नसतील अशा सुविधां मिळण्याचा हक्क असेल आणि त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड च्या निधीतून करण्यात येईल.
5. रजा :– उक्त अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम , 1981 च्या तरतुदी लागू राहतील.
6. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी :– उक्त अधिकारी यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीमध्ये देय रकमेची कपात करण्याची व भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्याची जबाबदारी नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड च्या आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.
7. विभागीय चौकशी :– उक्त अधिकारी यांच्या विरूध्द विभागीय चौकशी सुरू करावयाची असल्यास त्यांच्या सेवा मुळ विभागात प्रत्यार्पित करण्यात येतील.
8. कायमचे समावेशन :– उक्त अधिकारी यांची नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड च्या सेवेमध्ये सामावून घेतले जाण्याची इच्छा असल्यास, महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी व नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड च्या मान्यतेने त्यांना सामावून घेतल्यास उक्त अधिकारी त्यास सामावून घेतल्याच्या तारखेपासून महानगरपालिकेतून सेवेतून निवृत्त झाल्याचे मानले जाईल.
9. वार्षिक गोपनिय अहवाल :– उक्त अधिकारी यांचे प्रतिनियुक्ती कालावधीतील गोपनिय अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिवेदीत करतील व त्यास मा. आयुक्त हे पुनर्विलोकीत करतील.
10. सेवा पुस्तकातील नोंदी :– उक्त अधिकारी यांच्या सेवापुस्तकातील नोंदी अद्यावत ठेवण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड यांची राहील.

श्री. महेश मोरोणे सहा. आयुक्त, म.न.पा. कार्यरत उप मुख्य कार्यकारी अधिकारी नागपूर स्मार्ट व सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमीटेड यांना वर नमुद शर्ती व अटींवर प्रतिनियुक्तीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर (NSSCDCL) येथे पाठविण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 432:– महाराष्ट्र महानगरपालीका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम 2008) व शासन निर्णय क्रंमाक एस.आर.व्ही. 2016/प्र. क्र. 509/12 दिनांक 15 मे 2019 अन्वये, नागपूर महानगरपालिकेत

कर्मचा–यांच्या विनंतीवरुन आंतर जिल्हा बदलीबाबतचे धोरण निश्चित करण्याकरीता विधी समितीद्वारे आंतर जिल्हा बदली धोरण (विनियम) तयार करण्यात आले आहे. उक्त '' आंतर जिल्हा बदली धोरण (विनियम) 2019'' ला परिशिष्ट 'अ' प्रमाणे मंजूरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 433:– घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील अंतर्भुत नियम 15 (भ) तरतुदीनुसार नागपूर महानगरपालिका मध्ये MRF सेंटर सुरू करावयाचे आहे.

तसेच महिला व बालकल्याण विषेश समितीची दि. 28/08/2018 रोजी डॉ. पंजाबराव देषमुख स्थायी समिती सभागृहात भरलेल्या आढावा समितीच्या अहवालातील विशय क्र. 2 नुसार झोन निहाय कचऱ्यांचे संकलन केंद्र सुरू करण्याबाबत माहिती देण्यात आली. तसेच बचत गटाना संकलनाचे प्रषिक्षण देऊन संकलीत करण्यात आलेल्या कचऱ्याची वेडंर मार्फत उचल करून रिसायकलींग करिता पाठविण्यात येईल. त्याप्रमाणे मा. सभापती महिला व बालकल्याण समिती मार्फत दहाहि झोनचे सहा. आयुक्त यांना पत्राद्वारे कळविण्यात आले. या मध्ये महिला बचत गट व कचरा वेचक यांचे उपजीवीकेचे साधन म्हणून प्रत्येक झोन मध्ये MRF सेंटर उभारण्याकरिता मा. सभापती यांनी निर्देशित केले. सदर MRF सेंटर सुरू करतेवेळी खालील प्रमाणे नियमानुसार MRF सेंटर सुरू करणे उचित होईल.

1) MRF सेंटर सुरू करतांना प्रषासकिय मान्यता घेऊन सदर MRF सेंटर बाबत नियमावली तयार करणे.
2) मनपाने नियुक्त केलेल्या संकलन व वाहतुक एजेन्सी सोबत ज्या व्यक्ती, संस्था यांना MRF सेंटर देण्यात येईल अशा व्यक्ती व संस्था यांच्या सोबत करारनामा करणे आवश्यक आहे.
3) MRF सेंटर वर कचरा आणण्याची तसेच त्याचे विलगीकरण योग्य पध्दतीने कचरा वेचकाद्वारे करावयाची जबावदारी MRF सेंटर चालविण्यावर राहिल.
4) MRF सेंटर वर विलगीकरण करून ज्या कचऱ्यावर प्रक्रिया होऊ शकते अंशा कचऱ्याची उचल संकलन व वाहतुक एजेन्सी द्वारे करण्यात येईल.
5) मनपाने नियुक्त केलेल्या संकलन व वाहतुक एजेन्सी द्वारे घराघरातून उचल करण्यात आलेल्या सुखा कचरा MRF सेंटर वर आणून देणार काय, यांची जबावदारी निश्चीत करणे आवश्यक आहे.
6) MRF सेंटर वर देखरेखी करिता झोन मार्फत एका व्यक्तीची नेमणूक करणे आवश्यक राहिल.
7) MRF सेंटर वर लाईट, पाणी याची व्यवस्था करणे.
8) MRF सेंटर हे बचत गटामार्फत कार्यान्वीत करून त्यांचे सोबत कचरा वेचकांना एकीकृत करावे.
9) MRF सेंटर वरती येणाऱ्या सुक्या कचऱ्यापासून त्रास होऊ नये व त्याची स्वच्छता ठेवणे व निर्जुन्तीकरण करणे याची जवाबदारी ही MRF सेंटर चालविणाऱ्या वर राहिल.

करिता सदर MRF सेंटर सुरू करण्याचा दृष्टीने सदर प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, माझा एकच प्रश्न मा.आयुक्तांना आहे. एम.आर.एफ. सेंटर तयार करण्याचा प्रश्न आहे. माझी प्रशासनाला आपल्या माध्यमातून विनंती आहे. हा विषय सभागृहात आणण्यापूर्वी असे एम.आर.एफ. सेंटर निर्माण केले आहे काय? कुणाच्या परवानगीने निर्माण केले याची माहिती सभागृहात देण्यात यावी. उपायुक्त स्तराच्या अधिका–याने माहिती दयावी. या विभागाच्या उपायुक्ताने माहिती दयावी.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :– मा.महापौरजी, या विभागाला सध्या उपायुक्त नसल्यामुळे अति.आयुक्त म्हणुन उत्तर देतो.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, या विभागाचा उपायुक्त कोण आहे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी):– मा.महापौरजी, या विभागाचे उपायुक्त शेख साहेबच आहे. परंतु त्यांना कॅफोचा चार्ज देण्यात आला असल्यामुळे उपायुक्तांच्या फाईल डायरेक्ट अति.आयुक्तांकडे यायला लागल्या.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, मग त्यांच्याकडे ओ.ॲन्ड एम. नाही आहे काय? त्यांच्याकडे हेल्थ नाही आहे काय? ते मागे बसले आहे मग ते असे कसे उत्तर देवु शकत नाही. जोशी साहेबांनी उत्तर दिले तर मला काही हरकत नाही. माझा एक सोपा प्रश्न आहे की हा विषय सभागृहात आणण्याच्या आधी एम.आर.एफ. सेंटर सुरु झाले आहे काय? आणि झाले असतील तर कोणाच्या परवानगीने सुरु झाले आहे.

अपर आयुक्त (श्री.अजीज शेख) :– मा.महापौर महोदया, माझ्याकडे आधी उपायुक्त म्हणून हेल्थ विभागाचा चार्ज होता. सभागृहामध्ये हा विषय आणण्याच्या आधी आपले 6 एम.आर.एफ. सेंटर आपले सुरु झालेले होते. त्यातील 1 बंद झाले आहे. आणि 5 सध्यस्थितीमध्ये कार्यरत आहे.

श्री.प्रविण दटके:– मा.महापौरजी, एखादया नगरसेवकांनी जर समाजभवनामध्ये जनतेच्या समस्या सोडविण्याकरीता टेबल खुर्ची टाकुन बसला असेल तर ते चालत नाही. एखादया स्वयंसेवी संस्थेला त्याच्या कामासाठी दिले तर चालत नाही. पण कचरा एखादया महानगरपालिकेच्या प्रॉपर्टीमध्ये आणुन त्याचे सॅगरीगेशन करुन त्यातुन स्क्रॅप बाहेर काढुन ते विकणे ते विकण्याचे काम एखादया एन.जी.ओ. च्या माध्यमातून एखादया बचत गटाकडुन करवुन घेणे याच्याकरीता महानगरपालिकेच्या प्रॉपर्टीचा उपयोग होत आहे. हा करता येतो काय? कोणत्या संबंधित प्राधीकरणाने याची मंजूरी दिली. हा प्रकल्प महानगरपालिकेच्या नाईट कॉलेजमध्ये समाजासाठी बांधण्यात आलेल्या समाजभवनामध्ये सुरु आहे. म्हणुन हा माझा प्रश्न आहे. माझा एम.आर.एफ. सेंटरला बिलकुल विरोध नाही. एम.आर.एफ. सेंटर केलेच पाहिजे, नियमानुसार केले पाहिजे. ज्यांच्याकरीता जे गरजेचे आहे अशा स्क्रॅप पिकर करणाऱ्या लोकांसाठी केलेच पाहिजे. याच्यात माझा कुठलाही विरोध नाही. स्वच्छ भारत अभियानामध्ये विषय असतील तर स्तुत्य उपयोगी आहे त्याचे स्वागतच केले पाहिजे. पण हे करतांना नियमावली पाळली पाहिजे की नाही पाहिजे, की प्रविण दटके बादशहा झाला आणि महानगरपालिकेच्या 7 जागा दिल्या असे होवु शकते काय? असे जर देता येत असेल तर अनेक जागा मी सांगतो ते देवून टाका.

श्री.हरीश दिकोंडवार :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन एम.आर.एफ. सेंटर या ठिकाणी आपण सुरु केले त्या प्रभागाच्या नगरसेवकांना लोकेशन फिक्स करतांना आपण विचारले सुध्दा नाही. आमच्या प्रभागात नंदनवन शाळेच्या वुमेन्स कॉलेजच्या अगदी समोर आपण एम.आर.एफ. सेंटर उभारले इतक्या दाट क्षेत्रामध्ये आणि आजुबाजुच्या क्षेत्रामध्ये दोन ते तीन शाळा असतांना ती कंपाउन्ड वॉल तोडुन आपण एम.आर.एफ. सेंटर उभे केले आणि त्या ठिकाणी खरचं आपण कचरा संकलन केंद्र होवु शकते काय? आपण कोणाच्या परवानगीने ती जागा आपण फिक्स केली. आणि ती जागा फिक्स करतांना आपण त्या प्रभागातील नगरसेवकांना विश्वासात घेतले काय? याची माहीती सुध्दा त्यांना नाही दिली. आम्ही जेव्हा सहा.आयुक्तांना जेव्हा विचारणा केली. सहा. आयुक्तांच्या माध्यमातून आम्हाला माहिती पडले की हे कचरा संकलन केंद्र आहे. महिला बचत गटाला देण्यात येत आहे. म्हणजे लोकांनी जेव्हा तक्रार केली की ही कंपाउन्ड वॉल कशासाठी तोडण्यात येत आहे. तेव्हा आम्हाला काहीच माहिती नव्हते, त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची विचारणा न करतांना अशाप्रकारचे सेंटर आपण शाळेच्या परिसरामध्ये, दाट वस्तीमध्ये कशा प्रकारे आपण लोकेशन फिक्स केले याची सुध्दा आम्हाला माहिती देण्यात यावी.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, त्यांनी त्यांचा विषय सांगितला वुमेन्स कॉलेजच्या बाजुला कंजेस्टेड वस्ती, ते तर बाजुला होते मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीच्या आत जिथे नागपूर नाईट कॉलेज चालते तिथे भविष्यामध्ये बाळासाहेब स्मारक होणार आहे त्या स्मारकाच्या आत एम.आर.एफ. सेंटर सुरु आहे. आमच्या सन्माननिय नगरसेविका वाघमारे ताई असतील तेथल्या प्रिसींपलनी तक्रार केली, तेथे कोण शिकते मा.महापौरजी, ज्यांना सकाळी वेळ मिळत नाही. म्हणुन रात्री बिचारे विद्यार्थी शिकायला येतात त्याच्या एका क्लास रुममध्ये हे सेंटर सुरु आहे. आणि हे काम एन.जी.ओ. ला मिळाले पाहिजे. बचत गटाला मिळाले पाहिजे. त्या गरीब महिलांना काम मिळाले पाहिजे या बद्दल काहीच दुमत नाही. पण ज्या एन.जी.ओ. ला आपण हे काम दिले त्याची भाषा कशी, आपल्या विरोधात प्रेस घेतली मा.महापौरजी, आणि त्या प्रेसमध्ये त्यानी कबुल केले की आम्हाला अनधिकृत पध्दतीने ही जागा मिळाली आहे हे कबुल केले पण तरी ते चालु ठेवण्यात यावे. एखादया एन.जी.ओ. ला आपण पैसे कमविण्याकरीता या क्षेत्रामध्ये आणतो काय? स्क्रॅप पिकरसाठी असणारी योजना तत्सम लोकांना मिळाली पाहिजे की दिलेल्या बचत गटाला मिळाली पाहिजे त्याचे नियम आहे. आणि हे सगळे डॉ.दासरवार, मा.शेख साहेब, मा.जोशी साहेब यांच्या नजरेखालून गेले आहे. मी मा.महापौरजी पत्र तत्सम व्यक्तीला मी पत्र दिल्यावर फाईलची सुरुवात झाली, हे एम.आर.एफ. सेंटर सुरु होवून किमान 5 महिने झाले असतील, 6 महिन्यानंतर आमचे नगरसेविका दिव्याताई धुरडे, किंवा वाघमारे ताई यांनी जेव्हा आम्हाला सांगितले तेव्हा आम्ही पत्र दिले की हे नियमात आहे काय? त्याची कुठली नस्ती झाली काय? मा.आयुक्त, मा.स्थायी समिती, मा.सभागृह, मा.महापौरांनी परवानगी दिले काय? त्याच्यानंतर नस्ती सुरु झाली. मी महिला व बालकल्याण समितीला धन्यवाद देतो, त्यांनी हा उपक्रम समोर आणला, त्यांची काही चुक नव्हती, महिला व बाल कल्याण

समितीने म्हटले नाही की नियम बाजुला ठेवुन सेंटर दया, त्यांनी पत्रामध्ये लिहिले आहे. तेव्हाच्या अध्यक्षा होत्या प्रगतीताई पाटील ते पत्र आहे. मिनीटस् आहे त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की नियमांचे पालन करुन सेंटर दया. आणि यांनी त्यांच्या खांदयावर बंदुक ठेवुन इललीगल धंदे केले. एम.आर.एफ. सेंटरचे निर्माण झालेच पाहिजे. 10 नाही तर 100 झाले पाहिजे, परंतु याच्या आधी जे एम.आर.एफ. सेंटर सुरु होते. जे जे अधिकारी याच्यामध्ये असतील त्यांच्यावर 72 क प्रमाणे कारवाई केली पाहिजे. त्यामध्ये दंडात्मक कारवाई असेल तर ते, निलंबन असेल तर ते, वापस पाठवायचे असेल तर वापस पाठवावे, कारण की एखादा नगरसेवक तसा वागला असता तर नंदलाल समितीमध्ये त्याचे सदस्यत्व रद्द झाले असते, त्यामुळे 72 (क) ला अनुसरुन जे जे लोक यामध्ये आहे. त्यांच्यावर नियमानुसार आणि रितसर कारवाई व्हावी असा आदेश आपण आयुक्तांना दयावा आणि एम.आर.एफ. सेंटर मंजूर करावे,

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी स्वतः सन्माननीय आयुक्तांनी 7 दिवसांत करावी, आणि हा विषय मंजूर करावा.

वरील चर्चेनंतर घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील अंतर्भुत नियम 15 (H) तरतुदीनुसार नागपूर महानगरपालिका मध्ये MRF सेंटर सुरू करावयाचे आहे.

तसेच महिला व बालकल्याण विषेश समितीची दि. 28/08/2018 रोजी डॉ. पंजाबराव देषमुख स्थायी समिती सभागृहात भरलेल्या आढावा समितीच्या अहवालातील विशय क्र. 2 नुसार झोन निहाय कचऱ्यांचे संकलन केंद्र सुरू करण्याबाबत माहिती देण्यात आली. तसेच बचत गटाना संकलनाचे प्रशिक्षण देऊन संकलीत करण्यात आलेल्या कचऱ्याची वेडंर मार्फत उचल करून रिसायकलींग करिता पाठविण्यात येईल. त्याप्रमाणे मा. सभापती महिला व बालकल्याण समिती मार्फत दहाहि झोनचे सहा. आयुक्त यांना पत्राद्वारे कळविण्यात आले. या मध्ये महिला बचत गट व कचरा वेचक यांचे उपजीवीकेचे साधन म्हणून प्रत्येक झोन मध्ये MRF सेंटर उभारण्याकरिता मा. सभापती यांनी निर्देशित केले. सदर MRF सेंटर सुरू करतेवेळी खालील प्रमाणे नियमानुसार MRF सेंटर सुरू करणे उचित होईल.

1) MRF सेंटर सुरू करतांना प्रषासकिय मान्यता घेऊन सदर MRF सेंटर बाबत नियमावली तयार करणे.

2) मनपाने नियुक्त केलेल्या संकलन व वाहतुक एजेन्सी सोबत ज्या व्यक्ती, संस्था यांना MRF सेंटर देण्यात येईल अषा व्यक्ती व संस्था यांच्या सोबत करारनामा करणे आवष्यक आहे.

3) MRF सेंटर वर कचरा आणण्याची तसेच त्याचे विलगीकरण योग्य पध्दतीने कचरा वेचकाद्वारे करावयाची जबावदारी MRF सेंटर चालविण्यावर राहिल.

4) MRF सेंटर वर विलगीकरण करून ज्या कचऱ्यावर प्रक्रिया होऊ शकते अशा कचऱ्याची उचल संकलन व वाहतुक एजेन्सी द्वारे करण्यात येईल.

5) मनपाने नियुक्त केलेल्या संकलन व वाहतुक एजेन्सी द्वारे घराघरातून उचल करण्यात आलेल्या सुखा कचरा MRF सेंटर वर आणून देणार काय, यांची जबावदारी निश्चीत करणे आवष्यक आहे.

6) MRF सेंटर वर देखरेखी करिता झोन मार्फत एका व्यक्तीची नेमणूक करणे आवश्यक राहिल.

7) MRF सेंटर वर लाईट, पाणी याची व्यवस्था करणे.

8) MRF सेंटर हे बचत गटामार्फत कार्यान्वीत करून त्यांचे सोबत कचरा वेचकांना एकीकृत करावे.

9) MRF सेंटर वरती येणाऱ्या सुक्या कचऱ्यापासून त्रास होऊ नये व त्याची स्वच्छता ठेवणे व निर्जुन्तीकरण करणे याची जवाबदारी ही MRF सेंटर चालविणाऱ्या वर राहिल.

करिता सदर MRF सेंटर सुरू करण्याचा दृश्टीने सदर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्य श्री. प्रवीण दटके यांनी केलेल्या सुचनेनुसार सभागृहात हा विषय आणण्यापुर्वी कोणाचीही परवानगी न घेता एम.आर. एफ. सेंटर निर्माण करण्यात आले. नियमाप्रमाणे महानगरपालिकेच्या प्रॉपर्टीमध्ये कचरा आणुन त्याचे सॅगरीगेशन करुन त्यातुन स्क्रॅप बाहेर काढुन ते विकण्याचे काम एखादया एन.जी.ओ. च्या माध्यमातून एखादया बचत गटाकडुन करवुन घेणे असे करता येते काय? कोणत्या संबंधित प्राधीकरणाने याची मंजूरी दिली. हा प्रकल्प महानगरपालिकेच्या नाईट कॉलेजमध्ये, समाजासाठी बांधण्यात आलेल्या समाजभवनामध्ये सुरु आहे. याच्या आधी जे एम.आर.एफ. सेंटर सुरु होते. यात जे जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कलम 72 (क)(2) प्रमाणे कारवाई केली पाहिजे. त्यामध्ये दंडात्मक कारवाई असेल, निलंबनाची कार्यवाही असेल किंवा या प्रकरणांशी संबंधित अधिकारी जे शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आले आहेत त्यांना परत पाठवणे असेल तसेच कलम 72

(क)(2) ला अनुसरुन जे जे लोक यामध्ये आहे. त्यांच्यावर नियमानुसार आणि रितसर कारवाई व्हावी असा आदेश आपण आयुक्तांना दयावा. तसेच एम.आर.एफ. सेंटरच्या निविदा प्रक्रिया पुर्ण करून याकरिता योग्य रॅगपिकरशी संबंधित बचत गट (कचरा उचलणा–या मजूराशी संबंधित) यांचे मार्फत सेंटर लावण्याची प्रक्रिया पुर्ण करावी या मा.सदस्य श्री.प्रवीण दटके यांनी केलेल्या सुचनेसह तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी स्वतः सन्माननीय आयुक्तांनी 7 दिवसांत करावी आणि त्यानंतरच हा विषय मंजूर करावा या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.434 :– सर्वसाधारण जिल्हा वार्शिक योजना सन 2017–18 व 2018–19 या आर्थीक वर्शा करीता महाराश्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्थान अभियाना अंतर्गत मंजूर अनुदानातून उत्तर नागपूर क्षेत्रा साठी रु. 3,24,52,313 ⁄ – रक्कमेच्या एकूण 19 कामांना मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे कडून, शासनाचा आर्थिक सहभाग 50 टक्के रु. 1,62,26,156 ⁄ – व महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग 50 टक्के रु. 1,62,26,157 ⁄ – राहील या अटीवर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार व अटीशर्तीनुसार सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे एकुण 19 कामांना म.न.पा च्या रु. 1,62,26,157 ⁄ –इतक्या 50ः च्या आर्थीक सहभागासह मंजुरी प्रदान करण्याचा प्रष्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 435ः– स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2020मध्ये नागपूर महानगरपालिका, नागपूर सहभागी असून या सर्वेक्षणा अंतर्गत केन्द्रीय पथकाद्वारे सर्वेक्षण करुन नामांकन देण्यात येणार आहे. या सर्वेक्षणा अंतर्गत शहराला तारांकिंत गुणवत्ता (Star Rating) ठरविण्यात येणार असून 1,3, 5 व 7 रेटींग अंर्तभुत आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे मानके नमुद आहेत.

Matrix- Star Rating Protocol for Garbage Free Cities

| Indicator | 1 Star | 3 Star | 5 Star | 7 Star |
|---|---|---|---|---|
| Mandatory | At least 40% | At least 60% | At least 85% | At least 95% |
| Essantial | At least 30% | At least 50% | At least 80% | At least 90% |
| Desirable | -Not Applicable- | At least 30% | At least 60% | At least 80% |

| Scoring- Star Rating Protocol for Garbage Free Cities | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Component Condition | Maximum Marks | LEVEL 1 | LEVEL 2 | LEVEL 3 | LEVEL 4 | Weightage |
| | | MANDATORY | | | | | | |
| WARD LEVEL | M1 | D2D | 100 | 50 | 75 | 100 | 100 | 12% |
| | M2 | Stegregation at Ward Level | 100 | 30 | 60 | 80 | 100 | 16% |
| | M3 | Sweeping | 100 | 50 | 75 | 100 | 100 | 12% |
| | M4 | Litter Bins | 100 | 35 | 50 | 75 | 100 | 8% |
| | M5 | Storage Bins | 100 | 50 | 75 | 100 | 100 | 8% |
| CITY LEVEL | M6 | Waste Processing Wet Waste | 100 | 35 | 50 | 75 | 100 | 10% |
| | M7 | Waste Processing Capacity Wet Waste | 100 | 35 | 50 | 100 | 100 | 8% |
| | M8 | Waste Processing – Dry Waste | 100 | 35 | 50 | 75 | 100 | 8% |
| | M9 | Waste Processing Capacity – Dry Waste | 100 | 35 | 50 | 100 | 100 | 8% |
| | M10 | Grievance Redressal | 100 | 50 | 75 | 90 | 100 | 10% |
| | | | | | | | | 100 % |
| | | ESSENTIAL | | | | | | |
| WARD LEVEL | E1 | BWG | 100 | 30 | 50 | 75 | 100 | 12% |
| | E2 | Penalty/ Spot Fines | 100 | 30 | 50 | 75 | 100 | 12% |
| CITY LEV | E3 | Segregation at City Level | 100 | 30 | 50 | 75 | 100 | 10% |
| | E4 | User Charges | 100 | 30 | 50 | 75 | 100 | 14% |
| | E5 | Plastic Ban | 100 | 30 | 50 | 100 | 100 | 12% |
| | E6 | C&D Waste - Collection | 100 | 30 | 75 | 100 | 100 | 10% |
| | E7 | Scientific Landfill – Availability & Use | 100 | 30 | 50 | 100 | 100 | 10% |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| EL | E8 | Scientific Landfill – Waste disposed | 100 | 30 | 50 | 75 | 100 | 10% |
| | E9 (A) | No visible Solid waste in water bodies and storm water drains | 100 | 30 | 50 | 100 | 100 | 5% |
| | E9 (B) | Screening of Nallahs | 100 | 30 | 50 | 100 | 100 | 5% |
| | | | | | | | | 100 % |
| | | DESIRABLE | | | | | | |
| WARD LEVEL | D1 | Sustainability | 100 | 30 | 50 | 75 | 100 | 25% |
| | D2 | On-site Wet waste processing | 100 | 25 | 50 | 75 | 100 | 20% |
| CITY LEVEL | D3 | C&D waste- Storage, Segregation, Processing Recycling | 100 | 50 | 75 | 75 | 100 | 20% |
| | D4 | C&D Waste – Use of materials | 100 | 20 | 50 | 75 | 100 | 15% |
| | D5 | Dumpsite Remediation | 100 | 25 | 50 | 75 | 100 | 20% |

उपरोक्त तक्त्यात प्रस्तावित नमुद 3 स्टार गुणवत्ते मध्ये नागपूर शहराचे नामांकन दाखल करणे प्रस्तावित आहे.

नागपूर महानगरपालिका, नागपूर या शहराच्या तारांकिंत गुणवत्ते करीता (Star Rating) अंतर्गत केन्द्रीय मार्गदर्षक तत्वाप्रमाणे घोषणापत्र खालील प्रमाणे उपलब्ध करणे आवष्यक आहे.

1) मा. महापौर, मा. आयुक्त यांचे घोषणापत्र
2) मा. नगरसेवक (सर्व) यांचे घोशणापत्र
3) बल्क वेस्ट जनरेटर यांचे स्वयंम घोषणापत्र
4) नागरीक प्रतिनिधी यांचे स्वयंम घोषणापत्र

या अंतर्गत मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नागरीकांकडून प्रथमता सूचना/हरकती मागवून सदर प्रकरणी प्रषासकीय स्तरावर सुचना/हरकतीचे निराकरण करुन तद्नंतर अंतिम ठराव सभागृहाच्या पटलावर सादर करण्यात येईल.

यास्तव उपरोक्त विशयाचे प्रारुप मनपा सर्वसाधारण सभेत प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 436:– श्री. दिपराजजी पार्डीकर मा. उपमहापौर, श्री. संदीपजी जोषी मा. सत्तापक्षनेता यांनी केलेल्या षिफारषीनूसार नागपूर महानगरपालिकामध्ये सफाई कामगार म्हणुन काम करीत असतांना मृत्यु/ऐच्छिक सेवानिवृत्ती/वैद्यकिय अपात्र/सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा–यांच्या वारसदारांनी महाराष्ट्र शासन निर्णय दि. 21 ऑक्टोबर 2011 नुसार सेवाकाळ संपल्याच्या दिनांका पासून (1) एका वर्षाच्या आत नोकरीकरीता अर्ज सादर न केल्याने त्यांचे प्रकरण वेळे बाहेर झाल्याने त्यांना लाड कमेटी अंतर्गत वारसा हक्काचा लाभ देण्यात आलेला नाही. अष्या वेळे बाहेर झालेल्या वारसदारांना लाड कमेटी शिफारशीनूसार वारसा हक्क मिळावे याकरीता "महाराष्ट्र शासन" सामान्य प्रशासन विभागाचे षासन निर्णय क्रमांकः अंकपा–1014/प्र.क्र. 164/आठ दि. 20 में 2015 नुसार षासकीय कर्मचा–यांच्या मृत्युनंतर 1 वर्षाच्या आत अनुकंम्पा नियुक्तीसाठी पात्र वारसदाराने अर्ज सादर करणे आवष्यक आहे. तथापि एका वर्षानंतर 2 वर्श इतक्या कालावधीपर्यत (मृत्युच्या दिनांका पासून 3 वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन विभागाच्या विभागप्रमुखांना देण्यात येत आहे. असे नमुद आहे त्याच धर्तीवर आरोग्य विभागातर्फे सफाई कामगार म्हणुन मृत्यु/ऐच्छिक सेवानिवृत्ती/वैद्यकिय अपात्र/सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा–यांच्या त्या वारसांना ज्यांनी तत्संम कारनांमुळे (1) एका वर्षाच्या आत नोकरीचे अर्ज सादर केलेले नाही, अश्या तत्संम कारण नसना–या वारसदारांना त्यांचे ( मृत्यु/ऐच्छिक सेवानिवृत्ती/वैद्यकिय अपात्र/सेवानिवृत्त) झालेल्या मुळ कर्मचा–यांच्या जागेवर वारस हक्क मिळण्याकरीता (मृत्यु/ऐच्छिक सेवानिवृत्ती/वैद्यकिय अपात्र/सेवानिवृत्त झालेल्या दिनांकापासून 3 वर्शापर्यंत) अर्ज सादर कारण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करून वारस हक्क मिळण्याबाबतचा विषय सभागृहाने विचारात घेवून अनेक ऐवजदार काही ना काही कारणांमुळे किंवा कमी शिक्षीत असल्यामुळे ते अर्ज करू शकले नाही त्यामुळे त्यांचे प्रकरण वेळे बाहेर झाले अशा वेळे बाहेर झालेल्या वारसदारांना किमान याचा एक कालावधी ठरवुन यामध्ये जर ते बसत असतील तर त्यांनाही क्षमापित करुन

त्यांनाही घ्यावे या मा.सदस्य श्री.प्रवीण दटके यांनी केलेली सुचना तसेच बाहेर झालेल्या वारसदारांना लाड कमेटी शिफारशीनूसार वारसा हक्क मिळावे याकरिता त्यांची यादी तयार करुन ती यादी क्षमापित करण्याकरीता संबंधित राज्य शासनाकडे ती पाठविण्यात यावी आणि नंतर ते मंजूर करण्यात यावे. या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 437:– महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966

नागपूर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्राण नियमावलीमध्ये विनियम क्र. एन–2..9 (3) मध्ये दाटीवाटी विरहित क्षेत्रासाठी शासकीय/निमशासकीय आणि सावर्जनिक क्षेत्राअंतर्गत कार्यालयासाठी अनुज्ञेय चटईक्षेत्रा निर्देशांक मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37अन्वये फेरबदल.

संदर्भ :– शासन निर्णय क्र. टिपीएस–2418/704/प्र.क्र.40/2019/नवि–9, दि. 08.03.2019

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना, (यापुढे श्उक्त विकास योजनाश असे संबोधले आहे). महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 (सन 1966 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 37) (यापुढे श्उक्त अधिनियमश असे संबोधले आहे) चे कलम 31(1) अन्वये शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस–2496 /2643/प्र.क्र.300(अ)/97/ नवि–9, दि. 07.01.2000 अन्वये मंजूर झाली असून ती दि. 01.03. 2000 पासून अंमलता आली आहे, तसेच नागपूर शहराची सुधारीत विकास योजना विकास नियंत्राण नियमावली शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस–2400/1684/प्र.क्र.235/2014/नवि–9, दि. 31.03.2001 अन्वये मंजूर झाली असून ती दि. 09.04.2001 पासून अंमलात आली आहे व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी सुधारणा केलेल्या आहेत (यापुढे "उक्त विकास नियंत्रण नियमावली" असे संबोधले आहे).

उक्त विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम क्र. एन–2.9(3) मध्ये शासकीय / नियमशासकीय आणि सावर्जनिक क्षेत्राअंतर्गत कार्यालयासाठी अतिरीक्त चटईक्षेत्रा निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची तरतूद आहे. राज्यातील इतर महानगरपालिका क्षेत्रासाठी शासकीय / निमशासकीय आणि सावर्जनिक क्षेत्राअंतर्गत कार्यालयासाठी अनुज्ञेय चटईक्षेत्रा निर्देशांक मंजूर करण्याची तरतूद करण्यात आलेल्या आहेत. या तरतूदीशी सुसंगत तरतूद नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या विद्यमान तरतूदीमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे शासनचे मत झाले आहे. आणि या उद्देशासाठी शासनाने नागपूर महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 37(1) अन्वये कलम 154 अन्वये खालीलप्रमाणे निदेश देण्यात आलेले आहे.

शनिदेशश

श्नागपूर महानगरपालिकेच्या उक्त विकास नियंत्राण नियमावलीमध्ये विनियम क्र. एन–2.9(3) मधील विद्यमान तरतूदी ऐवजी खालीलप्रमाणे नविन तरतूद अंतर्भूत करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 37 अन्वये आवश्यक फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करून प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावा. तसेच सदर तरतूद या निदेशाच्या दिनांकापासून अंमलात आणावी.श

N-2.9(3) Building of Government and Semi-Government Offices and Public Sector under taking in non-congested area

| Categories of the other buildings | Basic FSI | Additional FSI | Rate of the Premium | Conditions if any |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| Buildings of Government and Semi/ Government Offices and Public Sector Undertakings | As per Ragulation No. N-2.9(6) | Maximum buildings potential limit as per road width as mention in Regulation No. N-2.9(6) Column 7/8 of Table minus Basic FSI | No Premium for building of Government and Semi/Govt. Offices, Local authorities. For public sector building premium equal to 30% | i) The Municipal Commisioner / Chairman, Nagpur Improvement Trust may allow the additional FSI.<br>ii) Minimum and maximum height shall be 3.60 m. & 4.2 m. respectively. The greater height may be permitted by the Authority as per the |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | requirement. |

तेंव्हा वरीलप्रमाणे फेरबदलाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कमल 37 अन्वये कार्यवाही करणे तसेच सदर फेरबदलाची सुचना शासन राजपत्राात, दैनिक वर्तमान पत्राात प्रसिध्द करून त्यावरील प्राप्त आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवुन प्रस्ताव शासनास सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून विषयाला प्राप्त लेखी सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

सुचना

प्रभाग क्र 27 –ब अंतर्गत कबीरनगर उद्यान हे विकसीत करण्याच्या दृष्टीकोणातून नागपूर मनपा तर्फे उद्यानात विविध प्रकारचे काम चालू होते. परंतु नव्या डी.पी.प्लान मध्ये ती जागा प्ले ग्राउन्ड म्हणून आरक्षित दाखवलेले आहे. वास्तविक पाहता अनेक वर्षापासुन तेथे उद्यान अस्तित्वात आहे.

करीता सध्या स्थितीत असलेले प्ले ग्राउन्डचे आरक्षण बदलवून उद्यानाकरीता आरक्षित करण्याच्या दृष्टीने कलम 37(1) अन्वये कार्यवाही करुन हा विषय मंजूर करण्यात यावा ही विनंती.

आपली

(दिव्या धुरडे)
नगरसेविका
म.न.पा. नागपूर

श्री.संदीप जोशी :– विषय क्र 357 मध्ये अहवाल आहे. जर छोटा अहवाल असेल तर त्याचे वाचन केले पाहिजे अन्यथा संबंधितांना त्याची प्रत वितरीत केले पाहिजे.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, अहवालाचे वाचन करावे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, जर तो अहवाल छोटा असेल तर आताच वाचला पाहिजे, नसेल तर आम्हा सर्वांना त्याची प्रत दयावी.

महापौर :– 10 पानांचा तो अहवाल आहे. सगळयांना वितरीत करण्यात यावा.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, सभागृहात अहवाल हा पटलावर ठेवलेला आहे. त्याच्यामुळे तो शेवटी मिनीटस् वर येणारच आहे. काही सदस्य सभागृह सोडुन सुध्दा गेले आहे. त्यामुळे तो सर्वांना मिळेल. तो अहवाल 7 दिवसांत सर्व सदस्यांना पाठवून दया.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, या अहवालांचे आताच वाचन होवु दया आणि त्यावर आताच चर्चा सुध्दा होवु दया. कारण की विषय हा लहान नाही. जर अहवालाचे वाचन करीत नसेल तर मला त्यावर चर्चा करु दया. विरोधी पक्षाचा मी आहे ना.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, विषय स्पष्ट आहे. अहवाल ठेवायला सांगितला होता अहवाल ठेवला आहे. आज अर्धे सदस्य विरोधी पक्षाचे गेले आहे. ते केवळ एकटे आहे. त्यामुळे आज काही तरी चर्चा करुन निपटवुन घेतल्या पेक्षा तो अहवाल आम्हालाही वाचायचे आहे. आम्हाला सुध्दा चर्चा करायची आहे. नुसत्या वाचल्यावर आम्हाला समजणार नाही. आम्हाला सुध्दा तो वाचावा लागेल, 7 दिवसाच्या आत त्या अहवालाच्या प्रती मा.सदस्यांना देवुन पुढच्या सभागृहात त्यावर चर्चा करु.

ठराव क्र. 438:– नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक 28.06.2019 चे स्थगित विशेष सभेत झालेल्या चर्चेनुसार मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये, मनपा च्या विद्युत विभागातील एलईडी लाईट संदर्भात चौकशी मा. अति. आयुक्त यांचे अध्यक्षते खाली करण्याचे निर्देश होते. मा. अति. आायुक्त (1) यांनी सादर केलेला चौकशी अहवाल (नस्तीत उपलब्ध "बंद लिफापा" प्रमाणे) सभागृहाच्या समक्ष सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून सभागृहात चौकशी अहवाल ठेवायला सांगितला होता आणि तो अहवाल ठेवलेला आहे. परंतु सभागृहात आज विरोधी पक्षाचे अर्धे सदस्य सभागृह सोडून गेल्यामुळे 7 दिवसाच्या आत त्या अहवालाच्या प्रती मा.सदस्यांना देवुन पुढच्या सभागृहात त्यावर चर्चा करण्यात यावी या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार पुढच्या सभागृहात चर्चा करण्यात येईल. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोशणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.439 :— महाराष्ट्र वनविकास महामंडळ यांचे मागणीनुसार खसरा क्र. 113 ऐवजी खसरा क्र. 114 क्षेत्र 0.28 हे.आर. जागा महाराष्ट्र वन विकास महामंडळ लिमिटेड यांना मुळ ठराव क्र. 79 दि. 19.08.2017 मधिल अटींवर प्रदान करण्याच्या व या अनुषंगाने कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका यांना प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.440 :— केंद्र शासन व राज्य शासन पूरस्कृत ''अमृत'' योजनेअंतर्गत जलकुंभ बांधण्याकरिता धरमपेठ चिल्ड्रेन ट्रॉफीक पार्क मधील महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेलगतची पंजाबराव कृषी विद्यापिठाच्या मालकीची व सध्या महाराष्ट्र पशू व मत्स विज्ञान विद्यापिठाच्या ताब्यात असलेली 678 चौ.मी. जागा घेणे व बदल्यात महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापिठाने मागणी केल्यानुसार महानगरपालिकेच्या मालकीची अंदाजे 1578 चौ.मी. जागा महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापिठास देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 441:— महाराश्ट्र षासन राजपत्र असाधारण भाग (ब) नगर विकास विभाग दि. 01 जुलै 2019 प्रकाषित केलेली अधिसुचना प्राप्त झाली असुन महाराश्ट्र षासन राज्यातील महानगरपालिके मध्ये सदर उपविधीची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देत आहे. करीता सदरचा विषय म.न.पा. सभागृहाच्या माहितीस्तव सादर प्रष्न सभागृहाने विचारात घेवून मा.सत्तापक्ष नेते यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय पुढच्या सभागृहात घेण्यात यावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोशणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 442:— आसीनगर झोन क्र. 9अंतर्गत प्रभाग क्र. 7 लष्करीबाग येथील वापरात नसलेली व शिकस्त झालेली लष्करीबाग मराठी उच्च प्राथमिक शाळेची ईमारत तोडण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून विषयाला प्राप्त लेखी उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

1) उपसुचना

अर्ज लिखने का कारण की, तकीया का जो सरकारी संडास है श्री.तिमांडे के घर के पास है वह तोडना है। कारण वहा संडास बुरी तरह खराब हो चुका है। और वह नागरीकयोंको बिमारी होने की आशंका है। और वहा के लोगो को परेशानी हो रही है। कृपा करके वह संडास तोडने की कृपा करे।

सुचकः — श्री.लखन येरवार
अनुमोदकः— श्री.विजय चुटेले

2)उपसुचना

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रभाग क्र 17 अंतर्गत येणाऱ्या आयसोलेशन हॉस्पीटल समोरील वाल्मिकी समाज भवन अत्यंत दयनीय स्थिती मध्ये आहे. या समाज भवनात समाजपयोगी कार्यक्रम राभविलेले जातात त्या समाज भवनात कित्येक वर्षापासुन, स्लॅप खराब झाल्याने पाण्याचे लिकेज होत असल्याने या इमारतीचे बांधकाम पाडण्यात यावे, हीच नम्र विनंती.

सुचक :— श्री. विजय चुटेले
अनुमोदक :— श्री.लहुकुमार बेहते

3)उपसुचना

स्वच्छ सुंदर आणि अतिक्रमणमुक्त नागपूरचे स्वप्न बघणाऱ्या, राज्याचे मुख्यमंत्री मा.देंवेंद्रजी फडणवीस यांच्याच दक्षिण—पश्चिम मतदार संघातील प्रभाग क्र 17 मध्ये मात्र अतिक्रमणांचा मोठा पसारा झालेला आहे.

प्रभाग क्र 17 मधील टिंबर मार्केट ते घाटरोड चौक या रस्त्यावर एक चबुतरा आणि त्यापुढे एक छोटेसे मंदिर बांधण्यात आले आहे, त्यामुळे ही जागा शिकस्त झाली असून तीन चाकी वाहनांना सुध्दा जाणे करायला कठीण झालेलं आहे. परिणामी वाहन चालकांना फेऱ्याने जावे लागते.

तरी आपणांस विनंती आहे कि हा चबुतरा तोडून या भागातील जनतेसाठी तो रस्ता मोकळा करावा. त्यामुळे वाहतुकीची कोंडीही कमी होईल सबब हे अनुधिकृत अतिक्रमण शक्य तितक्या लवकर तोडून सीानिक नागरिकांना दिलासा द्यावा.

मा.महोदय, शहरातील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम सध्या सुरु आहे. मात्र आजवर माझ्या प्रभाग क्र 17

मधील कुंदनलाल गुप्ता वाचनालया समोरील मैदानावर असलेल्या दर्गासदृष्य अनधिकृत बांधकाम अद्याप तोडण्यात आलेले नाही. सदरहु मैदान नागपूर मनपाचे असून परिसरातील मुलं, महिला, वृध्दांसाठी तेथे उद्यान तयार केले जाणार आहे. या दर्ग्याविषयी खोटी माहिती पुरवून तो 20 वर्ष जुना असल्याचे नमूद करीत त्यास अ वर्ग देण्याचा घाट बांधला.

प्रत्यक्षात हा दर्गा 6–7 वर्षापूर्वी अवैधरित्या अतिक्रमण करुन बांधण्यात आलेला आहे. त्याची कुठेही नोंदणी नाही आणि कर ही भरला जात नाही.

या ठिकाणी समाजकंटक एकत्र जमून पत्ते खेळतात. जुगार खेळतात. भांडण तंटे करुन अश्लिल शिवीगाळ करतात. त्यामुळे इथल्या वॉकिंग ट्रॅकवर येणाऱ्या महिला व तरुणीमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तरी आपणांस विनंती आहे की, मैदानावरील हे अतिक्रमण त्वरीत हटवून मला आणि प्रभाग क्र 17 मधील समस्त नागरिकांना अभय मिळावे, ही नम्र विनंती.

सूचक :– श्री. विजय चुटेले
अनुमोदक :– श्री. लहुकुमार बेहते

ठराव क्र.443:– महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग निर्णय GR-ESR-2010/307/iz. क्र. 40/2010 ता. क. 1, दिनांक 04.06.2010 अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार नागपूर महानगरपालिकेस शहराचा पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल तयार करणे अनिवार्य आहे. याप्रमाणे वर्श 2018–19 करीता नागपूर षहराचा पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल (ESR), राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान (निरी) मार्फत तयार करण्यात आला असुन, पर्यावरण स्थिती दर्षक अहवालास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.444:– नागपूर शहरातील वाहतुकीच्या कोंडीबाबत जनहित याचिका क्र. 5/2016 मध्ये वाहतुकीची कोंडी संपुष्टात आणण्याकरीता मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे विस्तृत पार्किंग व्यवस्थापन आराखडा मे. यु.एम.टी.सी. कंपनी हैद्राबाद यांनी तयार केलेला आहे. या विस्तृत पार्किंग व्यवस्थापन आराखडयामध्ये प्रामुख्याने खालील बाबी समाविष्ट आहेत. शहरातील मुख्यभाग, मुख्य भागालगत असलेले मुख्य तसेच लहान रस्ते, या ठिकाणी सार्वजनीक पार्किंगची व्यवस्था करणे, नो पार्किंग व पार्किंगची जागा ठरविणे, रस्त्याच्या बाजुला पार्किंग स्थळ ठरविणे, रस्त्यावर व्यवस्थितरीत्या पार्किंगची व्यवस्था करणे इं. बाबींचा समावेश आहे. करीता पार्किंग पॉलीसीच्या अनुषंगाने नागपूर शहराकरीता मे. यु.एम.टी.सी. यांनी तयार केलेल्या विस्तृत पार्किंग व्यवस्थापनच्या अंतिम आराखडयास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून पुढच्या सभागृहात प्रेझेंटेशन दाखवून चर्चा करण्यात यावी या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय पुढच्या सभागृहासमोर ठेवण्यात यावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.445 :– प्रभाग क्र. 32 जुना सुभेदार ले आऊट येथील महानगरपालिकेची दुर्गानगर माध्यमिक षाळेच्या दक्षिणेकडील मुलांचे व मुलींचे स्वच्छतागृह, स्ट्रक्चरल अभियंता यांच्या अहवालानुसार 5.50 X 8.0 मी. मापाचे दोन मजली ईमारत षिकस्त असल्यामुळे, सदर ईमारत पाडणे आवष्यक आहे. करीता सदर ईमारत पाडण्याचा प्रष्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, विषय क्र 365 मंजूर करीत असतांना सन्माननिय मुख्यमंत्री, सन्माननिय मंत्रीमंडळ यांच्या अभिनंदनासह हा विषय मंजूर करण्यात यावा. नागपूर शहरातील अत्यंत मोठा विषय ज्यामध्ये मागील 70 वर्षापासून झोपडपट्टीवासी पटटे वाटपाची मागणी करायचे परंतु 70 वर्षापैकी 65 वर्ष या महाराष्ट्र शासनातील कोणीही पट्टे वाटप केले नाही. परंतु मा.मुख्यमंत्री यांनी पट्टेवाटप सुरु केले. हे होत असतांना शासकीय जमिनीवरचे पट्टे वाटप सुरु झाले. परंतु खाजगी जमिनीवरची जेवढी मंडळी होती त्याच्या पट्टे वाटपाच्या प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे हा विषय या ठिकाणी सभागृह मंजूर करीत असतांनाच काल सन्माननिय मुख्यमंत्र्यांनी कॅबिनेटमध्ये या विषयाला मंजूरी दिली आहे. आता खाजगी जमिनीवर असलेल्या सर्व खाजगी मंडळींना देखील पट्टे वाटप होणार आहे. आणि ज्यामध्ये आरक्षण आहे अशा सर्व जागेवर पट्टे वाटप

चालु होणार आहे. त्यामुळे संपुर्ण विषय मंजूर करीत असतांना मा.मुख्यमंत्री आणि सन्माननिय मंत्रीमंडळाचे अभिनंदन करुन हा विषय मंजूर करण्यात यावा.

ठराव क्र. 446 :– नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनूसार विविध जागी जसे नझुल, महाराष्ट्र शासन, नागपूर महानगरपालिका, नागपूर सूधार प्रन्यास अथवा खाजगी मालकीच्या जागेत नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनूसार अस्तित्वात असलेले विविध आरक्षणे वगळून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टयांच्या जागी Housing वित LIG/EWS करीता जागा आरक्षित करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेस्तव.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस – 2496 –2643– प्र.क्र. 300(अ)–97–नवि–9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस– 2400–1628–सी.आर.–200–नवि–9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस – 2401–885–प्र. क्र.–76/नवि–9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार महानगरपालिका नियोजन क्षेत्रातील विविध जागी जसे नझुल, महाराष्ट्र षासन, नागपूर महानगरपालिका, नागपूर सूधार प्रन्यास अथवा खाजगी मालकीच्या जागेत नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनूसार अस्तित्वात असलेले विविध आरक्षणे वा जागेचा वापर बदलवून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टयांच्या जागी Housing वित LIG/EWS करीता जागा आरक्षित करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये प्रस्तावित आहे.

नागपूर षहराच्या मंजुर विकास योजनेनूसार विविध जागी जसे नझुल, महाराष्ट्र शासन, नागपूर महानगरपालिका, नागपूर सूधार प्रन्यास अथवा खाजगी मालकीच्या जागेत नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनूसार अस्तित्वात असलेले विविध आरक्षणे वा जागेचा वापर बदलवून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टयांच्या जागी Housing वित LIG/EWS करीता जागा आरक्षित करण्यास्तव महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास वसलेल्या झोपडपट्टयाखालील जागेच्या मालकी हक्काच्या कागदपत्रांची पडताळणी करून केवळ खाजगी जागेवरील झोपडपट्टयांखालील जागा Housing वित LIG/EWS या प्रयोजनासाठी राखीव ठेवण्याबाबत फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.447:– म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये गठीत नामकरण समितीच्या दिनांक 21.06. 2019 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ' म.न.पा. साधारण सभा ठराव क्र. 314 दि. 20.2.2018 च्या अनुषंगाने मूळ विषय आला असता हा विषय विभागास परत पाठविण्यात येत असून अन्य 2 विषय एकमताने मंजूर करण्यात आले.) करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

परिशिष्ट 'अ'

नामकरण समितीच्या दिनांक 21/06/2019 रोजी दुपारी 12.00 वाजता भरलेल्या सभेचा अहवाल.

उपस्थित सभासद

| | |
|---|---|
| मा. श्री. दिपराज भैय्याजी पार्डीकर, उपमहापौर | अध्यक्ष |
| मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल, | सदस्य |

मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी सदस्य
मा. श्री. लहुकुमार दत्तुजी बेहते सदस्य
मा. श्री. षेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम सदस्य

अनुपस्थित सभासद

मा. श्री. दिनेष वसंतलाल यादव सदस्य
मा. सौ. चेतना राजू टांक सदस्या

अध्यक्ष :— सभेची कार्यवाही सुरू करुन आजच्या आजच्या नामकरण समितीच्या सभेत नामकरण करण्याबाबतचा मनपा साधारण सभा ठराव क्र. 314 दि. 20.12.2018 चा प्रस्ताव ठेवण्यात आला असता हा मूळ विषय विभागास परत पाठविण्या येतो व अन्य एकूण 2 प्रस्ताव नामकरण समिती समोर ठेवण्यात आले व सर्व प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. 21.06.2019 रोजी च्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय

| अ.क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपषिल | या पूर्वी नाव दिले असल्यास निर्णय म.न.पा ठराव | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| 1ण | श्री. मोहम्मद जमाल नगरसेवक प्र. क्र. 7 मंगलाताई लांजेवार नगरसेविका प्र. क्र. 7 सौ. विरंकाताई भिवगडे नगरसेविका प्र. क्र. 7 | मनपा साधारण सभा ठराव क्र. 314, दि. 20/12/2018 अन्वये प्रभाग क्र. 7 येथे बाराखोली पासुन जाणाऱ्या, रस्त्या लगतच्या नाल्याला ''न्यु इंदोरा कॅनल'' असे नाव देण्याबाबत. | | नस्ती विकासयंत्री यांचे कडे पाठविण्यात येते. |
| 2ण | श्री. मोहम्मद जमाल नगरसेवक प्र. क्र. 7 मंगलाताई लांजेवार नगरसेविका प्र. क्र. 7 सौ. विरंकाताई भिवगडे नगरसेविका प्र. क्र. 7 | मनपा साधारण सभा ठराव क्र. 314, दि. 20/12/2018 अन्वये प्रभाग क्र. 7 मधील न्यु. इंदोरा झोपडा या परिसराला ''जेतवन नगर न्यु इंदोरा'' असे नाव देण्याबाबत. | | नस्ती विकासयंत्री यांचे कडे पाठविण्यात येते. |
| 3ण | श्री. ॲड. निषांत गांधी नगरसेवक श्री. सुनिल हिरणवार नगरसेवक प्र. क्र. 15 श्री. संजय बंगाले नगरसेवक प्र.क्र. 15 सौ. रूपाताई राय नगरसेविका प्र.क्र. 15 सौ. उज्वलाताई ष्षर्मा नगरसेविका प्र.क्र. 15 | व्हि.आय.पी. रोडवर अलंकार चौक ते भोले पेट्रोल पंप चौकाच्या मध्ये येणाऱ्या वाय पॉईंटला /चौक /जंक्षनला ''महेष चौक'' असें नामकरण करण्याबाबत. | | मंजुर |
| 4ण | श्री. प्रमोद कौरती नगरसेवक प्र.क्र. 14 | स्वर्गिय वसंतराव नाईक चौक ते हिस्लॉप कॉलेज चौकापर्यंतच्या | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | श्री. कमलेष चौधरी<br>नगरसेवक प्र.क्र. 14<br>सौ. प्रगतीताई पाटील<br>नगरसेविका प्र.क्र. 14<br>सौ. षिल्पाताई धोटे<br>नगरसेविका प्र.क्र. 14 | मार्गाला ''सर कस्तुरचंद डागा मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | | मंजुर |

ठराव क्र.448 :— म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये गठीत नामकरण समितीच्या दिनांक 05.07. 2019 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

परिशिष्ट 'अ'

नामकरण समितीच्या दिनांक 05/07/2019 रोजी सकाळी 11.00 वाजता भरलेल्या सभेचा अहवाल.

उपस्थित सभासद

मा. श्री. दिपराज भैय्याजी पार्डीकर, उपमहापौर — अध्यक्ष
मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल — सदस्य
मा. श्री. दिनेश बसंतलाल यादव — सदस्य
मा. सौ. चेतना राजु टांक — सदस्या

अनुपस्थित सभासद

मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी — सदस्य
मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते — सदस्य
मा. श्री. शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम — सदस्य

अध्यक्ष :— सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या सभेतनामकरण करण्याबाबतचा एक प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हा एक प्रस्ताव एक मताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. 05.07.2019 रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

| अनु क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपशिल | या पुर्वी नाव दिले असल्यास निर्णय मनपा ठराव | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ. कांताताई रारोकर<br>नगरसेविका प्र. क्र. 23<br>सौ. मनिषाताई धावडे<br>नगरसेविका प्र. क्र. 23<br>श्री. नरेंद्र बोरकर<br>नगरसेवक प्र. क्र. 23<br>श्री. दुनेश्वर पेठे | प्रभाग क्र. 23 येथील माहेश्वरी भवन जवळ असलेल्या उद्यानास ''हिवरी नगर बाल उद्यान'' असे नामकरण करण्याबाबत. | | मंजुर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नगरसेवक प्र. क्र. 23 | | | |

ठराव क्र. 449ः– म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये गठीत नामकरण समितीच्या दिनांक 07.08. 2019 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून विषयाला प्राप्त उपसुचनेनुसार हा विषय मंजुर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

उपसुचना

म.न.पा. सर्वसाधारण सभा दि. 22.08.2019 रोजी विषय क्र. 368 मनपा ठराव क्र. 72 अंतर्गत प्रभाग क्र. 15 मधील 1) कै.पात्रीकर मास्तर (सिताबर्डी) मार्ग 2) मा.कै. सुमतीताई सुकळीकर चौक (अलंकार टप्‍ च्‍वंक ) 3) श्री. सुमतीनाथ स्वामी जैन मार्ग (रामदासपेठ) आदि. विविध भागाचे नामकरण शिफारसींना आजची ही सभा सर्वोमताने मंजूरी प्रदान करीत आहे.

सुचक / हस्ताः–संजय अनंत बंगाले प्रभाग क्र. 15(ड)

अनुमोदक / हस्ताः– सुनील हिरणवार प्रभाग क्र. 15(अ)

परिशिष्ट 'अ'

नामकरण समितीच्या दि. 07.08.2019 रोजी दुपारी 3.00 वाजता भरलेल्या सभेचा अहवाल

उपस्थित सभासद

| अनु क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1) | मा. श्री. दिपराज भैय्याजी पार्डीकर, उपमहापौर | अध्यक्ष |
| 2) | मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |
| 3) | मा. श्री. दिनेष बसंतलाल यादव | सदस्य |
| 4) | मा. श्री. षेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 5) | मा. सौ. चेतना राजु टांक | सदस्या |

अनुपस्थित सभासद

| अनु क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1) | मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 2) | मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य |

अध्यक्ष :– सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या सभेत नामकरण करण्याबाबतचे तिन प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हे तिन प्रस्ताव एक मताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. 07.08.2019 रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

| अनु क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपशिल | या पुर्वी नाव दिले असल्यास निर्णय मनपा ठराव | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ. शकुंतला पारवे नगरसेविका प्र. क्र. 20<br>सौ. यशश्री नंदनवार नगरसेविका प्र. क्र. 20<br>मा. श्री. दिपराज पार्डीकर उपमहापौर<br>श्री. रमेश पुणेकर नगरसेवक प्र. क्र. 20 | प्रभाग क्र. 20 मेहंदीबाग प्राथमिक शाळा लालगंज, बारीपूरा चौक, मातंगनगर, नागपूर येथील इमारतीला साहित्य रत्न ''अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन'' असे नामकरण करण्याबाबत. | --- | मंजुर |
| 2 | सौ. लता काडगाये नगरसेविका प्र. क्र. 17<br>सौ. हर्षला साबळे नगरसेविका प्र. क्र. 17<br>श्री. विजय चुटेले नगरसेवक प्र. क्र. 17<br>श्री. प्रमोद चिखले नगरसेवक प्र. क्र. 17 | प्रभाग क्र. 17 अंतर्गत गणेशपेठ येथील समाज भवनाला व लगतच्या मार्गाला ''स्व. श्री. नानाजी देवराव साळुंके'' असे नामकरण करण्याबाबत. | --- | मंजुर |
| 3 | मा. महापौर सौ. नंदा जिचकार प्र. क्र. 37<br>सौ. सोनाली कडू नगरसेविका प्र. क्र. 37<br>श्री. प्रमोद तभाणे नगरसेवक प्र. क्र. 37<br>श्री. दिलीप दिवे नगरसेवक प्र. क्र. 37 | प्रभाग क्र. 37 गोपाल नगर येथील तिसरा बस स्टॉप, परसोडी कॉर्नर रोड जवळील चौकास ''सद्भावना चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | --- | मंजुर |

हस्ता/– दिपराज भैय्याजी पार्डीकर
अध्यक्ष
नामकरण समिती,

ठराव क्र. 450 : – महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर व इतर भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्याने तेथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. मोठया प्रमाणावर नागरिकांना विस्थापित करण्यात आले असून उद्भवलेल्या आपातकालिन स्थितीत नागपूर महानगरपालिकडुन या पूरग्रस्त/बाढग्रस्त नागरीकांच्या मदतीकरिता मुख्यमंत्री सहाय्यता निधीत रु. 20 लक्ष राशी ची मदत पाठविण्याकरिता चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता नोटीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र. 451 : — आदेश क्र. 23/ओ अॅन्ड एम, दि. 15/05/2014 नुसार एकुण 16 व्यक्तींना वर्ग — 4 मध्ये नियुक्ती देण्यात आली. तसेच या सर्वांना आदेश क्र. 61/ओ अॅन्ड एम, दि. 23/09/2015 ला ठराव क्र. 35, दि. 20/01/2015 अन्वये वर्ग—3 मध्ये त्यांच्या वर्ग—4 च्या नियुक्तीच्या दिनांकापासुन सेवाजेष्ठता देण्यात आली. तसेच यांना रोस्टर लावण्यात आलेले नाही.

- ➢ आदेश क्र. 64/ओ अॅन्ड एम, दि. 28/09/2015 नुसार एकुण 123 व्यक्तींना वर्ग — 4 मध्ये नियुक्ती देण्यांत आली.
- ➢ तसेच आदेश क्र. 64/ओ अॅन्ड एम, दि. 28/09/2015 या आदेशातील 19 कर्मचाऱ्यांना वर्ग — 3 मध्ये आदेश क्र. 220/ओ अॅन्ड एम, दि. 09/03/2017 नुसार उन्नत करण्यात आले. आणि या सर्वांना वर्ग — 4 च्या नियुक्ती दिनांकापासुन सेवाजेष्ठता देण्यात आली. तसेच त्यांना नियुक्ती देतांना रोस्टर मध्ये 19 जागा खाली होत्या. त्या पुर्णच भरण्यात आल्या.
- ➢ आदेश क्र. 64/ओ अॅन्ड एम, दि. 28/09/2015 मधील 57 कर्मचाऱ्यांना आदेश क्र. 220/ओ अॅन्ड एम, दि. 30/01/2018 नुसार वर्ग — 3 मध्ये उन्नत करून वर्ग — 3 च्या आदेशाच्या दिनांकापासुन सेवाजेष्ठता देण्यात आली. आणि रोस्टर मध्ये 81 जागा असुन जातीच्या श्रेणीनुसार 57 जागा भरण्यात आल्या.
- ➢ आदेष क्र. 64/ओ अॅन्ड एम, दि. 28/09/2015 मधील 07 कर्मचाऱ्यांना आदेश क्र. 220/ओ अॅन्ड एम, दि. 14/09/2018 नुसार वर्ग — 3 मध्ये उन्नत करून वर्ग — 3 आदेशाच्या दिनांकापासुन सेवाजेष्ठता देण्यात आली. आणि यांना सुध्दा रोस्टर लावण्यात आले. रोस्टर मध्ये 25 जागा असुन जातीच्या श्रेणीनुसार 07 जागा भरण्यात आल्या.
- ➢ सर्व कर्मचारी अनुकंपा तत्वावर लागलेले असुन प्रत्येक आदेशामध्ये तफावत का दिसुन येत आहे?
- ➢ ठराव क्र. 35, दि. 20/01/2015 या नुसार सेवाजेष्ठता का देण्यात येत नाही

करीता वरील सर्व मुद्यावर सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता नोटीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय विधी व सामान्य प्रशासन विशेष समितीकडे वर्ग करण्यात येते. मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.452 : — नागपूर महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (स्थापत्य) यांना उप अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्याकरीता नागपूर महानगरपालिकेच्या विभागीय पदोन्नती समितीने नुकतीच बैठक घेवून पदोन्नती देण्याची शिफारस करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करून सभागृहाने निर्णय घेण्याकरीता नोटीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून हा प्रश्न एकतर असा येवु नये असे विधीलिखीत आहे. मा. अनिलजी सोले, माजी महापौर यांनी तो विषय मांडला होता. या अनुषंगाने काही कर्मचारी ऑक्टोबर महिन्यात रिटायर्ड होणार आहे त्यामुळे हा विषय मी या ठिकाणी आणला, त्यामुळे मी सर्वप्रथम या सभागृहाची माफी मागतो की हा विषय असा येवु नये. परंतु कर्मचा—यांच्या पदोन्नतीला होत असलेला विलंब व त्यामुळे उद्‌भवणा—या अडचणी लक्षात घेता शाखा अभियंता/सहा.अभियंता—श्रेणी 2 यांच्यामधून उप अभियंता पदावर पदोन्नती देण्यासाठी प्रशासनाने विभागीय पदोन्नती समितीकडून मान्यता घेतलेली आहे. त्या यादीप्रमाणे उप अभियंता पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणे. तसेच दुसरा भाग म्हणजे श्री.कोहाड आणि श्री.हटवार यांचेवर चौकशी सुरू असल्याने त्यांना न्यायालयाच्या निर्णयाला अधीन राहून पदोन्नती देणे तसेच श्री.देवघरे यांना जात वैद्यता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर पदोन्नती देणे आणि श्री.आसलकर यांना पदोन्नती परीक्षा नंतर उतीर्ण करण्याच्या अटीवर पदोन्नती देणे या चारही अभियंत्यांना तदर्थ लाभ पदधतीने म्हणजे नजिकच्या काळात उपअभियंत्या पदाच्या रिक्त होणा—या जागा आताच भरून काढणे. या प्रमाणे या अगोदर तदर्थ लाभ पध्दतीने अधिका—यांची पदे महानगरपालिकेत भरली गेलेली आहेत. महानगरपालिकेत अधिकारी, कर्मचारी यांची कमतरता आणि कामाचा व्याप लक्षात घेता याप्रमाणे लवकरात लवकर उपअभियंता पदाची पदे भरणे तसेच तिसरा भाग म्हणजे यानंतर रिक्त होणारी उप अभियंत्यांची पदे पदोन्नतीने भरतांना सेवाजेष्ठतेनुसार प्रतिक्षा यादी तयार

करून त्यानुसार आयुक्त महानगरपालिका उपअभियंत्यांची पदे पदोन्नतीने भरतील. या मा.सदस्य श्री.प्रवीण दटके यांनी केलेल्या सुचनेनुसार तसेच विषयाला प्राप्त मा.सदस्य श्री.प्रवीण दटके आणि मा. सदस्य ॲड.धर्मपाल मेश्राम यांच्या लेखी सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

सुचना

महाराष्ट्र शासनाने मनपा व नासुप्र एकत्रीकरणाचा निर्णय घेतलेला आहे. असे असतांना नासुप्रने दि. 16/08/2019 रोजी डी.पी.सी. बैठक घेवून अभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे मनपा अभियंत्यावर अन्याय होणार असल्यामुळे मनपात कार्यकारी अभियंता पदावर अतिरिक्त स्वरुपात काम करणाऱ्या उपअभियंत्याना पदोन्नती देण्याचा विषय मंजूर करुन क्च्छ च्या शिफारसीनुसार त्यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देण्याचा विषय सभागृहाने निर्णय घेण्याकरीता सादर

नागपूर महानगरपालिका येथे कार्यकारी अभियंता (सिव्हील) पदावर कार्य करणारे अभियंता

| अनु.क्र. | पदवी (क्महतमम) | अनु. क्र. | पदविका (क्पचसवउं) |
|---|---|---|---|
| 1. | श्री.वासनिक | 1 | श्री.अमीन |
| 2. | श्री.रहाटे | 2 | श्री.कडू |
| 3. | श्री.नागदिवे | | |
| 4. | श्री.बोदिले | | |
| 5. | श्री.बाराहाते | | |
| 6. | श्री.खोत | | |
| 7. | श्री.मेश्राम | | |
| 8. | श्री.मेंडूलकर | | |

मा सदस्य श्री.प्रविण दटके

सुचना

दिनांक 21.08.2019 चे महासभेचे विषय क्र. 371ला संलग्न सुचना :–

1) श्री. श्रीकांत जर्नादन देशपांडे, कनिष्ठ अभियंता

2) श्री. मधुसूदन संगेवार, कनिष्ठ अभियंता

3) श्री. वामन देवरावजी फिरके, कनिष्ठ अभियंता

4) श्री. विजय मधुकरराव कोलते, कनिष्ठ अभियंता

5) श्री. राजीव वडगुजी धानोरकर, कनिष्ठ अभियंता

वरील 1 ते 5 कनिष्ठ अभियंत्यांनी सन 1999 ला म.न.पा. ची परवानगी घेऊन नाशिक महाविद्यालयाक कनिष्ठ अभियंता पदाची अर्हताकारी परिक्षा पास केली होती.

त्यापैकी अ.क्र. 1 श्री. देशपांडे यांना आदेश क्र. 62/ O&M दि. 11/06/2013 ला व अ. क्र. 2 संगेवार यांना आदेश क्र. 62/ O&M दि. 07/09/2013 ला पदोन्नती देण्यात आली व वरील अ.क्र. 1 व 2 दोघांनाही सेवाज्येष्ठतेचा लाभ सन 2003 पासून देण्यात आला.

उपरोक्त पाच पैकी अ.क्र. 3,4,5 श्री. फिरके श्री. कोलते व श्री. धानोरकर यांना आदेश क्र. 182/ O&M दि. 12/10/2017 चे आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली, परंतु अ.क्र. 1 व 2 प्रमाणे सेवाज्येष्ठतेचा लाभ देण्यात आला नाही.

करीता कृपया अ.क्र.1 व 2 प्रमाणे अ.क्र. 3,4,5, यांना सुध्दा सन 2003 पासून सेवाजेष्ठतेचा लाभ देण्यात यावा व त्यानुसार सेवाजेष्ठता यादीत दुरूस्ती करण्यात यावी. या सुचनेसहविषय क्र. 371 ला कृपया मान्यता

प्रदान करावी.

(ॲड. धर्मपाल मेश्राम)
सभापती
विधी व सामान्य प्रशासनसमिती
महानगरपालिका, नागपूर

ठराव क्र. 453: – नागपूर महानगरपालिकेद्वारा घरोघरी कचरा गोळा केल्या जातो. त्यासाठी मनपाने रु. 60/– प्रति महिनाप्रमाणे शुल्क आकारणी केल्या जात आहे. त्यासंबंधी मनपाने कोणते धोरण निश्चित केले व केव्हा केले यासंबंधी माहिती जाणुन घेणे व या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीकडे वर्ग करण्यात येते. मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.454 : – समेकित क्षेत्रीय कौशल विकास, पुनर्वास एवं दिव्यांगजन सशक्तीकरण केंद्र नागपूर (Under Administative Control of Nattional Institute for Empowerment of Persons with Multiplle Disablities) Department of Empowerment of Persons with Disablilities (Divyangian), Ministry of Socical Justice & Empowerment, Govt . of India) या संस्थेने के. टी. नगर येथील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या दोन इमारतीपैकी ज्या इमारतीमध्ये प्रथम मजला व दुसरा मजल्यावरील SRA चे कार्यालय असलेले इमारतीमधील तीसऱ्या मजला ते सहाव्या मजल्यापर्यतची इमारत अस्थायी स्वरुपात भाडयाने दिव्यांगजन यांचे शिक्षणाकरीता देणेबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "1 (जे)" प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून विषयाला प्राप्त लेखी सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

सुचना

समेकित क्षेत्रीय कौशल्य विकास , पुनर्वास एवं दिव्यांगजन सशक्तीकरण केंद्र नागपूर (under empowerment of persons with multiple disabilities ) Department of empowerment of persons with multiple disabilities (divyangian) ministry of social justice & empowerment, govt of India ) या संस्थेने के.टी. नगर येथील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या दोन ईमारतीपैकी ज्या इमारतीमध्ये प्रथम मजला व दुसरा मजल्यावरील SRA चे कार्यालय असलेल्या इमारतीमधील तीसरा मजला ते सहाव्या मजल्यापर्यतची इमारत अस्थायी स्वरुपात भाडयाने दिव्यांगजन यांचे शिक्षणाकरीता मागणीनुसार संबंधीत विभागाने जे दर प्रस्तावित केले आहे त्यावर 90 टक्के सुट देवुन फक्त 10 टक्के शुल्क दर घेण्यास या सभागृहाने एकमताने सहमती देण्यात यावी, ही विनंती.

सुचक
निशांत गांधी

प्रश्न क्र.170:– नागपूर मनपा मंगळवारी झोन क्र. 10 अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र.9 मधील कामठी रोड गुरुद्वारा जवळील सिंधी चाळच्या मागून वाहत असलेल्या नाल्यातील गाळाचा तातडीने उपसा संदर्भात प्रश्न

श्री.नरेंद्र वालदे :– सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय उपमहापौरजी, सन्माननिय आयुक्त महोदय, सन्माननिय स्थायी समिती सभापतीजी, सन्माननिय सर्व पक्षीय गटनेताजी, माझा विषय असा आहे की, नागपूर महानगरपालिकेच्या मंगळवारी झोन क्र 10 अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र 9 मधील कामठी रोडवरील गोल बाजार चौक ते गड्डी गोदाम ते गुरुव्दारा रेल्वेक्रॉसींग मध्ये नागपूर महानगरपालिकेव्दारा गरजु व्यवसायीकांना व्यवसाय करण्याकरीता कामठी रोड या मुख्य मार्गाला लागून 10 बाय 10 चे गाळे उपलब्ध करुन देण्यात आले, एका चांगल्या उद्येशाने नागपूर महानगरपालिकेने हे गाळे दिले त्यामुळे महानगरपालिकेच्या कोषात भर देखील पडली. गाळे उपलब्ध करुन देण्याच्या पुर्वीपासून या 10 बाय 10 च्या उपलब्ध करुन दिलेल्या गाळयाच्या मागून अंदाजे 5 फुट मोकळी जागा व त्याच्यानंतर महानगरपालिकेचा 20 फुट रुंदीचा नाला पुर्वी पासून वाहत आहे. त्यानंतर पुन्हा 5 फुटाच्या मोकळया जागेनंतर शासकीय तंत्रनिकेतनची भिंत आहे. याचा अर्थ असा की गाळयाच्या मागे

जवळपास 30 फुटाची जागा ही मोकळी सोडण्यात आली होती याच मोकळया जागेतून आपले नाला गॅगचे कर्मचारी व साफसफाई कर्मचारी या नाल्याचे नियमित साफसफाई व उपसा करायचे, सदर गाळेधारकांनी आपल्या कठोर श्रमाच्या बळावर आपल्या व्यवसायाची व आपली आर्थिक प्रगती केली. दिवसेंदिवस वाढत असलेल्या व्यवसायामुळे महानगरपालिकेने त्यांना उपलब्ध करुन दिलेले गाळे अपुरे पडु लागले म्हणुन त्यांनी प्रथम त्यांच्या गाळयाच्या व नाल्याच्या मागील 5–5 फुटाची जागा बेमालुमपणे कच्चे बांधकाम करुन ताब्यात घेवून त्या जागेचा व्यवसायिक व्यापार चालु केला, या गाळयामध्ये जाण्याकरीता मुख्य रस्त्यामधुन प्रवेश असल्यामुळे गाळेधारकांचे तत्कालीन बेकायदेशीर अतिक्रमण त्या परिसरातील नागरिकांच्या लक्षात आले नाही. व त्याकाळी अतिक्रमणाचा नागरिकांना कसलाही त्रास नसल्यामुळे नागरिकांनी त्यावर काही आक्षेप घेतला नाही. महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने सुध्दा अतिक्रमणाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे सदर गाळेधारकांची हिमंत वाढली. त्यांनी निर्ढावलेपणाने आणि कोणाचीही तमा न बाळगता राजरोसपणे या 20 फुट नाल्यावर स्लॅब टाकुन नाल्यानंतरची शासकीय तंत्रनिकेतन भिंतीपर्यत मोकळया असलेल्या 5 फुटाच्या जागेवर सुध्दा अतिक्रमण करुन त्यावर पक्के बांधकाम केले, त्या परिसरातील नागरिकांना या नाल्यावरील अतिक्रमणामुळे भविष्यामध्ये भयानक त्रास सोसावा लागेल याची थोडीशी देखील शंका नागरिकांना त्यावेळी न आल्यामुळे नागरिकांनी त्याकाळी या अतिक्रमणावर आरोप घेतला नाही. दिवसेंदिवस आपल्या नाला गॅगला त्या नाल्याची साफसफाई व उपसा करणे कठीन होवु लागले व कालांतराने अशक्य झाले. गाळेधारक दररोज व्यवसायातून निघणारा केरकचरा व टाकाऊ वस्तु नाल्यामध्ये टाकु लागले व तो टाकलेल्या ठिकाणी साचून नाल्याच्या नैसर्गिक रित्या वाहणाऱ्या पाण्याला अडथळा निर्माण करु लागले, नाल्याची खोली अंदाजे 8 फुट खोल असल्यामुळे बरेच वर्ष परिसरातील खोलगट भागात वसलेल्या वसाहतींना त्रास झाला नाही. जसे मनपाने नागपूर शहरातील अन्य भागातील नाल्यावरील अतिक्रमण काढले. तसेच माझ्या प्रभागातील या नाल्यावरील अतिक्रमणामुळे माझ्या परिसरातील लोकांच्या घरात 2–2 फुट पाणी व रस्त्यावर 5–5 फुट पाणी साचते याचे छायाचित्र माझ्याकडे उपलब्ध आहेत. मला या सभागृहात म्हणायचे आहे की या नाल्यावरील अतिक्रमण पुर्णपणे काढुन मला हा नाला मोकळा करुन देण्यात यावे. असे मी या सभागृहाला विनंती करतो.

मो. जमाल :– मा.महापौरजी, मै यह चाहुॅंगा की इस प्रकरण से जो जिम्मेदार अधिकारी यहापर आये। इसमे जो उत्तर दिया हुआ है उसमे कहा है की नालेपर स्लॅप डालने की अनुमती प्रदान है। मैने जहातक जानकारी अर्जित किया है की यह परमीशन किस अधिकारीयोंने दी है। मंगलवारी झोन के अधिकारी इसका जवाब दे।

श्री.हरीष राऊत (सहा.आयुक्त ) :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्या अनुषंगाने दि. 13 ऑगस्ट 2019 रोजी आम्ही अतिक्रमणाची गॅग घेवून गेलो होतो तेथे परंतु अतिक्रमण कारवाई करतांना तेथील काही दुकानदारांनी सॅग्शन नकाशे सादर केले, त्यामध्ये 20 जुलै 1973 चे सॅग्शन आहे. आणि त्यामध्ये नाल्यावर ते सॅग्शन दिले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या ए.डी.डी.टी.पी. विभागाच्या माध्यमातून ते दिलेले आहे. त्यामुळे कारवाई करता आली नाही.

मो.जमाल :– मा.महापौरजी वह जगह किसकी है।

श्री.हरीष राऊत (सहा.आयुक्त ) :– मा.महापौरजी, ती जागा नझुल विभागाची आहे. ती जागा त्यांना लिजवर मिळाली आहे. तेथील दुकानदारांनी नकाशा सॅग्शन दाखविले आहे. त्यांनी वेळ मागितला आहे 15 दिवसांचा आणि काही दुकानदारांनी नकाशा सॅग्शनची प्रत विभागाला सादर केली आहे. ते तपासून पुढील कारवाई करता येईल.

श्री.नरेंद्र वालदे :– मा.महापौरजी, मला एक म्हणायचे आहे की नाल्यावर अतिक्रमण करून बांधकामाच्या नकाशाची मंजूरी महानगरपालिका देते काय? ज्यांच्याकडे त्या नाल्यावर बांधकामाच्या नकाशाची प्रत आहे ती मला उपलब्ध करुन देण्यात यावी. तेथे 112 दुकाने आहे. किती लोकांकडे त्याची सॅग्शन प्रत आहे. ती प्रत मला देण्यात यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, नरेद्र वालदे यांनी विचारलेला प्रश्न निश्चितच योग्य आहे. असे अनेक ठिकाणी दिसते आहे, परंतु याच्या उलटे देखील स्थिती आहे. आताच मला सन्माननिय प्रविणजी दटके यांनी सांगितले की, प्रविणजींच्या प्रभागामध्ये आयचित मंदीरच्या नाल्यावरती एक हॉस्पीटल सॅग्शन आहे. मा.सदस्यांची

जी मागणी आहे त्याप्रमाणे त्यांना सॅग्शन नकाशाची प्रत दयायच्या आहे, त्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे आदेश प्रशासनाला दयावे.

महापौर :– सहा.आयुक्तांनी सॅग्शन नकाशाच्या प्रत सन्माननिय सदस्यांना उपलब्ध करुन दयाव्यात आणि नियमाप्रमाणे कारवाई करावी.

मो.जमाल :– मा.महापौरजी प्रकरण ऐंसा है की, इन्होने प्रश्न डाले थे हाउस के अंदर इस प्रश्न का आधार लेकर कुछ लोगों से गलत ट्रिटमेंट किया जा रहा है । कुछ दुकानदार हमारे नगरसेवक के पास आकर कुछ बातचित की, लेकीन वह बातचित को गलत तरीकेसे पेश करके ऐंसा गलत दुष्प्रचार नगरसेवक के बारे मे किया जा रहा है, जो बिलकुल उचित नही है। यह प्रकरण उठाने का मामला यही है की जो चिजे इनके व्दारा हुयी नही दुसरों के व्दारा की गई । अतिक्रमण की कारवाई करने के लिए प्रश्न लिये गये तब तक अतिक्रमण अधिकारीयोंको पता नही हुआ क्या है । बीच मे ऐंसा क्या हुआ की नकाशा मंजूरी की बात सामने आ गयी, तो यह जो चिजें है इसके अंदर बहोत घोळ दिख रहा है। यह जो घोळ है इसको क्लीअर किया जाये। और इसमे जो भी लोग दोषी है जिन्होने वहापर कारवाई नही की है उनके उपर कारवाई की जायें। वहापर जल्द से जल्द अतिक्रमण कारवाई की जाये । रस्तेके उपर बरसात के दिनो मे तालाब बन जाता और वह नाला जाम होने से समस्याए उत्पन्न हो रही है । अगर उसको गलत तरीकेसे मंजूरी भी दि गयी है तो उसको नामंजूर किया जायें। वह नाला है, नाले मे पाणी नही बहेंगा तो पाणी किधर जायेंगा, इसके उपर ध्यान देकर कारवाई की जाये । नागपूर महानगरपालिका के कमीश्नर साहब भी यहापर बैठे है, सत्तापक्ष नेता भी है उनको निवेदन करुंगा की इसके उपर उचित कारवाई करे।

महापौर :– नियमानुसार उचित कारवाई प्रशासनाने करावी.

श्री.नरेंद्र वालदे :–मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या नाल्यावर अतिक्रमण करून बांधकाम करण्याच्या नकाशाला मंजूरी कोणत्या आधारावर व कोणत्या अधिकाऱ्याने दिली याची सविस्तर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी अशी विनंती करण्यात येते.

महापौर :– सहा.आयुक्तांनी सॅग्शन नकाशाच्या प्रत सन्माननिय सदस्यांना उपलब्ध करुन दयाव्यात आणि प्रशासनाने नियमाप्रमाणे कारवाई करावी. कुठल्या अधिकाऱ्याने ते सॅग्शन दिले त्याची माहिती लिखीत स्वरुपात मा.सदस्यांना देण्यात यावी.

श्री.दयाशंकर तिवारी :–मा.महापौरजी, महानगरपालिका का सभागृह नियम के अनुरुप चल रहा था । इस चलते हुए सभागृह के बीच मे दो–तीन मा.सदस्य खडे एकसाथ खडे होकर उन्होंने भारतीय राष्ट्रगीत गाना प्रारंभ किया। मा.महापौरजी, सर्वप्रथम मै उस घटना का निषेध करना चाहता हूँ । भारत का राष्ट्रगीत जो है सम्मानसुचक है । इस राष्ट्रगीत के रक्षा के लिए इस देश के लोग अपना बलिदान देते है । और जो राष्ट्रगीत की संहिता है उस संहिता के अनुरुप राष्ट्रगीत गाने की कुछ नियमावली भी निश्चित है । मा.महापौरजी, राष्ट्रगीत को जब कोई मजाक बनाता है तो इसके संजीदगी से लेकर महानगरपालिका के प्रशासन ने इस का अपमान किया इस दृष्टी से उन्हे पत्र देकर कारण बताओ नोटीस देना चाहिए । उन्होने माफी मांगी तो ठीक है अन्यथा संबंधित नियमावली के अंतर्गत उनपर कठोर दंडात्मक कार्यवाही आपने करनी चाहिए ऐसी मेरी विनंती है । मा.महापौरजी, मेरे निवेदन करने का एकमात्र कारण यह भी है की आज एक व्यक्ति ने गलती करी और राष्ट्रगीत को मजाक बना दिया । मा.महापौरजी, राष्ट्रगीत मजाक की चीज नही है इसलिए यह गलती दुबारा ना हो इसलिए संजीदगी से साथ प्रशासन इसकी नोंद ले और संबंधित नगरसेवक जिन्होने खडे होकर इसप्रकार का कृत किया उसका निषेध हम इस सभागृह मे व्यक्त करते है और उसपे आप कार्यवाही करे और दुसरा निवेदन यह था सभागृह के कार्यवाही जब नोंद हुई उसमे से उन्होने इन्होंने कृत्य किया उसको तुरंत डिलीट किया जाये, कारण इस काले इतिहास को आनेवाला कोई सदस्य न पढ सके । मेरा यही कहना है आप इसमे कठोर दंडात्मक कार्यवाही करे ।

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, आम्ही विरोधी पक्षात सदस्य या सभागृहात आलो, अनेक वेळा सत्तापक्षांनी जर विरोधी पक्षांचे ऐकले नाही तर आम्ही लोकशाहीचे आयुध वापरुन आम्ही आमच्या समस्या मांडल्या पण सभागृहात याच्या आधी एखाद्या विषयावर सभागृहातून वॉकआऊट करीत असतांना अशाप्रकारचे कृत्य केले नाही. कोणत्याही प्रकारचे नुकसान केले नाही. मी या सभागृहाचा 17 वर्षापासून सदस्य आहे. माझ्या आधीपासून दयाशंकर तिवारीजी असतील, आमच्यात सर्वात सिनिअर सुनिलजी अग्रवाल असतील, पण असे कृत्य

कोणीही केले नाही. अनेक सिनिअर अधिकारी या सभागृहात बसले आहे. असे कृत्य या सभागृहात कधीही झाले नाही. परंतु आज भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी जे कृत्य केले ते कधी पाहिले नाही. एखाद्या विषय माझ्या मनाप्रमाणे झाला नाही, एखादा विषय सुप्रिम कोर्टात गेला आहे म्हणून त्याच्यावर चर्चा होवु शकत नाही याची आपणांस समज असली पाहिजे. तुम्हाला सभागृहाचे बायकॉट करायचे असेल तर करा, परंतु ज्या सदस्यांनी अशाप्रकारे राष्ट्रगीत संहितेच्या विरोधात राष्ट्रगीत गाऊन अशी चुक केली आहे. म्हणुन मा. दयाशंकरजीने सूचना केली मी त्यांना अनुमोदन करतो. संबंधित सर्व नगरसेवकांना आपण तात्काळ नोटीस देवुन त्याचे उत्तर मागावे जर त्यांनी या कृत्याच्या संदर्भात दिलगीरी व्यक्त केली असेल, आम्हाला काही कोणाचे सदस्यत्व रद्य करायचे नाही. त्यांनी या सभागृहाची जर दिलगीरी व्यक्त केली तर हा प्रश्न संपेल, त्यांनी जर दिलगिरी व्यक्त केली नाही तर नियमाप्रमाणे, बॉयलॉजप्रमाणे, कायद्याप्रमाणे कार्यवाई करून त्याचे सदस्यत्व रद्य करावे अशी माझी सूचना आहे.

श्रीमती वैशाली नारनवरे :— मा.महापौरजी, मी कोणाच्या विरोधाबद्यल बोलत नाही. ज्या आपण सूचना दिल्या त्या पण बरोबर आहे. जेव्हा राष्ट्रगीत सुरु झाले तेव्हा सर्व सदस्य उभे राहीले, तुम्ही सुध्दा राहिले, आणि आम्ही सुध्दा उभे राहिलो, सर्व अधिकारी सुध्दा उभे राहिले. आपण या नागपूर शहराचे प्रथम नागरिक आहात तर तुम्ही सुध्दा उभे रहायला पाहिजे होत्या, हेच मी या सभागृहात सांगते.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी उभ्या झाल्या पण बेल वर त्यांचा पाय असावा लागतो, म्हणुन त्यांना परत खाली बसावे लागले, ही अडचण असते, उभे राहुन बेलवर पाय ठेवता येत नाही. कारण मी महापौर होतो म्हणुन मला कळते आहे. अशावेळी बेलवर पाय ठेवावा लागतो, कारण ते मिनीटस्‌चा भाग होवु नये, जर बेल वाजली तर तो या मिनीटस्‌चा भाग होत नाही. म्हणुन बेलवर पाय ठेवायला त्या बसल्या असतील.

श्री.संदीप जोशीः— मा.महापौरजी, सन्माननिय दयाशंकरजी तिवारी, सन्माननिय प्रविणजी दटके यांनी सूचना केल्या आहेत त्या सूचनांचे गंभीरतेने पालन करुन योग्य ती कार्यवाई करण्याचे आदेश आपण प्रशासनाला दयावे.

महापौर :—सन्माननिय सत्तापक्ष नेते यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे प्रशासनाने या विषयाच्या संदर्भात गंभीर कार्यवाही करावी.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

महापौर
नागपूर महानगरपालिका,नागपूर